म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. २८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/ वाचनालय/ जिल्हा वाचनालय शाखा.

अनुक्रम नं. २८३ | विभाग निबंध | क्रमांक

पुस्तकाचें नांव अहिंसेची साधना

लेखक वामन चरखे

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006613

अ. सं. ए. तांबे
जि. वा. गो. २४३

# अहिंसेची साधना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६१३
दा. क्र.

संपादक

वामन चोरघडे

REFBK-0006613

महाराष्ट्र ग्रंथ भांडार : मुंबई ४

[ मूल्य दीड रुपया ]

प्रथमावृत्ति—मे १९४५

प्रकाशक:—शंकर वा. कुळकर्णी, महाराष्ट्र ग्रंथभांडार, मुंबई ४.
मुद्रक:—एम्. आर. कालेवार, प्रफुल्ल प्रिंटिंग प्रेस, नानाशंकरशेठ वाडी,
३८० ठाकुरद्वार मुंबई २

[ या पुस्तकाच्या पुढील आवृत्तींचे सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]

# खुलासा

हिंसेचा अनुभव जग हजारों वर्षांपासून घेत आलें आहे. हिंसेचें उघडें नागडें स्वरूप किती हिडिस असतें याची आजच्या जगाला प्रचीति आली आहे. हिंसक संघटन किती पाशवी, निर्घृण आणि संस्कृति-द्रोही असतें हेंहि आतां पुरेपूर प्रत्ययास येऊन चुकलें आहे. हिंसा ही आजच्या इतकी भयंकर आणि सर्वंकष कधींच झाली नव्हती. आजच्या इतका मानवी मूल्यांचा फडशा तिनें कधींहि पाडला नव्हता. पूर्वी हिंसेनें शरीरें मारलीं पण आत्म्याला धक्का लावण्याचा तिनें धीर केला नव्हता. आज आपल्या सैनिकांना स्फूर्तिसंदेश देतांना "शत्रूचा आत्म्यापासून ( with your soul ) द्वेष करा, असें स्टॅलिन म्हणतो. यापेक्षां आणखीं भयानक तें काय घडावयाचें राहिलें?

आणि यामुळेंच आता प्रतिक्रिया सुरू झाली आहे. जगांतील विचारवंतांना आतां हिंसेचें उच्चाटण व्हावें असें वाटूं लागलें आहे. हिंसेनें कांहींहि साधलें जात नाहीं याची विदारक जाणीव त्यांना आतां व्हावयाला लागली आहे. आणि म्हणुन ते अहिंसेकडे वळले आहेत. अहिंसक संघटनेची स्वप्नें आतां त्यांना पडत आहेत. तिचें शुभदर्शन करून घेण्यासाठीं प्रयोगवीर अहोरात्र श्रवण मनन निदिध्यास आणि कृति यांत मग्न आहेत. महात्मा गांधींचा मार्ग जो पूर्वी दुनियला जुनाट, अशक्य प्रतिगामी थोतांडी वाटत होता तो सर्वशुभ आणि पूर्ण व्यवहार्य असा वाटूं लागला आहे. चालू महायुद्धाचा हिंदुस्थानच्या दृष्टीनें येवढा तरी फायदा झाला हें देखील कांहीं कमीं नाहीं !

१९४२ सालीं तुरुंगांत असतांना अहिंसक संघटनेबद्दल पुष्कळच विचार करण्याची संधी मिळाली होती. पू. विनोबा, काका कालेलकर, किशोरलालभाई मश्रूवाला, दादा धर्माधिकारी या अहिंसेच्या आचार्यांत जी चर्चा चाले ती ऐकायला मिळत असे. हिंसेचा अवलंब करून माणसें मारायला जर कोटी कोटी नवयुवक मिळूं शकतात तर अहिंसेच्या नांवावर, " **वरी कवणे एके उपायें पडिलें तें उभे होये ॥** " या उद्देशाने माणसें जगवायला लाखों सैनिक कां उभे करतां येऊं नयेत असा विचार त्यावेळीं आम्हांला फार स्फूर्ति देत असे.

त्या अनुसंधानानें जें काय वाचनांत आलें त्यांतूनच ही **‘अहिंसेची साधना’** निर्माण झाली आहे. या साधनेचा अवलंब केल्यास अहिंसक संघटन कसें शक्य आहे याची प्रस्तुत पुस्तकावरून थोडीशी कल्पना येऊं शकेल असें मला वाटतें. निदान या दृष्टीनें विचार तरी खासच करतां येईल. येवढें झालें तरी या पुस्तकाचा उद्देश सफल झाला असें होईल.

प्रस्तुत पुस्तकांत मुख्यत: श्री. रिचर्ड. बी. ग्रेग यांच्या "Discipline for Non Violence" या पुस्तिकेचा संपूर्ण अनुवाद दिलेला आहे. अहिंसेच्या साधनेबद्दल आपल्याकडील आचार्यांनींहि पद्धतशीर विचार केलेला आहे याचें आंशिक दिग्दर्शन व्हावें आणि कांही अंगाचा विचार पूर्ण व्हावा या उद्देशानें प्रस्तुत पुस्तकांत इतर लेख घातले आहेत. वाचकांची जिज्ञासा वाढल्यास त्यांनीं त्यांचें संपूर्ण वाङ्मय जरूर वाचावें अशी त्यांना विनंति आहे. श्री. ग्रेग यांच्या पुस्तकाच्या भाषांतराबद्दल मला परवानगी मिळूं शकली याबद्दल मी "नवजीवन कार्यालयाचे" श्री. जीवनजी देसाई यांचे मनापासून आभार मानतों. इतर लेखांसंबंधीं कृतज्ञता व्यक्त करण्यांतच औचित्य आहे.

हें पुस्तक एक वर्षापासुन प्रकाशकांकडे पडून आहे. आजच्या परिस्थितींत अनेक कारणांनीं त्यांना तें प्रसिद्ध करतां आलें नसावें. वास्तविक पहातां १९४२ नंतर यांतील मजकुरांत आणखी पुष्कळच भर घालतां येण्यासारखी आहे. पण तें काम माझ्या शक्तिबाहेरचें असून माझी मर्यादा मी जाणतों. पुस्तक शक्य-तितक्या लवकर उपलब्ध करून इतरांनां त्यासंबंधी विचार करावयास लावण्याचा उद्देशहि अनेक कारणांनी लवकर साध्य झाला नाहीं. पण उशीरा कां होईना हें पुस्तक मराठी वाचकांच्या हातीं पडत आहे हेंच दुःखांत सुख! याचा इष्ट उद्देश सफल होवो येवढीच इच्छा आहे.

—आणि अहिंसक संघटनेला या पुस्तकाने मदत होऊं शकली तर—?

—तर आणखी काय हवें?

वर्धा.

ता. १०-४-१९४५ **—वामन कृष्ण चोरघडे,**

ठाणें.

# अहिंसेची साधना

## —अनुक्रमणिका—


| | लेखाचें नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | हिंसेंतून अहिंसेकडे | विनोबा | १० |
| २ | अहिंसेचे आदर्श— सिद्धांत आणि आचार | कि. घ. मश्रूवाला | १५ |
| ३ | अहिंसेची सहजप्रवृत्ति | ” | २० |
| ४ | अहिंसा आणि मानवनिष्ठा | काका कालेलकर | ४२ |
| ५ | तरुणांनीं लक्ष द्यावें | विनोबा | ४६ |
| ६ | जागृतीचीं साधनें | ” | ४८ |
| ७ | ग्रामसेवेच्या शास्त्रांतील एक कलमः शरीरश्रम | ” | ५० |
| ८ | शरीरश्रम आणि सांस्कृतिक उन्नति. | दादा धर्माधिकारी | ५२ |
| ९ | गांधीजींची रणनीति | ” | ५८ |
| १० | अहिंसेची साधना | रिचर्ड. बी. ग्रेग | ६६ |

# अहिंसेची साधना

* रिचर्ड. बी. ग्रेग
  विनोबा भावे
* किशोरलाल मश्रूवाला
* काका कालेलकर
* दादा धर्माधिकारी

संपादक

**वामन चोरघडे**

# मला काय हवें !

मी शांततापरायण मनुष्य आहें. शांततेवर माझी श्रद्धा आहे. तथापि वाटेल ती किंमत देऊन मी शांतता विकत घेऊं इच्छित नाहीं. तुम्हांला फत्तरांतून जी शांतता दिसते, ती मला नको. थडग्यांमध्यें जी दिसते तीहि शांतता मला नको. जी शांतता मी अपेक्षितों ती मनुष्याच्या हृदयांतील होय. ती ढळत नाहीं. सर्व दुनिया मारायला उठली तरी सर्वशक्तिमान ईश्वराची शक्ति तिचें रक्षण करीत असते

* * * *

माझी अहिंसा हा एक वैज्ञानिक प्रयोग आहे. वैज्ञानिक प्रयोगांत अपयशाला थारा नाहीं. अपेक्षित परिणाम पदरीं पाडून घेतांना अंतराय हे येणारच. परंतु त्यांतूनच बहुधा मोठमोठे वैज्ञानिक आविष्कार झालेले दिसून येतात. तुम्ही जर अहिंसेचा अवलंबच करूं इच्छित असाल तर या प्रकारच्या निष्ठेनें मी सांगितलेला हा अहिंसेचा प्रयोग तुम्हांला केला पाहिजे.

अशा प्रकारच्या अहिंसेच्या साधनेचें एक गमक म्हणून— अहिंसेचे प्रतीक म्हणून चरख्याशिवाय दुसरें कोणतेंहि श्रेष्ठ साधन मी आपणाला सांगूं शकत नाहीं.

—गांधीजी

२३–४–३९

# १ हिंसेतून अहिंसेकडे

" प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या प्राकृतिक आणि सांस्कृतिक स्वभावांत–स्वभावाचे असे दोन भेद मी सोईसाठीं करतों–अहिंसेबाबत कांहीं अनुकूल अशी विशेषता आहे काय ? " हा बापूंनीं आपल्या समोर ठेवलेल्या प्रश्नाचा भावार्थ समजला पाहिजे. तत्त्वत: किशोरलालभाईंनीं सांगितलें तें उघडच आहे. अमुक एका देशांतील जनता प्रकृति–स्वभावानें अहिंसक आणि दुसऱ्या देशांतील हिंसक असा तात्त्विक भेद करतां येत नाहीं. प्रकृति सर्वत्र एक आणि त्रिगुणात्मक आहे. सत्त्व, रज, तम सगळीकडेच पहायला सांपडतात. ह्या देशांत जन्मल्यानेंच कांहीं विशेषता अंगीं येते असें नाहीं. येथल्या हवापाण्यांतच कांहीं खास गुण मानतां येत नाहीं.

तथापि हिंदुस्थान आणि युरोप यांच्यांत तत्त्वत: भेद नसूनहि ह्या दोहोंच्या आजच्या स्वभावांत भेद आहे. युरोपांत आतां अलीकडे सुरू होऊं लागलेले प्रयोग करून करून हिंदुस्थानचा आजचा स्वभाव बनला आहे. वृद्ध आणि युवक यांच्या स्वभावांत ज्या प्रकारचा भेद असतो तसला भेद हिंदुस्थान आणि युरोप यांच्या स्वभावांत आहे. हें थोड्या विस्तारानें स्पष्ट करतों.

किशोरलालभाईंनीं सांगितलें कीं मोठी लोकसंख्या आणि विशाल देश ही अहिंसेच्या दृष्टीनें आमची एक अनुकूल विशेषता आहे. आमची संख्या मोठी कां आहे ? इतकी मोठी संख्या आणि एवढा मोठा देश असण्याचें कांहीं विशेष कारण अवश्य असलें पाहिजे. तें कारण आपल्याला वर्तमानकाळांत सांपडायचें नाहीं. त्याचा शोध आपल्याला प्रागैतिहासिक काळांत करावा लागेल. इतिहासाच्या पुस्तकांत तें सांपडणार नाहीं. एका युरोपांत आपण अनेक लहान लहान राष्ट्रें पाहतों. जर्मनीची लोकसंख्या सातआठ कोटींची, इग्लंडची चार कोटींची आणि इतर देशांची तर दोन दोन तीन तीन कोटींचीच आहे. मग आमची लोकसंख्या तीस-चाळीस कोटींची कशी झाली ? आमची संतानोत्पादनाची शक्ति तर कांहीं अधिक नाहीं. आम्हीं हिंसेचे आणि वेगळे राहण्याचे अनेक प्रयोग केले आणि त्यांत

अयशस्वी झाल्यावर आमचें एक मोठें राष्ट्र बनविलें. हा सारा प्रागैतिहासिक इतिहास आहे. तुम्हीं त्याला काल्पनिक इतिहास म्हणूं शकतां, परंतु आहे तो इतिहासच.

आज युरोपांत चाललेल्या युद्धांत जीं राष्ट्रें लढून राहिलीं आहेत त्यांच्यांत आणि आमच्या येथील प्रांतांत काय फरक आहे? उलट मी तर म्हणतों कीं इथें उदाहरणच द्यायचें तर, कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यांत जितका फरक आहे त्यापेक्षां फ्रान्स, इंग्लंड आणि जर्मनी यांच्यांत तो कमीच आहे. त्यांची लिपी सुद्धां एक आहे. धर्म आणि संस्कृति तर एक आहेच. परंतु असें असून ते आपापलें वेगळें छोटें राष्ट्र मानतात. आमच्या इथें तर आठदहा प्रमुख लिप्या आहेत. एकेक लिपी शिकण्यांत दोनदोन महिने निघून जातात. इतकें असूनहि आम्ही आमचें एक राष्ट्र मानतों.

इतका मोठा हिंदुस्थान एक राष्ट्र कसा बनला? एकाएकीच बनला काय? कांहींएक प्रयोग न करतां अकस्मात् आपोआपच एक झाला काय? हें कसें शक्य आहे? युरोपांतील राष्ट्रें देखील लढून लढून जेव्हां थकून जातील तेव्हां आधीं आपला राष्ट्र-संघ ( फेडरेशन ) बनवतील. फेडरेशनची भाषा तर आजच सुरू होऊन गेली आहे. निरनिराळीं राष्ट्रें एका सूत्रांत बांधलीं जातील आणि मग हजारपांचशें वर्षांनंतर त्या सर्वांचें एक राष्ट्र बनेल. आणि आजचीं राष्ट्रें त्याचे प्रांत बनतील. हिंदुस्थानांतहि असेंच झालें असेल. असें आपण मानणार नाहीं तर आपण नीट विचार करीत नाहीं असें ठरेल.

संस्कृतच्या माझ्या संबंध वाचनांत "दुर्लभं महाराष्ट्रे जन्म" किंवा "दुर्लभं सौराष्ट्रे जन्म" असें वचन कुठेंच आलें नाहीं. "दुर्लभं भारते जन्म" हेंच वचन येतें. वेदांमध्यें देखील आमचा देश समुद्रापासून हिमालयापर्यंत असल्याचें सूचन आहे.

विविध प्रवृत्तींच्या लोकांचा हिंदुस्थान एक राष्ट्र बनला आहे. आणि बाहेरच्या लोकांनींहि त्याला एक मानलें. हें सारें अनेक संघर्षांनंतरच झालें आहे. आम्हीं सहजासहजीं एकराष्ट्र बनलों नाहीं. हिंसेचे अनेक प्रयोग केल्यानंतरच बनलों. आजचीं राष्ट्रें जे खेळ खेळून राहिलीं आहेत, ते सारे खेळ आम्हीं खेळून चुकलों आहोंत. आणि आतां आमचें एक संयुक्त कुटुंब झालें आहे.

याचा अर्थ असा नाहीं कीं आम्हीं एकमेकांशीं लढण्याचें सोडलें आहे. इतिहासकाळांतहि आम्ही लढलों. रजपूत व मराठे लढले. बंगाल ओरिसा इत्यादींवर मराठ्यांनीं हल्ले केले. परंतु हे सर्व अंतःकलह ( सिव्हिल वॉर्स ) म्हटले गेले. आम्ही सुद्धां त्याला यादवी म्हणतों. आणि लोकहि तेंच म्हणतात. परंतु जर्मनीच्या आणि फ्रान्सच्या लढाईला कोणी आपापसांतील लढाई म्हणत नाहीं. ती एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्राशीं लढाई समजण्यांत येते.

" हिंदुस्थानांत बाहेरच्यांचें आक्रमण कसें यशस्वी झालें ! " याचें एकच उत्तर मला माहीत आहे आणि तें म्हणजे लोभ. मनुष्याचा मुख्य आणि विशेष दुर्गुण व शत्रु लोभच आहे. काम-क्रोध पशूंतहि आहेत. मनुष्य त्यांना थोडें फार संयमांत ठेवूं शकला आहे. परंतु त्यानें लोभ मुळींच जिंकला नाहीं. मनुष्यांत पशूंपेक्षां लोभाची मात्रा अधिक आहे. आम्ही आमचें एक राष्ट्र तर बनविलें. परंतु त्या बरोबरच लहान लहान जातिहि निर्माण केल्या. त्यांत आमचा संकुचितपणाचा भाव प्रगट झाला. तोहि लोभमूलकच आहे.

हिंदुस्थान ह्या लोभामुळेंच परतंत्र झाला आहे. हिंदुस्थानाला मुसलमानांनीं अथवा इंग्रजांनीं जिंकलें नाहीं. त्यांनीं आम्हांला जिंकलें त्यांत सुद्धां आमची विशेषताच प्रगट होते. कांहीं लोक म्हणतात, " लाख-सवालाख इंग्रज आणि तीस-चाळीस कोटी हिंदी लोकांवर राज्य करतात ? इतक्या शेळयामेंढ्या सुद्धां तितक्या धनगरांना पाळणें जड जाईल. " एक लाख मेंढपाळांकडून चाळीस कोटी मेंढ्या आवरल्या जाणार नाहींत. कारण त्या पशु आहेत. पण आम्हांला अधिक व्यवस्थापकांची जरूरच नाहीं. कारण हिंदुस्थान व्यवस्थित आणि सभ्य लोकांचा देश आहे. पूर्वी सुद्धां आम्हांला व्यवस्थापकांची जरूर नव्हती. आणि आजहि नाहीं. अनुभवानें आमच्या रक्तांत तेवढी सभ्यता मुरलेली आहे. जरी अजून हिंसेवरील आमचा विश्वास पुरा उडून गेलेला नाहीं, तरी आपसांत लढत राहणें लाभाचें नाहीं, हिंसेंत कल्याण नाहीं, हें ज्ञान राष्ट्रीय दृष्टीनें आम्हांला झालें आहे. इथली आणि दुसऱ्या राष्ट्रांतली व्यक्ति व्यक्ति म्हणून सारखीच आहे. परंतु जमात म्हणून पाहिल्यास आमच्या राष्ट्रांत विशेषता आहे.

आम्हीं हजारों वर्षांपासून परतंत्र आहोंत याचेंहि एक विशेष कारण आहे. आम्ही अल्पसंतोषी बनून स्वतंत्र होऊं इच्छीत नाहीं म्हणून परतंत्र आहोंत. ह्या

विशेषतेबद्दल अभिमानहि वाटणें शक्य आहे. " गुलामगिरीचा अभिमान " ही वस्तु कोणाला विचित्र वाटेल. आम्ही आमचे प्रांत वेगवेगळीं राष्ट्रें मानून घेतले असते तर कदाचित् त्यापैकीं कांहीं प्रांत " स्वतंत्र राष्ट्र " म्हणून दिसलें असतें; परंतु आमचा संकल्प होता कीं आम्ही भारत एक राष्ट्र सिद्ध करूं; मग कितीहि काळपर्यंत परतंत्रता सहन करावी लागली तरी चालेल. लहान लहान राष्ट्रें कायमचीं स्वतंत्र राहूं शकत नाहींत हें आपण आज प्रत्यक्ष पहात आहोंत. आम्ही छोटीं छोटीं राष्ट्रें बनवून अल्पसंतोषी राहण्याचें पत्करलें नाहीं. म्हणून आज परतंत्र दिसतों. त्या दृष्टीनें आमची परतंत्रताहि आमच्या राष्ट्रीयत्वाचें चिह्न आहे. आम्ही एक कुटुंब म्हणून राहण्याचा निश्चय केलेला आहे.

मी हें सर्व व्यक्त भाषेंत तुमच्यासमोर मांडीत आहें. आमच्या जनतेनें अशा प्रकारें व्यक्त स्वरूपांत विचार करून हें ठरविलें असें नाहीं. जनता असा विचार करीत नाहीं. अनुभवानें हें तत्त्व तिच्या रक्तांत मुरलें आहे.

आमच्या देशांतील जनता वास्तविक पाहतां गुलाम झालीच नव्हती. आमचे राजे बदलले, राज्यें बदललीं, हिंदू गेले व त्यांच्या ठिकाणीं मुसलमान आले. त्यानंतर पुन: हिंदु आले. तरीहि जनतेच्या स्थितींत कांहींच फरक पडला नाहीं. जों पर्यंत आमच्या ग्रामपंचायती कायम होत्या तोंपर्यंत जनता स्वतंत्रच होती. ग्रामपंचायती नाहींशा झाल्यापासून आम्ही खरोखर परतंत्र झालों.

सारांश, अनुभवानें आम्ही हें समजून गेलों कीं संतोषानें आणि आनंदानें रहायचें असेल तर विनाकारण लहान लहान राष्ट्रें बनवितां कामा नये; आणि आपापसांत लढतां कामा नये. अहिंसेचा हा सिद्धांत अनुभवानें आमच्या गळीं उतरला आहे. शास्त्रीय रीतीनें आम्ही त्यावर विचार केलेला नाहीं. आणि तो आचारांत सिद्ध करणें तर अजून बाकीच आहे.

अहिंसेचा विचार करतांना आपणांला आहाराचा प्रश्न अजीबात सोडून चालायचें नाहीं. निरामिष आहार अहिंसेला अत्यंत अनुकूल आहे. तेवढ्यानेंच माणूस अहिंसक बनतो असें नाहीं. पण आहाराचा योग्य उपयोग करून घेतला तर अहिंसेला तो पोषक होऊं शकतो यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांत मांसाहाराचा त्यागहि आमच्या प्रकृति-स्वभावानेंच झाला असें नाहीं. आम्हीं आमचा आहारहि अनुभवानें निश्चित केला आहे.

याचा अर्थ असा नाहीं कीं आम्हीं एकमेकांशीं लढण्याचें सोडलें आहे. इतिहासकाळांतहि आम्ही लढलों. रजपूत व मराठे लढले. बंगाल ओरिसा इत्यादींवर मराठ्यांनीं हल्ले केले. परंतु हे सर्व अंत:कलह ( सिव्हिल वॉर्स ) म्हटले गेले. आम्ही सुद्धां त्याला यादवी म्हणतों. आणि लोकहि तेंच म्हणतात. परंतु जर्मनीच्या आणि फ्रान्सच्या लढाईला कोणी आपापसांतील लढाई म्हणत नाहीं. ती एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्राशीं लढाई समजण्यांत येते.

" हिंदुस्थानांत बाहेरच्यांचें आक्रमण कसें यशस्वी झालें ! " याचें एकच उत्तर मला माहीत आहे आणि तें म्हणजे लोभ. मनुष्याचा मुख्य आणि विशेष दुर्गुण व शत्रु लोभच आहे. काम–क्रोध पशूंतहि आहेत. मनुष्य त्यांना थोडें फार संयमांत ठेवूं शकला आहे. परंतु त्यानें लोभ मुळींच जिंकला नाहीं. मनुष्यांत पशूपेक्षां लोभाची मात्रा अधिक आहे. आम्ही आमचें एक राष्ट्र तर बनविलें. परंतु त्या बरोबरच लहान लहान जातिहि निर्माण केल्या. त्यांत आमचा संकुचितपणाचा भाव प्रगट झाला. तोहि लोभमूलकच आहे.

हिंदुस्थान ह्या लोभामुळेंच परतंत्र झाला आहे. हिंदुस्थानाला मुसलमानांनीं अथवा इंग्रजांनीं जिंकलें नाहीं. त्यांनीं आम्हांला जिंकलें त्यांत सुद्धां आमची विशेषताच प्रगट होते. कांहीं लोक म्हणतात, " लाख–सवालाख इंग्रज आणि तीस–चाळीस कोटी हिंदी लोकांवर राज्य करतात ? इतक्या शेळ्यामेंढ्या सुद्धां तितक्या धनगरांना पाळणें जड जाईल. " एक लाख मेंढपाळांकडून चाळीस कोटी मेंढ्या आवरल्या जाणार नाहींत. कारण त्या पशु आहेत. पण आम्हांला अधिक व्यवस्थापकांची जरूरच नाहीं. कारण हिंदुस्थान व्यवस्थित आणि सभ्य लोकांचा देश आहे. पूर्वी सुद्धां आम्हांला व्यवस्थापकांची जरूर नव्हती. आणि आजहि नाहीं. अनुभवानें आमच्या रक्तांत तेवढी सभ्यता मुरलेली आहे. जरी अजून हिंसेवरील आमचा विश्वास पुरा उडून गेलेला नाहीं, तरी आपसांत लढत राहणें लाभाचें नाहीं, हिंसेंत कल्याण नाहीं, हें ज्ञान राष्ट्रीय दृष्टीनें आम्हांला झालें आहे. इथली आणि दुसऱ्या राष्ट्रांतली व्यक्ति व्यक्ति म्हणून सारखीच आहे. परंतु जमात म्हणून पाहिल्यास आमच्या राष्ट्रांत विशेषता आहे.

आम्ही हजारों वर्षांपासून परतंत्र आहोंत याचेंहि एक विशेष कारण आहे. आम्ही अल्पसंतोषी बनून स्वतंत्र होऊं इच्छीत नाहीं म्हणून परतंत्र आहोंत. ह्या

विशेषतेबद्दल अभिमानहि वाटणें शक्य आहे. "गुलामगिरीचा अभिमान" ही वस्तु कोणाला विचित्र वाटेल. आम्ही आमचे प्रांत वेगवेगळीं राष्ट्रें मानून घेतले असते तर कदाचित् त्यापैकीं कांहीं प्रांत "स्वतंत्र राष्ट्र" म्हणून दिसलें असतें; परंतु आमचा संकल्प होता कीं आम्ही भारत एक राष्ट्र सिद्ध करूं; मग कितीहि काळपर्यंत परतंत्रता सहन करावी लागली तरी चालेल. लहान लहान राष्ट्रें कायमचीं स्वतंत्र राहूं शकत नाहींत हें आपण आज प्रत्यक्ष पहात आहोंत. आम्ही छोटीं छोटीं राष्ट्रें बनवून अल्पसंतोषी राहण्याचें पत्करलें नाहीं. म्हणून आज परतंत्र दिसतों. त्या दृष्टीनें आमची परतंत्रताहि आमच्या राष्ट्रीयत्वाचें चिह्न आहे. आम्ही एक कुटुंब म्हणून राहण्याचा निश्चय केलेला आहे.

मी हें सर्व व्यक्त भाषेंत तुमच्यासमोर मांडीत आहें. आमच्या जनतेनें अशा प्रकारें व्यक्त स्वरूपांत विचार करून हें ठरविलें असें नाहीं. जनता असा विचार करीत नाहीं. अनुभवानें हें तत्त्व तिच्या रक्तांत मुरलें आहे.

आमच्या देशांतील जनता वास्तविक पाहतां गुलाम झालीच नव्हती. आमचे राजे बदलले, राज्यें बदललीं, हिंदु गेले व त्यांच्या ठिकाणीं मुसलमान आले. त्यानंतर पुन: हिंदु आले. तरीहि जनतेच्या स्थितींत कांहींच फरक पडला नाहीं. जों पर्यंत आमच्या ग्रामपंचायती कायम होत्या तोंपयत जनता स्वतंत्रच होती. ग्रामपंचायती नाहींशा झाल्यापासून आम्ही खरोखर परतंत्र झालों.

सारांश, अनुभवानें आम्ही हें समजून गेलों कीं संतोषानें आणि आनंदानें रहायचें असेल तर विनाकारण लहान लहान राष्ट्रें बनवितां कामा नये; आणि आपापसांत लढतां कामा नये. अहिंसेचा हा सिद्धांत अनुभवानें आमच्या गळीं उतरला आहे. शास्त्रीय रीतीनें आम्ही त्यावर विचार केलेला नाहीं. आणि तो आचारांत सिद्ध करणें तर अजून बाकीच आहे.

अहिंसेचा विचार करतांना आपणांला आहाराचा प्रश्न अजीबात सोडून चालायचें नाहीं. निरामिष आहार अहिंसेला अत्यंत अनुकूल आहे. तेवढ्यानेंच माणूस अहिंसक बनतो असें नाहीं. पण आहाराचा योग्य उपयोग करून घेतला तर अहिंसेला तो पोषक होऊं शकतो यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांत मांसाहाराचा त्यागहि आमच्या प्रकृति-स्वभावानेंच झाला असें नाहीं. आम्हीं आमचा आहारहि अनुभवानें निश्चित केला आहे.

आजची युरोपची दशा पहा. चारशें वर्षांपूर्वीं तिथें जितकें मांस मिळत होतें तितकें आतां मिळत नाहीं. तिथें लक्षावधी प्राण्यांची खाण्यासाठीं कत्तल केली जाते. दक्षिण अमेरिकेंतून मांसाचे डबेच्या डबे भरून येतात. रोजच्या रोज आम्हीं लाखों जनावरें खाऊं लागलों तर तीं किती दिवस पुरतील ? जनावरांची संख्या कमी होऊं लागली आहे. म्हणून मांसहि त्या मानानें कमी मिळूं लागलें आहे. हें पाहून आतां डॉक्टर लोक दुधाची विशेषता सांगूं लागले आहेत. आमच्याप्रमाणें तेहि आतां दुधाचा महिमा गाऊं लागले आहेत.

हा सगळा अनुभवाचा परिणाम आहे. हिंदुस्थाननें ह्या साऱ्या अनुभवानंतरच दुधाची पवित्रता मानली आहे. दूध पवित्र कां ? तर आम्ही त्याच्या आधारानें मांस सोडूं शकतों म्हणून. दुधानें आमच्यावर जो उपकार केला आहे तो भाजी-पाल्यानें केला नाही. संत्र्यासारखें फळ सात्विक असो परंतु मांस सोडण्याची शक्ति यांत नाहीं. म्हणून दूध प्राणिजन्य असूनहि कृतज्ञतापूर्वक आपण त्याला पवित्र मानतों.

सारांश, हिंदुस्थान हा एक फार प्राचीन देश आहे. आम्हीं प्रागैतिहासिक काळीं हिंसेचे अनेक प्रयोग केले आहेत. त्यांच्या परिणामीं अहिंसा आमच्या रक्तांत दाखल झाली आहे. जर आपण ह्या अहिंसेचें संगोपन केलें नाहीं तर आपली हजारों वर्षांची साधना व्यर्थ होऊन आपण भित्रे बनूं आणि संभव आहे, पारतंत्र्यांतच आपल्याला आनंद वाटूं लागेल.

# २ अहिंसा

१ आदर्श २ सिद्धांत ३ साधना

**१ आदर्शः—**

( १ ) जीवनाचा खरा आधार अहिंसाच होय. हिंसा नव्हे.

( २ ) 'मी' आणि 'माझें' या संकुचित कक्षेंत जखडलें गेल्यामुळेंच हिंसा निर्माण होते. या कक्षेचा अव्याहत विस्तार करीत राहण्यांतच अहिंसेची साधना आहे.

( ३ ) यच्चावत प्राणिमात्र सर्व सारखेच आहेत. आत्मा सर्वांतर्यामी एकच आहे; तथापि अहिंसेची साधना मानवासाठीं असल्यामुळें येथें मानवाबद्दलच विचार केला पाहिजे.

( ४ ) अखिल मानव समाज एकाच कोटींत गणला जातो. स्त्री, पुरुष हेहि समान योग्यतेचेच आहेत. देश, राज्य, वंश, रंग, वर्ण ( धंदा ) जात, धर्म, शिक्षण, भाषा, लिपि या व अशा सारख्या भेदामुळें मानव समाज विभागला गेला आहे. त्याचें निरनिराळे गट बनलेले आहेत. या विभागणीमुळें त्या त्या गटांत किंवा तदंतर्गत व्यक्तींत भिन्नत्व व वैशिष्ट्य निर्माण झालें आहे.

( ५ ) हे भेद, व हीं वैशिष्ट्यें टाळणें किंवा दृष्टिआड करणें शक्य नाहीं हें खरें. पण त्याबद्दल गर्व किंवा दुरभिमान बाळगणें मात्र इष्ट नाहीं. हे भेद आणि विशेषता जोपर्यंत मनुष्य जातीच्या कल्याणासाठीं व सुखसंवर्धनासाठीं मदत करितात, तोंवरच त्यांचें जतन करून त्यांना वाढूं दिलें पाहिजे. मानवांच्या सेवेकडेच त्यांचा विनियोग झाला पाहिजे. आणि हीं वैशिष्ट्यें ज्या क्षणीं मनुष्यजातीस त्रासदायक होतील त्या क्षणीं त्यांना कटाक्षानें सोडून देण्यांतच अहिंसेची साधना आहे. सर्व भेद, अवघीं वैशिष्ट्यें नामशेष करून अखिल मानवजातीला नव्या साच्यांत ओतण्याचा प्रयास करणें निरर्थक आहे. हिंसेशिवाय असलें काम साधूंहि शकत नाहीं.

( ६ ) ह्या भेद आणि वैशिष्ट्यांतून अधिकार किंवा प्रौढी निर्माण होतां नये. भेद आणि विशेषता आहे म्हणूनच मानवी कर्तव्यें पण निर्माण झालेलीं आहेत. एकाला दुसऱ्यांप्रत कांहीं तरी कर्तव्य असतें. या मधूनच सर्वधर्मसमभाव,

अस्पृश्यता निवारण, भोजनादि व्यवहारांत एक पंगत इत्यादि आचार अहिंसेच्या साधनेसाठीं आवश्यक म्हणून उत्पन्न होतात.

( ७ ) मानवकुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीच्या सुखासाठीं व कल्याणास्तव मनुष्य-व्यवहारांतून हिंसा अजिबात नाहींशी करणें आवश्यक आहे.

( ८ ) एका जमातीनें हिंसा केली असतां तिच्यावर सूड म्हणून अथवा तिच्यापासुन आत्मरक्षण म्हणून हिंसा करण्याची प्रेरणा दुसऱ्या पक्षाच्या मनांत उद्भवते. हिंसेचा निकाल हिंसेनेच करण्याची वृत्ति अशा रितीनें मानव परिवारांत घुसली आहे.

( ९ ) परंतु या वृत्तीने हिंसा थांबत नाहीं. उभय पक्षांत न्याय्य संबंधहि प्रस्थापित होत नाहीत व अंतीं परिणाम असा होतो कीं हिंसा करणारे पक्ष आपलें, आपल्या मुलामाणसांचें आणि सर्व मानव परिवाराचें नुकसान करितात.

( १० ) यास्तव कितीहि अघोर कर्म घडलें असलें किंवा कसाहि घोर अन्याय झाला असला, तरी त्याच्या प्रतिकारासाठीं हिंसेची योजना कधींच करतां नये. हिंसेचे मार्ग अजमाविण्याच्या वृत्तीचा प्रतिरोध करण्यांतच अहिंसेची साधना घडते.

( ११ ) जीवनाचें धारण, पोषण आणि विकसन योग्य प्रकारें करण्याचा शक्ती अहिंसेत भरली आहे, आणि असली पाहिजे. म्हणून ज्या अन्यायाच्या किंवा घोरकर्मांच्या विरुद्ध हिंसक उपाय अमलांत आणण्याची इच्छा होते, त्याच्या-विरुद्ध अंमलांत आणण्याजोगे अहिंसक उपायहि असलेच पाहिजेत. जो प्रामाणिक-पणें अहिंसेची साधना करील तोच ते उपाय शोधूं शकेल.

( १२ ) जीवनांतील प्रत्येक व्यवहार अहिंसेच्या द्वाराच चालायला हवा. अमुक एका क्षेत्रांत अहिंसेनें भागणार नाहीं ही अश्रद्धा आम्हांला आमच्या मनांतुन काढून टाकली पाहिजे. आणि ती समाजामधून सुद्धां नाहींशी करण्याचा ध्यास केला पाहिजे. जोपर्यंत अन्याय नष्ट होत नाहीं तोपर्यंत अहिंसेची साधना अपुरीच मानली पाहिजे.

(१३) एतदर्थ आम्हांला सभ्यतेच्या किंवा संस्कृतीच्या बाबत आमच्या ज्या प्रचलित कल्पना, धारणा, समजुती आहेत त्या बदलाव्या लागतील, त्याची तयारी केली पाहिजे.

**२. सिद्धांतः—**

अहिंसेची जी कांहीं साधना आजवर घडली आहे त्या वरून अहिंसेचे अंग म्हणून खालील सिद्धांताचा समावेश करतां येईल.

[ १ ] भोगविलास व ऐषआराम यांची लालसा हिंसेशीं निगडित आहे. उलटपक्षीं, साधेपणा संयम, सहनशीलता आणि शरीरश्रम अहिंसेला पोषक आहेत.

[ २ ] मोठी, विपुल व भरीव साधनसामुग्री आणि दिपविणारे भोगविलास यासाठीं लागणारी चीजवस्त्र उपलब्ध करून देणारी संस्कृति हिंसेवाचून एरुतर प्रस्थापित होऊं शकत नाहीं आणि टिकूंहि शकत नाहीं.

[ ३ ] या भपक्यांत किंवा भडकपणांत संस्कृतीचें रूप पाहणेंच मुळीं चुकीचें आहे. खऱ्या संस्कृतीमुळें कुटुंबांतील दरेक इसमाचें जीवन साधें, संयमी, कष्टाळू भरीव तसेंच निरोगी, निर्भय, स्वाभिमानी व मधुर झालें पाहिजे. हीच खरी सर्वोदयसंस्कृति. अशा संस्कृतीची प्रतिष्ठा अहिंसेनेंच शक्य आहे.

[ ४ ] अव्यवस्था, अराजकता अथवा विघटना, संघाचें विलग होणें हें अहिंसक संस्कृतीचें उद्दिष्ट नव्हे. तर सर्व प्राणिमात्राशीं एवढेंच काय पण जनावरांशींहि ऐक्य साधणें हा या संस्कृतीचा उद्देश आहे. आम्ही मोठमोठ्या कामाच्या वेळींच या ऐक्याकडे लक्ष देऊं म्हटलें तर भागणार नाहीं. आमचा सिद्धांत लहानांत लहान जीवाला सुद्धां इष्ट जीवनाची संधी देण्यांतून प्रगट झाला पाहिजे. हें ध्येय डोळ्यासमोर ठेवूनच वेळोवेळीं केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण ( Centralisation and decentralisation, तसेंच शक्तियंत्र व शरीरयंत्र (Machine Power and man Power ) यांच्या मर्यादा परिस्थितीनुरूप ठरविल्या पाहिजेत आणि वेळोवेळीं त्यांचें शोधन झालें पाहिजे.

[ ५ ] अहिंसेची साधना सफल व्हावयाला बहुसंख्य संघटनाच हवी असें नाहीं. अहिंसेच्या सेवकानें आपल्या जीवनांत अहिंसेचे स्वतंत्र प्रयत्न करायला हवेत. विशेषतः आपल्या आचरणानें त्यानें इतरांना अहिंसेकडे आकर्षित केलें पाहिजे. पण एखादें संघटन बनविणेंच मुळीं चूक, त्याचें महत्व तें काय ? अशी मात्र त्याची समजूत असतां कामा नये. अहिंसेच्या साधकानें लोकांच्या सहकार्याची पर्वा करायची नाहीं असा यांतून अर्थ काढणें चूक आहे.

[ ६ ] सत्याग्रह्याकरितां अहिंसा ही केवळ परमधर्मच नाही तर स्वधर्मंहि आहे. म्हणून सुखदुःखाचा, नफानुकसानीचा, जयापजयाचा, सुखैनैव अंगिकार

करावयास त्यानें कचरतां नये. एवढेंच काय पण प्रसंगीं प्राणहि वेचावा लागला तरी चळतां कामा नये. या प्रकारची निष्ठा बाणण्यासाठीं ईश्वरोपासनेची व श्रद्धेची गरज आहे. ईश्वर, आत्मा किंवा विश्वतत्वाचें यथार्थ ज्ञान, तसेंच अभय सेवावृत्ति आत्मसंमानादि गुण आणि प्रार्थना, यम, नियम, प्रेम यांनीं युक्त अशी जीवननिष्ठा या तिन्हीतूनहि श्रद्धा उत्पन्न होते.

## ३ साधना–आचरण.

[ १ ] वर दिलेले आदर्श व सिद्धांत सफल व्हावेत म्हणून आवश्यक जीवन-परिवर्तन व तत्प्रीत्यर्थ करावा लागणारा त्याग किंवा बलिदान यासाठीं अहिंसेच्या साधकानें सदैव तयार असावें.

[ २ ] आपल्या व्यक्तिगत जीवनांतच सर्वप्रथम त्यानें अहिंसेची योजना केली पाहिजे. नातलगांशीं, मित्रांशीं, शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं आणि भोंवतालच्या समाजाशीं त्याचें वर्तन अहिंसामय असलें पाहिजे. या सर्वांशीं होणारी त्याची वर्तणूक प्रेमपूर्ण असली पाहिजे. त्यांच्याशीं एखाद्या मुद्यावर जर त्याचा मतभेद झाला किंवा त्यांचें एखाद्या बाबींतलें वागणें जर त्याला गैर वाटलें तर त्यापासुन त्यांना परावृत्त करतांनाहि अहिंसेचाच त्यानें उपयोग केला पाहिजे. इतकेंच नव्हे तर आपलें शरीर, धन अथवा अब्रू ह्यांचा प्रश्न अडवला असतां तन्निवारणार्थ साधकानें कोर्टकचेऱ्या किंवा पोलीस यांच्याकडे दाद मागतां कामा नये.

( ३ ) स्वतःची किंवा स्वजातीयांची मालमत्ता, प्राण व प्रतिष्ठा यांचा बचाव करण्यासाठीं अथवा तंटेबखेडे मोडण्यासाठीं हिंसक उपाय योजावयाचा विचार देखील त्यानें मनांत आणतां नये. उलट असले प्रश्न सोडविण्यासाठी अहिंसेचाच मार्ग शोधला पाहिजे. प्रसंग पडलाच तर प्राणांतिक संकटें किंवा मृत्यूहि पत्करण्याची त्याची तयारी असायला पाहिजे.

( ४ ) व्यक्तिगत व सामाजिक जीवनांत हिंसा घडते किंवा घडण्याचा संभव निर्माण होतो. तो कां म्हणून ? याचें खरें कारण शोधून काढण्याचा तो सारखा प्रयत्न करीत राहील. हिंसेच्या मार्गानें जाणाऱ्या अथवा तिचें अवलंबन करण्याचा इरादा करणाऱ्या पक्षांमध्यें विचारणीय मुद्दा असला तर तो नजरेआड करणार नाहीं. एवढेंच नव्हे तर समाजालाहि त्याची जाणीव करून देईल आणि

त्यांची गाऱ्हाणीहि दूर करण्याचा तो प्रयत्न करील. याप्रकारें समाजाला वळविण्यांत त्याला यश आलें नाहीं तर तो हिंसेचा अवलंब करणाऱ्या पक्षांकडे जाऊन त्यांना अहिंसक उपाय योजण्याची विनंती करील, आणि इतकेंहि करून यश नच आलें तर दोन्ही पक्षांविरुद्ध सत्याग्रहाच्या अनुष्ठानाचा योग्य मार्ग तो शोधील.

( ५ ) लोकांवर आपत्ति कोसळली असतां स्वतः धोका पत्करूनहि तो त्यांच्या मदतीला धावून जाईल.

( ६ ) या सर्व गोष्टी त्याला कळतात याचें बाह्य प्रत्यंतर म्हणून साधकानें खालील गोष्टींचा अवलंब करीत रहावें.

क त्यानें अस्पृश्यता, उच्चनीच भेदभाव आणि पंक्तिभेद सपशेल सोडला पाहिजे.

ख जातगोत, प्रांत, संप्रदाय, भाषा यामुळें निर्माण होणाऱ्या संकुचित अभिनिवेशापासून त्यानें सर्वतोपरी अलिप्त असलें पाहिजे.

ग त्याच्या मनांत सर्वधर्मांबद्दल समतेची सहजभावना असली पाहिजे.

घ स्त्रीपुरुष व्यवहार व वित्त व्यवहार या बाबतींत त्यानें शुद्धचरित असावें.

च त्यानें नेमानें कांतावें, खादी वापरावी, ग्रामोद्योगाला प्रोत्साहन द्यावें.

छ सार्वजनिक सेवेंत आणि विशेषतः रचनात्मक कार्यांत त्यानें नेमानें भाग घ्यावा. त्यासाठीं मेहनत करावी, झीज पण सोसावी.

ज सार्वजनिक संस्थांतून काम करीत असतांना अधिकारलालसेचा त्याला विटाळ देखील व्हायला नको बनवाबनवी अथवा खुशामत करून अधिकार मिळविण्याची यातायात तर तो कधी करणारच नाहीं. हेच काय पण अहिंसेपायीं केवढीहि महत्वाची जागा असली तरी तिचा त्याग करायला तो तत्पर राहील.

---

# ३ अहिंसेची सहजप्रवृत्ति

## १ भूमिका:

सन १९२२ किंवा २३ ची गोष्ट असेल. अमळनेर येथील तत्वज्ञानसंस्था पहावयास गेलों होतों. आता दिवंगत झालेले महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध अध्यापक त्यावेळेस तिकडे काम करीत असत. पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा सूक्ष्म अभ्यास करून पौर्वात्य तत्त्वज्ञान–विशेषकरून वेदांत–किती तरी श्रेष्ठ व पूर्ण आहे, हें दाखवून देण्याचा इकडील विद्वानांचा प्रयत्न आहे, असें त्यांनीं मला कळविलें. संस्थेची बरीच माहिती दिल्यावर त्यांनी आमच्या सत्याग्रहाश्रमाविषयीं विचारपूस केली. नंतर ते म्हणाले, 'पहा, मी खरें सांगतों. राग मानूं नका. आम्हांला तुमची ही अहिंसा मुळीच पटत नाही. गांधींचें हें एक वेड आहे. अहिंसा मानवस्वभावाच्या विरुद्ध आहे.'

सबंध महाराष्ट्रीय जनतेचें नसलें तरी महाराष्ट्राच्या ज्या सुशिक्षितवर्गानें आजपर्यंत महाराष्ट्राचें लोकमत बनविण्याचें काम व नेतृत्व केलें आहे, त्यांचें प्रतिनिधिस्वरूप म्हणून वरील मत आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

या विद्वान वर्गाला साहित्यिक व तार्किक दोन्हीं प्रकारच्या शक्तींचा कुशलतेने उपयोग करून स्वत:चें जें मत बनलें असेल, त्याचा प्रचार करण्याची कला साधलेली आहे. याहून दुसऱ्या प्रकारच्या मतांवर लोकांची श्रद्धा बसविण्याकरिता या विद्वानवर्गाच्या मनांतच आधीं क्रांति घडवून आणली पाहिजे. जोंपर्यंत त्यांचें मतपरिवर्तन आम्ही करूं शकत नाहीं, तोपर्यंत सामान्य जनस्वभाव निराळ्या प्रकारचा व अहिंसाशक्तीला अनुकूल असला, तरी लोकांना नि:शंक बनवितां येत नाहीं. सर्व चित्तशक्तींचा असा धर्म आहे कीं, साशंकअवस्थेंत त्या कधीं आपलें पूर्ण व बलवान स्वरूप प्रकट करूं शकत नाहींत. रोगाचे जंतु एका निरोगी शरीरांत दाखल करविणें जितकें सोपें तितकें त्यांचें तेथून उन्मूलन करणें जसें सोपें नसतें, तसेंच शंका निर्माण करणें जितकें सोपें आहे, तितकें तिचें निरसन करणें सोपें नसतें. त्याला केवळ साहित्यिक व तार्किक कला पुरेशी पडत नसून बरेच प्रत्यक्ष प्रयोग वरचेवर करून दाखवून अनुभवाने पटवून देण्याची व लोकांच्या वृत्तींना निराळे संस्कार व वळण लावण्याचीहि जरूरी असते. तेव्हां अशा कामीं

अहिंसा शक्तीचा पुरस्कार करणारे साहित्यिक व तर्कशास्त्री यांचा फारसा उपयोग नसून त्या शक्तीच्या कुशल सेनापतींचा अधिक उपयोग होणार आहे. त्यांनी आपल्या अहिंसेच्या प्रयोगाच्या द्वारें विद्वानांचें मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करावा. तें साधेलच, असें म्हणतां येत नाहीं. कारण, एक वेळ लहानपणापासून बनलेलें मत सहसा बदलत नाहीं. मत बदललें तरी स्वभाव बदलत नाहीं व बदलण्याचा प्रयत्न करणाऱ्याविषयीं मत्सर वाटण्याचाहि संभव असतो. बाब केवळ मताची नसून स्वभावाची असल्यामुळें मतपरिवर्तन करण्याकरितां प्रयत्न करणाऱ्याचा रागहि येतो; पण हल्लींच्या विद्वानांचें मत न बदललें, तरी अहिंसेचें सफल प्रयोग नवीन पिढीला निराळें वळण लावण्यास उपयोगी पडतील व साधारण जनतेच्या बुद्धीला लवकर पटूं लागतील.

तेव्हां ज्यांना आज अहिंसा पटली आहे त्यांनीं ज्या विद्वानांना ती पटत नाहीं त्यांचें साहित्य व तर्कद्वारा मतपरिवर्तन करवून आणण्याच्या भानगडींत पडण्यापेक्षां स्वतः अहिंसेचे सफल प्रयोग करून दाखविण्याचा व नव्या पिढींत अहिंसावृत्ति निर्माण करण्याचा प्रयत्न करावा असें मला वाटतें. पृथ्वी आपल्याभोंवतीं व सूर्याभोंवतीं फिरत आहे असें मानणाऱ्या लोकांना एके काळीं विद्वान लोक वेडे समजत. वायूपेक्षा भारी वस्तूचें बनलेलें विमान हवेंत उडूं शकेल हें एका काळच्या वैज्ञानिकांना असंभवनीय वाटत असे. तसेंच आज अहिंसेचे आहे. अहिंसा ही साधारण जनस्वभावाच्या विरुद्ध आहे, विकासवादी वैज्ञानिकांनीं निरूपण केलेल्या, प्राणिमात्रांत असणाऱ्या आत्मरक्षणाच्या प्रेरणेंतून हिंसेचा उद्भव आहे व त्याअर्थीं अहिंसा ही निसर्गाविरुद्ध आहे इ. अभिप्राय मानसशास्त्री, विज्ञानशास्त्री इत्यादिकांनीं जोरानें प्रकट केले, तरी ज्यांना अहिंसा पटली आहे, त्यांनीं शांतपणें आपल्या अनुभवाच्या मार्गानें पुढेंपुढें पाऊल टाकीत गेलें पाहिजे.

## २ सामाजिक वैशिष्ट्यांच्या बाबतींतील भ्रम

प्रत्येक माणसाची एक विशिष्ट प्रकृति असते. एकेका समाजाचीहि एक विशिष्ट प्रकृति असते, असें म्हणण्याचा प्रघात आजकाल पुष्कळच वाढत चालला आहे. महाराष्ट्रीय स्वभाव अमुक, गुजराती अमुक, बंगाली लोक असे, कानडी तसे, मुसलमान झाला म्हणजे अमुक असावयाचाच, असलीं मतें आम्ही अलीकडे फारच बोलूं लागलों आहोत. गुजरात्यांनी महाराष्ट्रियांविषयीं

किंवा महाराष्ट्रियांनी गुजराती लोकांविषयीं अमुक समजूत करून घेणें, हा अल्प अनुभवाचा परिणाम होय. शहाण्या लोकांनी तसे विचार पसरवूं नयेत व आपल्या लोकांच्या अशा समजुती दूर करण्याचा प्रयत्न करावा. अशा समजुतींमुळें फायदा कांहीच होत नाहीं. त्यामुळें आक्षेपित समाजाच्या लोकांचा स्वभाव कांही निराळ्या प्रकारचा बनतो, असें नाहीं. उदाहरणार्थ, महाराष्ट्रांत अशी समजूत असली कीं, गुजराती लोक भावनाप्रधान असतात, किंवा देशस्थांत समजूत असली कीं, कोकणस्थ भावनाशून्य असतात, किंवा कोकणस्थांची समजूत असली कीं, देशस्थ गैरशिस्त असतात, तर त्यामुळें जे गुजराती व्यवहारकुशल असतील, जे कोकणस्थ भावनाप्रधान असतील, किंवा जे देशस्थ व्यवस्थित असतील त्यांना निराळें वळण लागण्याचा संभव नाहीं.

पण जेव्हां एका समाजाचे लेखक व वक्ते स्वतःच्या लोकांविषयीं असे उद्गार काढूं लागतात कीं, आम्ही असे किंवा तसे, आम्हांस अमुक पटेल, अमुक पटणारच नाहीं. आमच्या रक्तांतच अमुक आहे किंवा अमुक नाहीं, आमची अमुक परंपरा आहे, तेव्हां ती एक भयंकर बाब बनते. कारण तशी गोष्ट वारंवार सांगत राहिल्याने ते स्वभावसंस्कार नसले, तरी असले उद्गार ऐकत राहणाऱ्यांवर हळुहळू त्याचा परिणाम होतो. गांधी गुजराती म्हणून आम्हांला नको, अहिंसा भावनामय म्हणून आम्हांला नको, लोकमान्यांनी अहिंसा सांगितली नाहीं म्हणून ती आम्हांला नको, समर्थांच्या राजकारणांत हिंसेला किंवा मुसलमानाविषयीं द्वेषाला मान्यता आहे, म्हणून आम्हांस अहिंसा किंवा ऐक्याच्या गोष्टी नकोत, तुकाराम महाराजांनीहि दुष्टांच्या नाशाला मान्यता दिली आहे म्हणून आमच्या प्रांताला अहिंसाधर्म योग्य नाहीं; अहिंसा ही जैन-बौद्धांची हिंदूंची नव्हे म्हणून ती आमच्याकरितां नव्हे, वगैरे संस्कार मनावर पडत राहिल्यानें अहिंसावृत्ति निर्माण होणें शक्य व योग्य असलें, तरी ती चित्तांत मूळ धरूं शकत नाहीं.

सबब शहाण्या माणसांनी प्रत्येक सद्-असद्-वृत्तीला प्रांत-स्वभाव बनविण्याचा प्रयत्न करणें योग्य नव्हे. जर हिंसाच योग्य असेल तर ती केवळ महाराष्ट्रांत पक्की बनून चालणार नाहीं. जर अहिंसाच योग्य असेल तर तिचा केवळ गुजरातेंत विकास होऊनहि भागणार नाहीं. हिंसा, अहिंसा किंवा दोहोंचे तारतम्ययुक्त

मिश्रण-जें कांही मानवोन्नतीला योग्य असेल, तें प्रत्येक माणसांत बिंबविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हिंसा-अहिंसा, दया-क्रोध, क्षमा-दंड वगैरे वृत्ति आहेत, कर्मे नाहीत. वृत्तींत व्यक्तिगत विशेषता-न्यूनाधिकता-राहील, पण भौगोलिक किंवा जातीय निमित्ताने विशेषता तिच्यांत असूं नये, निदान निर्माण करण्याचा तरी प्रयत्न करूं नये. कर्मांत तसें करतां येईल. जसें, समुद्रकाठीं राहणाऱ्या लोकांत परंपरागत नौकाकौशल्य निर्माण झाल्यास अस्वाभाविक कांही नाही. देशांवर राहणाऱ्या जनतेंत कृषिकौशल्य निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यांत हरकत नाहीं, पण अहिंसा-शौर्य-भय-उदारता कृपणता वगैरे गुणांच्या वृत्ति सर्वत्र सामान्यपणे विकसित झाल्या पाहिजेत.

तात्पर्य हें की, अहिंसा हीनवृत्ति असेल तर ती कुठेंच नसावी उदात्त असेल आणि महाराष्ट्रानें त्यावर आजपर्यंत मेहनत घेतली नसेल तर त्यापुढे मेहनत घ्यावी. ती कमविण्याचा प्रयत्न करावा. प्रान्तीय अभिमानानें तिचा निषेध करणें तर्कशुद्ध तर नाहींच, पण स्वार्थसाधकहि नाहीं.

## ३ केवळ प्रकृत प्राणी

काम-क्रोध-लोभ-भय वगैरे प्रमाणेच अहिंसा-दया-क्षमा-औदार्य ह्या प्राणिमात्रांतील नैसर्गिक वृत्ति आहेत. अहिंसेचा अंशहि नाही असा एकदेखील प्राणी जन्मास आलेला नाही. तसेंच हिंसावृत्तिशून्य प्राणीहि कधी जन्मास आलेला नाहीं.

मनुष्येतर प्राण्यांत ह्या विविध वृत्तींचा विकास प्रत्येक योनींत कांहीतरी एका विशिष्ट प्रकारचा झालेला आहे. ही गाय गरीब आहे व ही मारकी आहे, वगैरे वैयक्तिक भेद आढळून येतात खरे; पण साधारणतः ते भेद लहानशा कक्षेंत राहतात. मनुष्यांनी ज्या प्राण्यांना पाळून ठेवलें आहे त्यांच्यांतच कदाचित् हे वैयक्तिक भेद निर्माण होतात. कावळे, चिमण्या, गिधाडें, घारी वगैरे मनुष्यानें परतंत्र न केलेल्या प्राण्यांत जातिस्वभावच बहुतेक असतात. वैयक्तिक स्वभावभेद निदान लक्षांत येतील एवढे तरी नसतात.

पण माणसाची गोष्ट निराळी आहे. प्रत्येक व्यक्तीनें तसेच भौगोलिक, राजकीय, धार्मिक किंवा जातीय निमित्तानें संबद्ध असलेल्या प्रत्येक मानवसमाजानें ह्या वृत्तींचा विकास किंवा ऱ्हास निरनिराळ्या प्रमाणानें केलेला आढळतो. मनुष्य केवळ निसर्गावलंबित राहिलेला नसल्यानें तो प्रयत्नपूर्वक स्वतःच्या वृत्तींत फरक करीत राहतो.

असें असुनहि एका पिढींत किंवा एका व्यक्तीच्या जीवनांत तो फरक त्याला अमुक मर्यादेंतच घडवून आणतां येतो. प्रकृतिधर्म अगदीं बदलुन टांकतां येत नाहीं. म्हणूनच गीताकारांना म्हणावें लागलें की—

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥

आणि अर्जुनाचा जातिस्वभाव ओळखून त्यास म्हणावें लागलें कीं—

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात् करिष्यस्यवशोऽपि तत् ।

तात्पर्य हें कीं मनुष्यांत निरनिराळे स्वभाव व वृत्ति निर्माण करण्याचा जरी एका बाजूनें सतत प्रयत्न प्राचीन कालापासुन प्रत्येक समाजांत चाललेला आहे तरी एका कालावधींत किंवा एका व्यक्तींत त्या प्रयत्नास मर्यादित यशच मिळू शकतें. ह्या प्रयत्नानाच संस्कृति, संस्कारधर्म, शिक्षण, तालीम, सिविलिझेशन, कल्चर इ. म्हणायचें !

ह्या प्रयत्नांना आणखीहि एक मर्यादा आहे. संस्कार बदलण्याचे कितीहि प्रयत्न केले तरी मूलवृत्तीचा समूळ उच्छेद करणें कधींच शक्य नाहीं. म्हणजे जर अहिंसा ही मानवस्वभावाची एक मुलवृत्ति असेल, तर तिचा एक व्यक्ति किंवा एका समाजांतून समूळ उच्छेद शक्य नाहीं. प्रफुल रूपानें न राहिली, तरी बीजरूपानें ती राहीलच. तिची वेल मोठ्या क्षेत्रांत पसरली नाही तरी लहानशा क्षेत्रांत पसरेलच. मोठी फळें तिनें न दिलीं, तरी लहान फळें देईल. एका पिढीत नाहीशी झाल्यासारखी वाटली, तरी दुसऱ्या पिढींत दिसुन येईल; पण अहिंसाशून्य व्यक्ति किंवा समाज निर्माण करतां येणार नाही. तसेंच जर हिंसा ही मूलवृत्ति असेल तर तिच्या विषयींहि हेंच म्हणावें लागेल.

तेव्हां आधी शोधायचें तें हें कीं, अहिंसा व हिंसा ह्यापैकी मानवाची मूलवृत्ति कोणती आहे व दोन्ही मूलवृत्ति असल्यास त्यांचा मेळ कसा बसवायचा ?

हें शोधण्याकरितां अहिंसा हिंसा ह्या शब्दांना निश्चित अर्थ देऊन टाकणें जरूरीचें आहे. तसें न केल्यास पुष्कळशी चर्चा व्यर्थ जाण्याचा संभव आहे.

## ४ हिंसा आणि अहिंसा म्हणजे काय ?

बीजरूपानें पाहिल्यास अहिंसा म्हणजे स्वतःच्या शारीरिक, वाचिक किंवा मानसिक इच्छा, कल्पना, आदर्श, सुख, गरजा वगैरे दाबून दुसऱ्या जीवाला सुख देण्यास, त्याचें दुःखनिवारण करण्यासाठीं स्वखुशीनें झीज सोसण्याची वृत्ति; व हिंसा म्हणजे दुसऱ्या जीवाच्या शारीरिक, वाचिक किंवा मानसिक इच्छा, कल्पना, आदर्श, सुख, गरजा वगैरेची पर्वा न करतां स्वतःचीच सुखप्राप्ति किंवा दुःखनिवृत्ति करण्याची वृत्ति.

ह्यांत दोन गोष्टी आहेत. अहिंसेंत दुसऱ्याकरितां स्वतः झीज सोसावी व त्यांत समाधान मानावें, अशी स्पष्ट मानसिक वृत्ति आहे. हिंसेंत दुसऱ्यास दुःख द्यावें किंवा व्हावें अशी स्पष्ट वृत्ति असलीच पाहिजे, असें नाहीं. मात्र स्वतःस सुख व्हावें किंवा दुःख न व्हावें, व त्यामुळें दुसऱ्याच्या सुखदुःखाची पर्वा नसावी, एवढें आहेच. पहिल्यांत स्पष्ट भावना झीज सोसण्याची, दुसऱ्यांत स्पष्ट भावना स्वार्थसिद्धीची, जीवनाभिलाषेची ! ज्या वेळेस जीवनाभिलाषा सुलभपणें सिद्ध होत नाहीं, त्या वेळेस या बेपर्वाईतून कठोरतेचा उद्भव होतो. प्राणिमात्रांत सहजपणें असलेल्या हिंसेत परिस्थितीमुळें झालेली ही विकृति होय. ती नेहमी आवश्यक नसल्यामुळें तो प्राणिस्वभाव आहे, असें म्हणतां येणार नाही.

प्राणी ज्या वेळेस दुसऱ्याविषयीं उदासीन किंवा कठोर होतो, त्या वेळेस तो हिंसक होतो. जेव्हां तो दुसऱ्याविषयीं मोहानें, कारुण्यानें किंवा दुसऱ्या कोणत्याहि भावनेने प्रेरित होऊन आपली उदासीनता किंवा कठोरता सोडून, त्याविषयीं काळजी करू लागतो त्या वेळेस तो अहिंसक बनतो. प्रत्येक प्राण्याच्या ठायीं ह्या दोन्ही वृत्ति निसर्गतःच आहेत. जर दुसऱ्याकरितां झीज सोसण्याच्या वृत्तीचा निसर्गतः अभाव असता व ती मागाहून कमावून कृत्रिमपणें प्राप्त झालेली असती, तर जगांत प्राणिसृष्टीचा संभवच नव्हता. जतुमात्र आपल्या अपत्याकरितां, अनेकदा आपल्या जाति व बांधवांकरितां, केव्हां केव्हां इतर जातींकरितांसुद्धां नित्य व नैमित्तिकपणें स्वतः झीज सोसतो, म्हणूनच जीवांचें सर्जन व पोषण होतें. ज्या योनींत समूह जीवनांचा विकास झालेला आहे, त्यांच्यांत ही वृत्ति विशेष प्रमाणांत वाढलेली आहे. मनुष्य त्यांपैकी एक होय.

एका बाजूनें पाहिल्यास मनुष्येतर प्राण्यांत स्वार्थसिद्धीच्या वृत्तीपेक्षां झीज सोसण्याची वृत्ति जास्त बलवान् आहे असेंहि आढळून येईल. स्वार्थसिद्धीकरितां इतर जिवांचा नाश ते करतात खरे; पण त्यात पुष्कळच मर्यादा आहे. एखाद्या वेळेस एकाच जातीच्या दोन व्यक्तींमध्यें भांडण होऊन एकमेकांचा प्राणहि ते घेतील; पण हिंस्र प्राण्यांतसुद्धां असें आढळून येत नाहीं कीं एका योनीच्या दोन टोळ्या एक दुसऱ्यावर आक्रमण करून युद्ध करीत आहेत. एका जातीचे उंदीर दुसऱ्या योनीच्या उंदरांचा कदाचित् नाश करीत असतील, पण एकाच योनीचे एक समूह स्वयोनीच्या दुसऱ्या समूहावर टोळ्या बनवून भांडत नाहींत. अर्थात् मनुष्येतर प्राण्यांच्या जीवनांत साधारणपणें व्यक्तिगत हिंसावृत्ति आहे. इतर योनीच्या प्राण्यांच्या नाशाकरितां एखादेवेळीं हिंसेचे तात्कालिक संघटणहि दिसून येतें, पण साधारणपणें हिंसक संघटण-संघटित हिंसा—आढळत नाहीं.

पण समूहजीवन कंठणाऱ्या सर्व प्राण्यांत थोड्या अधिक प्रमाणांत तरी अहिंसेचें संघटण असतेंच. अहिंसावृत्तींचा परिपोष झाल्यावरच समूहजीवन कंठण्याची प्राण्याच्या ठायीं पात्रता येते म्हणा, किंवा अन्य कोणत्याहि कारणांमुळें जीवन कंठण्याची वासना निर्माण झाल्यावर अहिंसक संघटनेच्या आवश्यकतेची जाणीव उत्पन्न होते म्हणा, अहिंसेचें संघटन व समाजजीवन यांचा परस्पर समवाय-संबंध आहे, असें प्राणिजीवनाचें निरीक्षण केल्यास प्रत्ययास येईल.

अहिंसक संघटणाच्या बाबतींत मनुष्य हा अपवादरूप प्राणी नाहीं. मनुष्य अत्यंत जंगली अवस्थेंत असला किंवा अत्यंत अद्यतन 'सुधारलेल्या' अवस्थेंत असला, तरी व्यक्तींनी व्यक्ति व कुटुंबाकरितां, कुटुंबांनी जातीकरिता, जातींनी राष्ट्राकरिता, राष्ट्रांनी अखिल मानवसमाजाकरितां विवेकबळानें किंवा भावनाबळानें झीज सोसली तरच समाज म्हणून जगतां येईल. व्यवस्थित समाजाच्या स्थापनेचेंच दुसरें नांव अहिंसेचें संघटण असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पण मनुष्य व इतर प्राण्यांत एक मोठा भेद आहे. ज्यांना मनुष्यानें पाळून आपल्या ताब्यांत घेतलें आहे ते सोडून इतर सर्व प्राणी केवल प्राकृत आहेत. प्रकृतीच्या प्रेरणेनें ते वागतात व तिच्या नियमांच्या आधीन होऊन ते राहतात. स्वप्रकृति किंवा बाह्य प्रकृतीला बदलण्याचा ते प्रयत्न करीत नाहींत. मनुष्यहि

निसर्गनियमांच्या व निसर्ग प्रेरणांच्या आधीन आहेच. पण अंशतः तो स्व व बाह्य दोन्ही प्रकृतींत बदलहि करतो. तो बदल विकृत व संस्कृत दोन्ही प्रकारचा असतो. म्हणजे मनुष्य हा प्राकृत, विकृत व संस्कृत असा त्रिविध प्राणी आहे. त्रिगुणाप्रमाणें प्रकृति, विकृति व संस्कृति या तिन्ही कृती माणसांच्या ठिकाणीं कमी-जास्त प्रमाणांत असतात.

ह्यामुळें मनुष्याचें आचरण इतर प्राण्यापेक्षां प्रत्येक बाबतींत निराळें स्वरूप धारण करतें. उदाहरणार्थ. वर जसें सांगितलें कीं एखाद्या प्राण्यांत निमित्ताचा थोडा अपवाद केल्यास हिंसेचें म्हणून स्वतंत्र संघटण नसतें. जीवनाभिलाषा असूनहि स्वजातिशत्रुत्व साधारणपणें नसतें. उलट अहिंसक संघटणानेंच जीवनाचें धारण-पोषण विशेष चांगल्याप्रकारें साधतें, अशी त्यांची श्रद्धा असावी, असें त्यांच्या वर्तनावरून दिसतें. आपलें खाद्य जीव सोडून इतर प्राण्यांना फाडून खाण्याची त्यांच्यांत साधारणपणें वृत्ति उद्भवत नाहीं. पण मनुष्यांत अहिंसक संघटनाचा विकास झालेला आहे, त्याचप्रमाणें हिंसक संघटणाचाहि बराच विकास झालेला आहे, व स्वयोनिशत्रुत्वाची विकृति बलवानपणें प्रकटलेली असल्यामुळें तें संघटन केवळ खाद्य किंवा पीडक प्राण्यांच्या संहाराकरितां नसून निर्दोष प्राण्यांचा संहार व स्वयोनिसंहाराकरिताहि विकोपास गेलें आहे.

हिंसक संघटणाचा, म्हणजे युद्धाच्या तयारीचा, प्रश्न आमच्यापुढें कां आहे, याचें कारण एकच आहे. तें हें कीं, मनुष्यांत भयंकर प्रमाणांत स्वयोनिशत्रुत्व आहे. हजारो वर्षांच्या अनुशीलनानें तो गुण मानवांत रूढ झालेला आहे. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, तो गुण कितीहि प्राचीन असला तरी त्यानें प्रकृतीची संस्कृति झालेली नाहीं पण विकृति झालेली आहे. ज्याप्रमाणें क्षय किंवा कुष्ठ मनुष्यांत वेदकालापासून दिसत असलें, तरी, ते विकार आहेत, ते विकारच राहतील व उन्मूलनालाच पात्र समजले जातील; त्याप्रमाणें स्वयोनिशत्रुत्व आदम व ईवच्या कालापासून माणसांत उत्पन्न झालें असलें तरी तो विकार आहे व संस्कृतीचें काम त्याचें उन्मूलन करण्याचें आहे.

## ५ अहिंसा न्याय आणि साहाय्य

वरील सर्व विवेचन मान्य करूनहि वाचकांस एक प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे. " दुसऱ्याकरितां समाधानपूर्वक जो झीज सोसतो, त्याच्याविषयीं

आम्हांला कांहीं म्हणावयाचें नाहीं. पण जेव्हां एका बाजूला स्वार्थतृप्तीची विकृत वाढ व दुसऱ्या बाजूला समाधानपूर्वक नव्हे, पण निरूपायास्तव झीज सोसण्याची परिस्थिति असेल, त्यां वेळेस त्या दुसऱ्या पक्षाच्या स्थितीला प्राकृत किंवा संस्कृत यापैकीं एकहि विशेषण लावतां येणार नाहीं. तीस विकृतच म्हणावें लागेल. तुमच्याच व्याख्येंप्रमाणें झीज आहे, पण समाधान नाहीं, तर तीस अहिंसा म्हणतां येत नाहीं. त्याला भय, निःसहाय्यता वाटेल तें नांव द्या; पण ती विकृति आहे हें कबूल करावें लागेल. ''

ह्याप्रमाणें जेव्हां दोन्ही बाजूंस विकृति असेल, तेव्हां न्याय म्हणून एक विवेक उत्पन्न होतो. तो विवेक स्वार्थसाधुपक्षाचें संयमन व त्रस्त पक्षास मदत करण्यास निःस्वार्थी माणसास प्रेरणा देतो. चिमणी मांजराचें भक्ष्य आहे, मांजरानें चिमणी धरली तर वास्तविकपणें मांजरावर राग धरून मध्यें पडण्याचें आपल्याला कारण नसावें. पण चिमणी राजीखुषीनें मांजराचें भक्ष्य होत नाहीं, हें आपल्याला दिसतें. ती आपली प्राणहानि निरूपायानें पत्करते. म्हणून आमच्यांत न्यायवृत्ति निर्माण होऊन आपण चिमणीस सोडविण्यास प्रवृत्त होतों. असें करतांना मांजराला एखादेवेळीं आमच्या हातून रट्टाहि सहन करावा लागेल. पण या सर्व घटनेची विवेकानें पाहणी केली तर मांजरावर रागावण्याचें खरें पाहिलें तर कांहीं कारण दिसत नाहीं. उलट त्याची दया येते. तथापि असाच प्रसंग उत्पन्न झाल्यास आम्हीं दुसऱ्यांदाहि तसेंच वागूं. कारण सबल निर्बलामध्यें आपल्या स्वार्थी वृत्तीनें संघर्ष उत्पन्न झाल्यास सबलाचें नियमन व निर्बलांना मदत करावी अशी एक प्रभावी वृत्ति आमच्यांत आहे. ही अहिंसा कीं हिंसा ? शिवाय पुढें आमच्या किंवा इतर चिमण्यांच्या प्रेरणेने त्या चिमणीच्या ठिकाणीं मांजराला हाकून स्वसंरक्षण करण्याचें सामर्थ्य उत्पन्न झालें तर त्याला आम्हीं विकृति म्हणावें कीं कसें ? या सामर्थ्याच्या योगानें आम्हीं किंवा चिमण्या ज्यास्ती संस्कारी झालों असें कां म्हणूं नये ?

येथें मांजर व चिमणी भिन्न योनींतिले प्राणी आहेत, हें खरें. त्यांच्या करितां कायदा निराळा व माणसामाणसांचा निराळा, असें कदाचित् म्हणण्यांत येईल. पण तसें कां ? जर माणसांत एक व्यक्ति किंवा समूह मांजरासारखा झाला व दुसरा चिमणीसारखा झाला असेल, तर तेथेंहि तोच कायदा कां लागू होऊं नये ?

म्हणून तुमच्या अहिंसा–हिंसा विवेचनांत न्यायवृत्तीचें स्थान कुठें आहे हें स्पष्ट करा.

ह्याचा आतां विचार करूं

विचार केल्यास आढळून येईल कीं, न्यायवृत्ति ही फक्त मानुषी वृत्ति आहे. इतर प्रकृतिवश प्राण्यांत न्यायवृत्ति म्हणून एखादी प्रेरणा नाहीं; पण प्राण्यांत साहाय्यवृत्ति म्हणून एक प्रेरणा आहे. स्वतः कष्ट सोसुनहि स्वयोनि किंवा इतर योनींतील दुसऱ्या प्राण्यांना मदत करणें, ही प्राणिमात्रांत असणारी एक वृत्ति आहे. तिच्याच मानुषी रूपाला आम्ही न्यायवृत्ति नांव देतों. म्हणजे न्यायवृत्ति ही प्राणिमात्रांत असणाऱ्या साहाय्यवृत्तीचें एक रूप आहे.

साहाय्यवृत्तीच्या क्षेत्रांत माणुस स्वतः येऊं शकत नाहीं. दुसरे प्राणी किंवा दुसऱ्यासह स्वतः येऊं शकतो. स्वतःकरितां खटपट करण्यांत साहाय्यवृत्ति नसून जीवनाभिलाषा–प्रकृतिधर्मगत हिंसा–आहे. इतरांकरितां खटपट करणें, ही साहाय्य-वृत्ति. तींत समाधानपूर्वक स्वतः झीज सोसण्याची वृत्ति आहे सबब ती अहिंसेच्या क्षेत्रांत येते.

पण सर्व वृत्तीप्रमाणें साहाय्यवृत्तीहि मानवयोनींत विकृत व संस्कृत दोन्ही प्रकाराची झाली आहे. मूळ मुद्दा न्यायवृत्तीला हिंसक किंवा अहिंसक ठरविण्याचा नसून, तिची प्राकृत, विकृत व संस्कृत स्वरूपें कोणतीं हा आहे. न्यायवृत्ति साहाय्य-वृत्ति–अहिंसेपासुन निराळी नसल्यामुळें अहिंसेची शुद्धी, तिचा विकास, संस्करण परिपोष होणें शक्य आहे.

तेव्हां हा प्रश्न सोडून आपण अहिंसक संघटणाच्या मूळ प्रश्नांचा विचार करूं.

## ५ आत्मरक्षणाचा प्रश्न

या बाबतींत वाचक प्रश्न काढतील–तुमचें हें सर्व म्हणणें घटकाभर मान्य करतों. आमच्यापुढें प्रश्न असा कीं, स्वयोनिशत्रुत्व हा विकार असला, तरी आज मानवसमाजांत अत्यंत दृढ झालेला आहे; कांहीं मानवी टोळ्या आमच्यावर आक्रमण करून येतील या धास्तींत आम्हाला नेहमी रहावें लागतें. त्या टोळ्यावर निराळे संस्कार घालण्याचें साधन आमचेंजवळ नाहीं. त्याचे पुढारी त्यांचे विकार वाढविण्याचेंच कार्य करीत असतात व निर्बल टोळयाच्या संहाराकरितां प्रचंड तयारी करीत असतात. तेव्हां आम्हांस देखील बलवान् हिंसक संघटना केल्यांवाचून तरणोपाय काय ?

समजा आजच हा प्रश्न आमच्यापुढे दत्त म्हणून उभा राहिला, किंवा जर आम्हांला आजच्या आज पूर्ण स्वराज्य प्राप्त झालें व देशाच्या भवितव्याबद्दल आम्हांला हवें तें करण्याची मोकळीक मिळाली तर देशाच्या रक्षणाकरितां या क्षणीं तरी आम्हांला हिंसक संघटणेची जरूरी राहील. कारण देशाच्या रक्षणाकरितां जें विशिष्ठ अहिंसक संघटण पाहिजे तें आमच्या जवळ नाहीं. आजच्या प्रांतीय कॉंग्रेस सरकारांना जशी पोलिसाची नित्य मदत व लष्कराची नैमित्तिक मदत घ्यावी लागत आहे व त्या संघटित रूपानें हिंसक सामग्री तयार ठेवावी लागत आहे तसेंच आजच जर स्वराज्य मिळालें, तर अखिल भारतीय कॉंग्रेस-सरकारला, तिचें ध्येय अहिंसा असलें तरी, तेंच करावें लागेल हें कबूल केलें पाहिजे.

पण आज ज्यांच्यावर देशरक्षणाची जबाबदारी आहे, त्यांचें मत या बाबतींत एवढें निश्चित आहे कीं, हिंदुस्थानानें एकमतानें हिंसक साधनांचा निषेध केला व त्या बाजूनें त्यांच्या कामांत अडथळे घातले, तरी ते स्वार्थ समजून हिंदुस्थानला परकीय आक्रमणापासून सुरक्षित ठेवण्याकरिता आवश्यक ते सर्व उपाय योजतील.

यामुळे आमच्यापुढे हा देशरक्षणाचा प्रश्न या क्षणीं उभा राहिलेला नाहीं; पण भविष्यकाळीं तो अहिंसेने सोडविणें झाल्यास तें शक्य आहे कीं काय? व जर शक्य असेल तर त्याच्याकरिता आजपासून कोणते उपाय योजले पाहिजेत ह्या दृष्टीने याचा विचार करूं या. या बाबतींत एक महत्वाची गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. ती ही कीं, ज्या मानानें एका प्रजेचें अहिंसक संघटण बलवान् असेल त्याच मानानें तिचें हिंसक संघटणहि बलवान् बनूं शकेल. जर अहिंसेचें संघटण निर्बल असेल, तर हिंसेचें संघटणहि निर्बल राहील. सामान्य भाषेंत म्हणावयाचें तर ज्या मानानें एक प्रजा सुसंघटित, व्यवस्थित, स्वावलंबी व एकदिल असेल त्या मानानें ती दुसऱ्या प्रजेशीं सामना करण्याकरितां सुसंघटित, व्यवस्थित व एकदिल बनूं शकेल. ज्या प्रजेंत आपसांत फूट, अव्यवस्थितपणा, परावलंबन, बहुशाखाबुद्धि इ. असतील, त्या प्रजेला बलवान्, हिंसक, संघटणहि करतां येणार नाहीं. हिंदूंना मुसलमानांशीं, मुसलमानांना हिंदूंशीं, सर्व हिंदी लोकांना इंग्रजांशीं, किंवा सर्व साम्राज्याला जपान, जर्मनी इत्यादींशीं हिंसेचे उपाय योजावयाचे असले तर आपापल्या ध्येयाप्रमाणें सर्व हिंदूंनीं, सर्व मुसलमानांनी, सर्व हिंदींनी, अथवा साम्राज्यांतर्गत सर्व प्रजांनी आपसांत निष्ठेनें एक झालें पाहिजे. हिंदूंत आपसांत

फूट असली, मुसलमानांत फूट असली, हिंन्दीत फूट असली, साम्राज्यांतील निरनिराळ्या प्रजेंत आपसांत विरोध असला तर शत्रूच्या विरुद्ध बलवान हिंसक संघटणहि करणें शक्य नाहीं.

सारांश, असत्याला जशी स्वतंत्र प्रतिष्ठा नाहीं, कांहींतरी सत्याच्या आधारावरच तें निर्माण होतें, तद्वत् हिंसक संघटणाला स्वतंत्र प्रतिष्ठा नाहीं. अहिंसक संघटणाच्या आधारावरच तें निर्माण करतां येतें. म्हणून स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर अफगाणिस्थान, रशिया, जर्मनी, जपान वगैरेकरिता आम्हांला हिंसक साधनें ठेवावीं लागोत, आमच्या देशाचें अहिंसक संघटण पक्कें असल्याखेरीज हिंसेचीहि प्रभावी संघटणा करतां येणार नाहीं व विशेष प्रकारची अहिंसक संघटणाहि करतां येणार नाहीं, हें निर्विवाद आहे.

हिंसेचें संघटण म्हणजे युद्धाची जय्यत साधनसामग्री, कवायत व शीलसंपन्न लष्कर असें आम्ही समजतों. यांत युद्धाचें साहित्य किती व कोणत्या प्रकारचें असावें, तें त्या त्या वेळच्या वैज्ञानिक शोधावर अवलंबून राहील. अखेर तें निर्जीव साधन आहे व त्यांत प्रश्न पैशाचा व भांडारें भरण्याचाच आहे. पण लष्कर हें जिवंत साधन असून तें योग्य वळण मिळालेलें असणें ही मुख्य गोष्ट आहे. कारण जर शिस्तशील व निष्ठावान सेना नसेल तर सर्व अद्यतन साधनें असूनहि विजय प्राप्त होणें नाहीं.

कोणत्याहि देशांत अशा सैनिकांची संख्या इतर जनसंख्येच्या मानानें अंशमात्रच असते. युद्ध सुरू झाल्यावरहि प्रत्यक्ष युद्धकार्यांत सैनिक किंवा सेनेबरोबर असणारे लोक फार नसतात. त्यांतून अत्यंत मोठा भाग ( सैनिकेतर सिविलियन्सचा ) आपापल्या घरींच असतो. हा सैनिकेतर वर्ग अनेकप्रकारें झीज सोसून, अनेक प्रकारच्या गैरसोई सहन करून व सर्व कामें निभवून सैनिकांना मदत करतो. सैनिकवर्गांत केवळ धष्टपुष्ट तरुणच साधारणपणें असतात. बाकी सर्व आबालवृद्ध जनता अहिंसक संघटणद्वारा, पण हिंसेवर श्रद्धा जडल्यामुळें युद्धें चालविण्यास मदत करते. युद्ध यशस्वी होण्यास सैनिकेतर जनतेची अशी स्वतः झीज सोसून मदत करण्याची तत्परता बहुतांशीं कारणीभूत होते. सर्वसामान्य जनतेचें असें अहिंसक संघटण हिंसक युद्धाकरिताहि अनिवार्य आहे.

आंकडे तपासल्यास असें आढळून येईल कीं शेंकडा २५ माणसेंहि हिंसेच्या प्रत्यक्ष कामांत उपयोगीं पडत नाहींत. पण ह्या शेंकडा २५ तरुणांना

हत्येच्या कामाकरितां ( व तेंहि नेहमीं नव्हे तर एखादे वेळेस ) प्रवृत्त करण्याकरितां सदासर्वकाळ हिंसा हीच जणूं जीवन चालविण्याची किल्ली आहे, असा विकार जनतेच्या मनांत आम्हांला उत्पन्न करावा लागतो. युद्धाच्या रम्य कथा रचून, श समजलेल्या लोकांबद्दल अत्यंत द्वेष उत्पन्न होईल अशा खऱ्याखोट्या गोष्टी सांगून द्वेषबुद्धीनें व्यापलेलें वातावरण बालपणापासून निर्माण करावें लागतें आणि ह्या सर्व खटाटोपींचा उद्देश व फल काय तर होतकरू, तरुणांचा एक लहानसा भाग तयार व्हावा, जो त्यांच्या हातांत सांपडतील तितक्या विरुद्ध पक्षाच्या माणसावर सर्व प्रकारें आततायी कर्में करण्यास प्रवृत्त होईल व माणसांत स्वयोनीशत्रुत्वस्वरूपी विकृति जिवंत ठेवील, जी निसर्गविरुद्ध, नीतिविरुद्ध, धर्मविरुद्ध व अध्यात्मविरुद्ध आहे.

प्रचंड हिंसा करण्याकरितां अहिंसक संघटनाची अट आम्ही पुरी करतों. सर्व प्रजेंत ऐक्य स्थापितों, आपसांतील धार्मिक, प्रांतीय, जातीय, आर्थिक इ. तंटे व अन्याय नाहींसे करतों, प्रजेला स्वावलंबनानें आपलीं कार्यें करण्यास शिक्षण व प्रेरणा देतों, संयम व परिश्रमशीलतेचें वळण लावतों, एकमेकांकरितां परस्पर झीज सोसण्याच्या निसर्गदत्त वृत्तीचें सिंचन व अनुशीलन करून तीस पुष्ट करतों, मनुष्यजातीस इतर प्राण्यापेक्षां स्मृति, तर्क, विवेक, भाषा, वगैरेची जी विशेष देणगी आहे तिचा उपयोग मनुष्यजातीच्या एका लहानशा टोळीच्या भोगविलासाच्या सिद्धीकरितां नसून, सर्व मानवजातीच्या व इतर जीवाच्याहि हिताकरतां आहे, असा संस्कार आम्हीं देत राहतों. इतकें सगळें केल्यानंतर हिंसक राज्यें हिंसक सेनेकरितां विकारवश प्रजेंतून कांहीं शूर व साहसी सैनिकांची भरती करण्याची ज्याप्रमाणें आशा बाळगतात, त्याप्रमाणें वर वर्णन केलेल्या संस्कारी प्रजेंतूनच कांहीं शूर व साहासिक पण अहिंसक सैनिकांची भरती करण्याची आम्ही आशा बाळगली तर ? ती कां बाळगूं नये ?

‘ युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ’ असे शूर दोन्ही ठिकाणीं सारखेच लागतील. स्वदेशभक्ति दोन्ही ठिकाणीं सारखीच लागेल; पण हिंसक सैन्याला जें शत्रु म्हणून समजलेल्या प्रजेबद्दल भयंकर द्वेषबुद्धीने विकृत व्हावें लागतें, त्याऐवजीं अहिंसक सैन्याला शत्रुविषयीं सुध्दा कारुण्याची, दयेची व त्याच्याकरता झिजण्याची प्रफुल्लतर वृत्ति आपल्यामध्यें वाढवावी लागेल. योग्य मार्गानें प्रयत्न केल्यास हें अशक्य कां व्हावें ?

शौर्य हा कांहीं हिंसेच्याच अंगीं वसणारा गुण नाहीं. ती एक स्वतंत्र वृत्ति आहे. ती हिंसकातहि असूं शकेल व अहिंसकातहि असूं शकेल. आमच्या देशांतील संतांनीं हें फार पूर्वीपासून ओळखलेलें आहे.

'सती, शूर अरु संतका, तिनोंका एक तार।
जरे, मरे, सुख परिहरे. तब रीझे करतार।
तब रीझे करतार, सबै संसार सहावे।
नहिं तो होत खुवार, हार जीत सबही जावे ॥
दाखत ब्रम्हानंद महा दृढ अचल मतीका।
तीनों का एक तार, शूर अरु संत, सती का ॥

## ६ अहिंसक संघटनेची अमूल्यता.

पण वाचकांस एवढ्यानें कदाचित् संतोष होणार नाहीं. तो म्हणेल संतसंघ तयार करण्याकरितां तुम्हीं शिपायांची सेना तयार केली नाहीं. समजा तुमचें अहिंसा-निष्ठ लष्कर उत्पन्न होण्याचे आधीच एक शत्रु आक्रमण करून आल्यास देशाची काय अवस्था होईल ? लोकांवर तुम्ही अहिंसेचे संस्कार घालीत राहणार, त्यामुळें शिपायाला आवश्यक असणाऱ्या कठोरतेच्या गुणाची वाढ होणार नाहीं; मग आमचा वाखाच होणार नाहीं का ?

असें भय बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं, हें विचार केल्यास समजून येईल. शस्त्र व सैन्य उभें करण्याची आवश्यकता उत्पन्नच झाल्यास ज्या मानानें अहिंसेचें संघटण पक्कें असेल त्या मानानें शस्त्र व सैन्य निर्माण करणें सोपें जाईल. कारण प्रजेंत ऐक्य, सहकार्य, झीज सोसण्याची तयारी, स्वावलंबन आदि गुणांचा उत्कर्ष होऊन वर सांगितल्याप्रमाणें शौर्य हा गुण व्यवस्थितरीतीनें वास करील. प्रजेवर कर्तव्यकर्म म्हणून युद्ध येऊन पडल्यास तिला सज्ज होण्यास वेळ लागणार नाहीं.

संतांचें लष्कर तयार होऊं शकलें नाहीं, याचा अर्थ हा की, लोकांत कांहीं-तरी अंशानें मारक वृत्ति आहेच. सूक्ष्म हिंसा—जीवनाभिलाषा—ही कधीं प्राण्यांतून समूळ नाहींशी होणार नाहीं. ती शिस्तींत राहूं शकेल, विकृत होईल पण नाहींशी होणार नाहीं. शिवाय संस्कृतिपेक्षां विकृतींत एक मोठी क्षमता आहे. ती ही कीं, तिचा वेग गुणाकार पद्धतीनें वाढतो. वर चढायला क्षणोक्षणीं श्रम लागतात; शक्ति खर्च करावी लागते. खालीं पडायला मात्र एक धक्का पुरतो. पुढची क्रिया आपोआप व

हत्येच्या कामाकरितां ( व तेंहि नेहमी नव्हे तर एखादे वेळेस ) प्रवृत्त करण्याकरितां सदासर्वकाळ हिंसा हीच जणूं जीवन चालविण्याची किल्ली आहे, असा विकार जनतेच्या मनांत आम्हांला उत्पन्न करावा लागतो. युद्धाच्या रम्य कथा रचून, श समजलेल्या लोकांबद्दल अत्यंत द्वेष उत्पन्न होईल अशा खऱ्याखोट्या गोष्टी सांगून द्वेषबुद्धीनें व्यापलेलें वातावरण बालपणापासून निर्माण करावें लागतें आणि ह्या सर्व खटाटोपांचा उद्देश व फल काय तर होतकरू, तरुणांचा एक लहानसा भाग तयार व्हावा, जो त्यांच्या हातांत सांपडतील तितक्या विरुद्ध पक्षाच्या माणसावर सर्व प्रकारें आततायी कर्में करण्यास प्रवृत्त होईल व माणसांत स्वयोनीशत्रुत्वस्वरूपी विकृति जिवंत ठेवील, जी निसर्गविरुद्ध, नीतिविरुद्ध, धर्मविरुद्ध व अध्यात्मविरुद्ध आहे.

प्रचंड हिंसा करण्याकरितां अहिंसक संघटनाची अट आम्ही पुरी करतों. सर्व प्रजेंत ऐक्य स्थापितों. आपसांतील धार्मिक, प्रांतीय, जातीय, आर्थिक इ. तंटे व अन्याय नाहींसे करतों, प्रजेला स्वावलंबनानें आपलीं कार्यें करण्यास शिक्षण व प्रेरणा देतों, संयम व परिश्रमशीलतेचें वळण लावतों, एकमेकांकरितां परस्पर झीज सोसण्याच्या निसर्गदत्त वृत्तीचें सिंचन व अनुशीलन करून तीस पुष्ट करतों, मनुष्यजातीस इतर प्राण्यापेक्षां स्मृति, तर्क, विवेक, भाषा, वगैरेची जी विशेष देणगी आहे तिचा उपयोग मनुष्यजातीच्या एका लहानशा टोळीच्या भोगविलासाच्या सिद्धीकरितां नसून, सर्व मानवजातीच्या व इतर जीवाच्याहि हिताकरतां आहे, असा संस्कार आम्हीं देत राहतों. इतकें सगळें केल्यानंतर हिंसक राज्यें हिंसक सेनेकरितां विकारवश प्रजेंतून कांहीं शूर व साहसी सैनिकांची भरती करण्याची ज्याप्रमाणें आशा बाळगतात, त्याप्रमाणें वर वर्णन केलेल्या संस्कारी प्रजेंतूनच कांहीं शूर व साहसिक पण अहिंसक सैनिकांची भरती करण्याची आम्ही आशा बाळगली तर ? ती कां बाळगूं नये ?

‘ युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ’ असे शूर दोन्ही ठिकाणीं सारखेच लागतील. स्वदेशभक्ति दोन्ही ठिकाणीं सारखांच लागेल; पण हिंसक सैन्याला जें शत्रु म्हणून समजलेल्या प्रजेबद्दल भयंकर द्वेषबुद्धीने विकृत व्हावें लागतें, त्याऐवजीं अहिंसक सैन्याला शत्रुविषयीं सुध्दा कारुण्याची, दयेची व त्याच्याकरता झिजण्याची प्रफुल्लतर वृत्ति आपल्यामध्यें वाढवावी लागेल. योग्य मार्गानें प्रयत्न केल्यास हें अशक्य कां व्हावें ?

शौर्य हा कांहीं हिंसेच्याच अंगीं वसणारा गुण नाहीं. ती एक स्वतंत्र वृत्ति आहे. ती हिंसकातहि असूं शकेल व अहिंसकातहि असूं शकेल. आमच्या देशांतील संतांनीं हें फार पूर्वींपासून ओळखलेलें आहे.

'सती, शूर अरु संतका, तिनोंका एक तार।
जरे, मरे, सुख परिहरे. तब रीझे करतार।
तब रीझे करतार, सबै संसार सहावे।
नहिं तो होत खुवार, हार जीत सबही जावे॥
दाखत ब्रम्हानंद महा दृढ अचल मतीका।
तीनों का एक तार, शूर अरु संत, सती का॥

## ६ अहिंसक संघटनेची अमूल्यता.

पण वाचकांस एवढ्यानें कदाचित् संतोष होणार नाहीं. तो म्हणेल संतसंघ तयार करण्याकरितां तुम्हीं शिपायांची सेना तयार केली नाहीं. समजा तुमचें अहिंसानिष्ठ लष्कर उत्पन्न होण्याचे आधीच एक शत्रु आक्रमण करून आल्यास देशाची काय अवस्था होईल ? लोकांवर तुम्ही अहिंसेचे संस्कार घालीत राहणार, त्यामुळें शिपायाला आवश्यक असणाऱ्या कठोरतेच्या गुणाची वाढ होणार नाहीं; मग आमचा वाखाच होणार नाहीं का ?

असें भय बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं, हें विचार केल्यास समजून येईल. शस्त्र व सैन्य उभें करण्याची आवश्यकता उत्पन्नच झाल्यास ज्या मानानें अहिंसेचें संघटण पक्कें असेल त्या मानानें शस्त्र व सैन्य निर्माण करणें सोपें जाईल. कारण प्रजेंत ऐक्य, सहकार्य, झीज सोसण्याची तयारी, स्वावलंबन आदि गुणांचा उत्कर्ष होऊन वर सांगितल्याप्रमाणें शौर्य हा गुण व्यवस्थितरीतीनें वास करील. प्रजेवर कर्तव्यकर्म म्हणून युद्ध येऊन पडल्यास तिला सज्ज होण्यास वेळ लागणार नाहीं.

संतांचें लष्कर तयार होऊं शकलें नाहीं, याचा अर्थ हा कीं, लोकांत कांहींतरी अंशानें मारक वृत्ति आहेच. सूक्ष्म हिंसा—जीवनाभिलाषा—ही कधीं प्राण्यांतून समूळ नाहींशी होणार नाहीं. ती शिस्तींत राहूं शकेल, विकृत होईल पण नाहींशी होणार नाहीं. शिवाय संस्कृतिपेक्षां विकृतींत एक मोठी क्षमता आहे. ती ही कीं, तिचा वेग गुणाकार पद्धतीनें वाढतो. वर चढायला क्षणोक्षणीं श्रम लागतात; शक्ति खर्च करावी लागते. खालीं पडायला मात्र एक धक्का पुरतो. पुढची क्रिया आपोआप व

वाढत्या वेगानें होते. त्या वेगाचें नियमन करणें आवश्यक होतें, म्हणजे विकृतीला शिस्तीचें बंधन लागतें; अहिंसेनें सुसंघटित प्रजेंतील शिस्त सैल केली, म्हणजे हिंसा आपोआप वाढते. यामुळें अहिंसेच्या संस्कारानें हिंसक शक्ति नाहींशी होण्याची कधींच धास्ती नाहीं.

खरी गोष्ट अशी आहे कीं, प्राणिमात्रांस ज्या बाबतींचें ज्ञान सहजगत्या नकळत मिळतें, त्याचें महत्व व त्यांत साधलेला किंवा अपूर्ण राहिलेला विकास मुद्दाम विचार केल्याखेरीज त्याच्या ध्यानांत येत नाहीं; पण ज्यामागे त्यानें कृत्रिमपणें पुष्कळ श्रम घेतलेले असतात, त्याचें महत्व व त्यांत झालेली प्रगति त्याला सदैव आठवते. लहानपणापासुन आम्ही मातृभाषा नकळत शिकत असतों. दुसरी भाषा बोलणारे शेजारी-पाजारी असले तर त्यांची भाषाहि बोलूं लागतों, पण या भाषांचें महत्व व त्यांत झालेल्या प्रगतींचा अंदाज करण्याची आम्हांस बुद्धि होत नाहीं. पण इंग्रजी भाषा आम्ही पुष्कळ परिश्रम करून शिकतों, म्हणून त्याचें महत्वहि वाटतें व त्यांत केलेल्या प्रगतीचें वेळोवेळीं आपण मापहि काढतों.

न कळत झालेल्या प्रगतींचें व ज्ञानाचें आम्हांस एवढें अज्ञान असतें कीं, त्यांत बुद्धिपूर्वक प्रगति व्हावी, असें सांगणाऱ्यांना कांहीं वेळ विरोधहि सहन करावा लागतो. ज्याला दोन शाबूत पाय आहेत, त्याला चालणें, धांवणें व जिन्यावरून चढून जाणें सहज आहे. त्याला वाटतें कीं, त्यांत शिकावयाचें कांहींच नाहीं; म्हणून एखाद्या व्यायामविशारदानें जर सांगितलें कीं, चालणें, धावणें, व चढणें, ही देखील एक कला आहे व ती परिश्रमाने साध्य केली पाहिजे, तर पुष्कळांना तें म्हणणें आधीं हास्यास्पद वाटेल. तेंच हातावर उभे राहून चालणें, पोहणें, घोड्यावर स्वारी करणें, सायकल चालविणें वगैरे श्रमसाध्य कलांचें महत्व आम्हांला तत्काल पटतें.

अहिंसे-हिंसेची गोष्ट अशाच प्रकारची आहे. जगांत अहिंसेची-दुसऱ्याकरितां झिजण्याची-एक बलवान् प्रेरणा प्राणिमात्रांत सहजपणें असल्यामुळेंच अपत्यें वाढतात, प्राणी समूह बनवून राहूं शकतात; वाळवी, मधमाशी, मुंगीपासून मानवापर्यंत अनेक जीव व्यवस्थित समाजरचना करून त्या त्या जिवाच्या मानानें लहानमोठी राज्यरचनाहि निर्माण करतात. त्या सर्वांत नियमन, दंड, शिक्षा इत्यादि नसतात असें नाहीं; पण कोणताहि समाज त्यामुळेंच चालतो असें समजणें चुकीचें

आहे. ह्या गोष्टी अपवादात्मकच असतात आणि ज्या मानानें अहिंसक संघटणा बलवान असेल, त्या मानानें त्या उपायांचा उपयोग कमी असतो.

ह्या उपायांचा उपयोग करण्याची जरूरी पडणें, औषध किंवा इंजेक्शन देण्याची जरूरी पडणें, विकृति उत्पन्न झाल्याचें लक्षण होय. विकृतीची एखादेवेळी साथहि येऊं शकेल. त्यावेळेस त्या उपायांचा मोठ्या प्रमाणावर व व्यवस्थित उपयोग करण्याचीहि पाळी येते; पण ह्या मधून मधून उत्पन्न होणाऱ्या विकृतींशीं सामना करण्याकरितां मनुष्यसमाजाने फारच श्रम घेतले आहेत. त्यामुळें त्याची अशी श्रद्धा बनली आहे कीं, विकृतीवर उपाययोजना हेंच अध्यात्म, हाच धर्म व हेंच विज्ञान होय. हीच एक जीवनकला आहे. समाजव्यवस्थेंत, राजकारणांत तीच नीति होय. म्हणून दंडनीति, युद्धकला यांची प्रचंड शास्त्रें माणसांनीं निर्माण केलीं आहेत.

मनुष्याने पुष्कळच परिश्रम करून शेकडों वर्षांच्या अनुभवानें हीं प्रचंड शास्त्रें निर्माण केलीं आहेत, ही गोष्ट मला मान्य आहे; पण समाजाचे जे दोष टाळण्याकरितां ही उपाययोजना करावी लागते, ते दोष अद्याप कां जात नाहींत याचा विचार केला पाहिजे. युरोपमधून महारोग पूर्णतः नाहीसा झाला आहे; म्हणतात, देवीची बिमारी देखील नाहीशी झाली आहे; सबब, ज्या मार्गांनीं ते विकार गेले, त्यांत कांहीतरी उपाययोजना होती, असें मी कबूल करीन; पण तसें स्वयोनिशत्रुत्वाच्या रोगाचें नियमन कांही दिसत नाहीं. यांत कोठेंतरी चुकत आहे असें मला वाटतें.

हा दोष कोणता? समाजजीवनाचा जो मूळ पाया, ज्याच्यावर आम्हीं हिंसक संघटणा निर्माण केली आहे, तो पायाच आमचा कच्चा आहे. वर इमारत उभारण्याचे आधीं त्यावर जेवढी मेहनत घ्यावयास पाहिजे होती, ज्या दगडांनी तो भरला पाहिजे होता व ज्या तत्त्वांनीं ते दगड परस्पर जोडले पाहिजे होते, तो सर्व माल हलक्या तऱ्हेचा आहे; त्याचें शास्त्रीय संशोधनहि बरोबर झालें नाहीं. त्यावर फार कमी श्रम घेतले गेले आहेत. परिणाम असा झाला आहे कीं, ज्याप्रमाणें नालंदा विश्वविद्यालयाच्या इमारतींत वरच्या भागांत भव्य व मजबूत दिसणारी रचना असूनहि, खालची भूमीच कच्ची असल्यामुळें एकावर एक कितीहि रचना केल्या, तरी शेवटीं त्या सर्व इमारती निरुपयोगी होऊन, त्यांचा त्याग करावा

लागला, त्याप्रमाणें आमच्या समाजरचना व संस्कृति वरून सुशोभित व भव्य दिसतात; पण त्या पूर्णतेस येतात न येतात तोंच आपल्याच भारानें खालीं दबतात किंवा कोसळतात.

म्हणून आम्हांला संस्कृतीच्या पायाकडेच लक्ष्य दिलें पाहिजे व त्याचेंच शास्त्र आधीं अवगत केलें पाहिजे.

हें जर मान्य असेल, तर हें पक्कें समजलें पाहिजे कीं, समाजरूपी इमारतीची सुरक्षितता त्याच्या हिंसक संघटणेवर नसून अहिंसा संघटणेवर आहे. ज्याप्रमाणें प्रत्येकास चालतां व धावतां येत असतें, तरी चालण्याधावण्याचें एक शास्त्र आहे, त्याप्रमाणें प्राणिमात्रांत असलेल्या अहिंसा वृत्तीचें शास्त्रीय रीतीनें अनुशीलन झालें पाहिजे व समाजरचनेंत त्याचें शास्त्रीय पद्धतीनें संघटण केलें पाहिजे. त्यावर केलेली इमारत साधी असली, तरी ती टिकाऊ व सुखप्रद होईल. आस्ते आस्ते तिला सुंदरहि करतां येईल. तथापि कच्च्या पायावर केलेली सुंदर दिसणारी इमारत टिकणार नाहीं, सुखप्रदहि होणार नाहीं.

चष्मा, जोडे, दांत व अप–टु–डेट फॅशनचे कपडे घालून एखादा चिररोगग्रस्त तरुण सुरूप दिसतो, असें म्हणणें म्हणजे विरूपालाच सुरूप समजणें होय, त्याप्रमाणे मानवानें मानवांची हिंसा करून उभारलेल्या समाजरचनेला संस्कृति नांव देणें, म्हणजे विकृतीलाच संस्कृति समजणें आहे.

प्राण्यांत हिंसावृत्तीहि आहेच. जीवनाभिलाषेचेंच तें दुसरें नाम होय; पण त्यावर उपाय हिंसात्मक संघटण नसून, शास्त्रशुद्ध अहिंसात्मक संघटणच होय. योग्य मार्गानें व योग्य प्रकारें प्रत्येकाला आपलें जीवन चालविण्याची संधि मिळाली, म्हणजे त्या वृत्तीची तृप्ति होते. एखाद्या व्यक्तींत रोगाप्रमाणें किंवा एखाद्या वेळेस समाजांत साथीप्रमाणे ती प्रकट झाली तर त्या वेळेस तिचें निवारण करावें; पण त्यांतहि वरवरच्या ' कडक इलाजा ' पेक्षां व्यक्ति किंवा समाजाच्या पायांत कोठें गडबड झाली आहे, तेंच धैर्यानें शोधावें लागेल.

## ७ वीरता आणि अहिंसा

आमच्यांत विशेषेंकरून महाराष्ट्रांत एक भोळी समजूत पसरली आहे, ती ही की, हिंसावृत्ति व शौर्य हें एकच होय व हिंदुस्थानांत अहिंसा धर्मावर फार जोर दिला गेला म्हणून तो पराधीन होत गेला.

हिंसा व शौर्य ह्या अगदी भिन्न वृत्ति आहेत, हें मी वर सांगितलें आहे. प्राणी हिंसक असूनहि भ्याड असूं शकेल व अहिंसक असून शूर असूं शकेल; बहुतेक हिंसेबरोबर भयाचें वास्तव्य दिसूनच येईल. अहिंसेबरोबर ज्यांत स्पष्ट साहसिकता आहे, असें शौर्य कदाचित नेहमी आढळणार नाहीं; पण नसतेंच असेंहि नाहीं. हिंसा, अहिंसा, साहस, शौर्य वगैरे गुणावगुण वृत्तिनिरूपानें प्राण्यांत नैसर्गिक आहेत; पण परिश्रमपूर्वक अनुशीलनानें ते खऱ्या गुणरूपानें प्रकट होतात.

यापैकी आमच्या देशांत शौर्य हा गुण अगदी कमी होता किंवा झाला, असें कोणत्याहि काळीं दाखवितां येणार नाहीं. निदान विशिष्ट जातींनी तो परिश्रमपूर्वक नेहमीच वाढविलेला आहे; पण अहिंसा—विशेषेंकरून सामाजिक संघटित अहिंसा—हा गुण सदैव कमी पडलेलाच आढळून येईल. महाभारतकालाचा, रजपुतांचा, मोंगलांचा, शीखांचा किंवा महाराष्ट्राचा—कोणताहि इतिहास घ्या. त्यांत अश्वत्थामा-कर्ण-विवाद, शल्य—कर्ण—विवाद, जयचंदी दुफळी ह्यांची परंपरा आजपर्यंत कायम टिकून राहिली आहे, असें दिसेल. सेनापति मेल्यावर सैन्यांत अव्यवस्था, आपसांत भांडण व शेवटीं पळ हा कुरूक्षेत्राच्या युद्धापासून पानिपतच्या युद्धापर्यंत आमचा चालू इतिहास आहे. ह्यांत व्यक्तिशः सेनापति किंवा सैनिक शौर्यात कमी असल्याचें दिसत नाहीं, साहसांतहि कमी नाहीं. पण प्रेम, शिस्त, कर्तव्यबुद्धि यांची व्यापकता नाहीं, त्यांचें संघटण नाहीं. हें पुढाऱ्यांतच नसल्यामुळें अनुयायांतहि नाहीं. बुद्धिभेद व वैमनस्य उत्पन्न करणारें तर्ककौशल्य सदैव सुलभ. सर्वांना जोडणारी बुद्धि व कर्मकौशल्य सदैव उणें; कारण अहिंसा ही एक असंस्कृत, मूढरूपानें असलेली वृत्ति आमच्यांत व्यक्तिगत सर्वसाधारणपणें जोराची असूनहि तिचें सामाजिक अनुशीलन कधींच झालें नाहीं.

'अहिंसा परमो धर्मः' 'सत्यमेव जयते' इत्यादि घोष (स्लोगन्स) आमच्या देशांतच आहेत, असें आम्ही अभिमानानें म्हणतों. ब्रह्मचर्य, संयम, इंद्रियनिग्रह, आत्मानात्मविवेक, भूतदया, वैराग्य वगैरेंचा आमच्या संतांनीं पुष्कळच उपदेश केला आहे. त्यावरून सामान्यपणें आमची समजूत अशी झाली आहे कीं, ही आमच्या देशाची व्यापक आध्यात्मिक संस्कृति आहे. कांहींना असें वाटतें कीं, आम्ही त्याचा अतिरेकहि केला आहे.

परंतु ह्या उपदेशांकडे निराळ्या दृष्टीनेंहि पाहतां येईल. जे गुण एका समाजांत व्यापक असतील, त्यांचा वेळोवेळीं उपदेश करण्याची सामान्यपणें वृत्ति

होऊं नये. समाजांत ज्या गुणांचा बराच अनुभव येत नसेल पण ज्यांची आवश्यकता भासत असेल त्याबद्दल उपदेशक जोर देईल. संतांनी वरील गुणांचा सतत उपदेश केला आहे, यांचा अर्थ हा कीं, समाजांत त्यांना ह्या गुणांचें अस्तित्व चांगल्या प्रमाणांत आढळलें नाहीं. असा उपदेश करणाऱ्या संतांनीं दुसरीहि कांहीं प्रतिपादनें वेळोवेळीं केलीं आहेत. तीं अशीं कीं, संसार स्वार्थानें भरलेला आहे; सगेसोयरे सर्व आपापला स्वार्थच पाहतात; कोणी कोणाचा निःस्वार्थ आप्त होत नाहीं. इ. जीवनांत त्यांना काय अनुभव येत असे, ज्यांच्यांत पारमार्थिक वृत्ति आहे त्यांच्या वृत्तींच्या विकासाला आमच्या समाजात किती अडचणीं सोसाव्या लागत असत, सर्वांचा त्याग करणें हाच एक मार्ग आहे, असें त्यांना का वाटत असे याचें हें निदर्शक आहे.

उलटपक्षीं जे गुण आमच्यांत उत्कट होते, त्यांच्याकरितां आमच्या भाषेंत शब्दहि नव्हते व तत्समानवृत्तींचा निषेधहि संतांनी केला नाहीं, हेंहि विचार करण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, स्वदेशभक्ति, स्वदेशाभिमान हे शब्द जुन्या साहित्यांत सापडत नाहींत. वर्णाभिमान, जात्यभिमान वगैरेचा संतांनीं जोरानें निषेध केला आहे; कारण भूमिप्रेम नसणारा मनुष्य आमच्या देशांत नेहमी विरळाच आढळेल. आपलें शेत, आपलें गांव, आपला प्रांत सोडण्याची वृत्ति सहजपणें आमच्यांत उद्भवत नाहीं. हें सोडावें लागलें तर फारच यातना होतात. आपल्या शेतावरून कायदेशीर मालकी गेली, तरी त्याचा ताबा राखून ठेवण्याकरितां शेतकरी प्राण देईल व घेईलहि इतकें जबरदस्त भूमिप्रेम त्याच्या ठायीं असतें. आमचा वर्णाभिमान व जात्याभिमान तर प्रसिद्धच आहे. स्मृतिकारांनी त्याचें एवढें प्रबल शास्त्र बनवून ठेवलें आहे की, बुद्ध व महावीरांपासून आजपर्यंत प्रत्येक संतांनी त्याचा निषेध करूनहि त्याचें प्राबल्य आमच्या समाजांतुन जात नाहीं.

बुद्धापासुन गांधीपर्यंत जे कोणी आमच्या देशांत महान विचारप्रवर्तक होऊन गेले त्या सर्वांनी साधारण जनतेकरितां पांचच नियम सांगितले आहेत. चोरी करूं नये. व्यभिचार करूं नये. दारु पिऊं नये. मांस खाऊं नये. असत्य बोलूं नये ह्या पांचांपैकीं मांसाचा निषेध करण्याची तर हिंमतहि होत नाहीं. कोणी ऐकणार नाहीं, असें वाटतें; पण २५०० वर्षे झालीं तरी आम्हांला या पांच साध्या नियमाचाच सतत उपदेश करावा लागत आहे, त्यावरून आपली सर्वसाधारण संस्कृति काय आहे याची कल्पना करावी.

तात्पर्य हें की, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, वगैरेवर आमच्या देशांत बरेंच साहित्य व उपदेश झालेला आहे, यावरून सद्गुणसंपन्न संस्कृति ही आमच्या प्रजेची प्रकृति आहे, असें समजणें चुकीचें होईल. आमच्या प्रकृतीला त्या त्या गुणांनीं संस्कृत करण्याचा प्रयत्न शेंकडों वर्षांपासून चालू आहे. एवढेंच म्हणतां येईल. ह्या कामीं अनेक महान् पुरुषांनीं आपलें आयुष्य खर्च करूनहि आमची फारशी प्रगति झाली आहे असें म्हणतां येत नाहीं; कारण त्यांच्या कामांत विकृतिग्रस्त लोकांनीं फार विघ्नें आणलीं आहेत.

तथापि, अहिंसाप्रेरित माणसांना तो प्रयत्न सोडतां येत नाहीं.

## ८ वास्तविक आवश्यकता.

जर्मनी किंवा जपानचें आक्रमण झाल्यास कोणता अहिंसात्मक उपाय योजणार, हें आजच आम्हांला सांगा, हा प्रश्न अप्रस्तुत आहे. आज आमच्या पुढें प्रस्तुत प्रश्न, इंग्रज व आमच्या दरम्यान पारतंत्र्याचें जें बंधन आहे, तें कसें तुटावें व आम्ही कसें पूर्णपणें स्वाधीन व्हावें, हा आहे. त्याकरितां कोणताहि व्यवहार्य हिंसात्मक उपाय सांपडत नाहीं, असें हिंसावाद्यांनाहि वाटतें. शुद्ध नसली तरी जाड्याभरड्या अहिंसेनेसुद्धां त्या दिशेनें आम्हांला कांहीं यश मिळालें आहे, हेंहि त्यांना कबूल करावें लागलें आहे. म्हणून शहाण्या माणसांनीं अहिंसा--हिंसेचा शास्त्रार्थ करीत बसण्यापेक्षां, अहिंसेला त्यांचा सेनापति म्हणतो त्या मार्गानें शुद्ध व संघटित करण्याच्या मार्गास लागणें हेंच व्यवहारचातुर्य ठरेल.

स्वतंत्रता पाहिजे असेल तर सर्व देश एक झाला पाहिजे. जातीय, प्रांतीय, धार्मिक, वार्णिक द्वेष नाहींसे झाले पाहिजेत. प्रजेचा आन्तरिक व्यवहार न्याय व नीतीला अनुसरून चालला पाहिजे; बलवानांनीं निर्बलांकरितां झिजलें पाहिजे; त्यांचें शोषण करूं नये; सर्वांना पोटभर भाकरी, अंगभर कपडा, व सोईचें घर मिळेल, अशी व्यवस्था निर्माण करण्यास सर्व सुज्ञांचें एकमत झालें पाहिजे. हें सर्व करण्याकरितां व्यक्तिशः व समाजव्यापी अहिंसेची–दुसऱ्याकरितां आनंदानें, कर्तव्यबुद्धीनें, प्रेमानें झिजण्याची–जरूरी आहे. हिंसेची व द्वेषाची नाहीं. निःस्वार्थपणाची वाढ आवश्यक आहे, स्वार्थवृत्तीची नाहीं. सर्वव्यापी ममतेची जरूरी आहे. लहान लहान क्षेत्रांत कोंडून ठेवलेल्या अहं–ममत्वाची नाहीं.

अशी क्रान्ति जर आम्ही आमच्या संस्कारांत व जीवनांत घडवून आणली आणि ती अहिंसेच्या अनुशीलनानेच शक्य आहे–तर जर्मनी किंवा जपानच्या आक्रमणाविरुद्ध लागणारी अहिंसक योजना कशी असावी, हें आम्हांस आपोआप सुचेल. तोंपर्यंत कितीहि डोकें चालविलें, तरी सुचणार नाहीं. जें कांहीं सूचवूं त्या बहुतेक पोरकट कल्पना ठरतात; कारण तें सुचविण्याकरितां जी पूर्व परिस्थिति पाहिजे, तीच अद्यापि निर्माण झाली नाहीं. आज वायरलेसने एका क्षणाचे आंत एक शब्द सर्व जगांत पोचवितां येतो. समजा कोणी असा प्रश्न विचारला कीं, कायहो, शब्दाप्रमाणे जर मारक किरण पोचविला गेला तर त्यापासून बचाव करण्याकरिता कोणता उपाय योजावा ? तर शहाणा वैज्ञानिक एवढेंच म्हणूं शकेल कीं, तसें यंत्र तयार होऊं द्या, नंतर मला विचार सुचूं शकेल.

आज हिंसक साधनांनीं आम्ही आपलें रक्षण करतों, पण त्याकरिता आमच्याजवळ किती सैन्य आहे, कोणत्या प्रकारच्या किती बंदुका, विमानें, विषवायूचे गोळे, मास्क वगैरे साधनें आहेत, कुठेकुठे तीं ठेवलीं आहेत, तीं चांगल्या स्थितींत आहेत किंवा नाहीत, याची चर्चा किंवा चौकशी करतों का ? सर फिलीप चेटवुडला त्याची किती माहिती विचारतों ? आम्हीं मानतों कीं, युद्धकलेचे विश्वसनीय तज्ज्ञ आहेत, ते योग्य तें करतीलच; असें मानून युद्ध चालत असतांनाहि आपण निश्चिंत असतों.

त्याचप्रमाणे जर अहिंसेच्या बाजूने आमची एक विशिष्ट साधना झाली, तर त्याचे कांहीं तज्ज्ञ निर्माण होतीलच की नाही ? अहिंसाधर्मात प्रावीण्य मिळविलेला व अहिंसेने प्रजेचें रक्षण करण्याचा आत्मविश्वास बाळगणारा जो शूर आमच्या देशांत असेल, त्यास आम्ही युद्धमंत्री नेमूं व त्याच्या सूचनेप्रमाणें वागूं. तात्पर्य हें कीं, जर्मनीविरुद्ध अहिंसात्मक योजना कोणत्या प्रकारची असावी, हा महत्वाचा प्रश्न नसून, आमच्या नित्य जीवनांतील लहान–मोठे कलह अहिंसेने कोणत्या प्रकारें मिटवावयाचें हा आहे. दोन माणसांत युद्ध करण्याचें शास्त्र सापडलें तर दहा शंभर व लाख माणसांत तें करण्याचें शास्त्रहि निर्माण होऊं शकेल. तीच गोष्ट अहिंसेच्या बाबतींत.

शेवटीं 'गांधी–विचार दोहनां'तील ह्या प्रकरणावरील दोन कलमें उधृत करून हा लांब लेख पूर्ण करतों.

'अहिंसेंत तीव्र कार्यसाधक शक्ति आहे. या अमोघ शक्तीचा अद्यापि संपूर्ण शोध झाला नाहीं. 'अहिंसेच्या सान्निध्यांत वैरनाश होतो' हें सूत्र म्हणजे पुराणातील वांगीं नसून, ऋषींचें अनुभववाक्य आहे. त्या शक्तीचा संपूर्ण विकास, आणि सर्व कार्यप्रसंगीं त्याच्या प्रयोगाचा मार्ग अजून स्पष्ट झाला नाहीं. मनुष्य-जातीनें हिंसेच्या मार्गांचें संशोधन करण्याचा जेवढा दीर्घ उद्योग केला आहे व त्यामुळे त्याचें शास्त्र निर्माण करण्यांत जी सफलता मिळविली आहे, तेवढा उद्योग जर त्याच्याकडून अहिंसा शक्तीचें संशोधन करण्याकरितां झाला तर मनुष्य-जातीच्या दुःखाचें निवारण करण्याकरितां तें एक अमूल्य, अमोघ व परिणामीं उभय पक्षांचें हित घडवून आणणारें साधन आहे असें सिद्ध होईल.

'जितक्या श्रद्धेने व उद्योगपरायणतेने एक वैज्ञानिक नैसर्गिक शक्तींचा शोध करीत असतो व त्यांच्या नियमांचा विविध रीतीने व्यवहारांत उपयोग कर-ण्याचा प्रयत्न करीत असतो, तितक्या श्रद्धेने व उद्योगाने अहिंसा शक्तीचा शोध करण्याची व तिचे नियम शोधून त्यांना व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.'

# ४ अहिंसा आणि मानवनिष्ठा

माणसाला भूक लागावी आणि खाण्याचे पदार्थ त्याच्याजवळ असुनहि त्यानें खाऊं नये असें कधीं झालें आहे कां ? हें मानवी स्वभावाच्या विरुद्ध आहे. पोटांत भूक असावी, हातांत खाद्य असावें, आणि माणसानें तें खाऊं मात्र नये हें शक्य तरी कसें आहे ?

तथापि तपश्चरण करणारे मूठभर साधकच नव्हे, तर लाखो धार्मिक लोक एकादशीला, शिवरात्रीला, पर्युषणामध्यें, रोजे असतांना किंवा सेंट्सच्या नांवावर मानवी स्वभावाच्या विरुद्ध उपास पाळतांना–व्रत राखतांना–आढळून येतात.

ज्वानीचा अगदी भर आहे, विकार तृप्त करायला संधीहि आहे, अशा स्थितींत माणसानें विषयसेवन कधीं सोडलें आहे काय ? हें देखील मानवी स्वभावाच्या विरुद्ध आहे. यांत म्हणे, ' निसर्गद्रोह ' आहे. माणूस हवें तर संयमाचें व ब्रह्मचर्याचें ढोंग करूं शकतो; परंतु निसर्गानें ही संयमाची शक्ति सामान्य माणसाला दिलेली नाही धार्मिक साधनांच्या योगे ज्यांची मानोवृत्ति विकृत झालेली आहे ते पाहिजे तर यांत यश मिळवूं शकतील. पण साधारण माणसासाठी हें अशक्य होय.

असें असून देखील असंख्य विधवा आपल्या विकारांवर विजय मिळवितात व पवित्र शांतिमय जीवन घालवून समाजाला संयमाच्या गौरवाची शिकवण देतात. विरागी साधूंची गोष्ट कशाला ? लाखों महत्वाकांक्षी तरुण आपल्या उद्दिष्टासाठीं विकारांना ताब्यांत ठेवतात, इतकेंच नव्हे तर विकारांना विसरूनहि जातात, आणि अगदी सामान्य अशा असंख्य पतिपत्नींचे दाखले देतां येतील, की ज्यांना गृहस्थधर्माचें पालन करीत असतांहि कारणवश परस्परांचा वियोग सहन करावा लागला व परस्परप्रेमाच्या उत्कटतेमुळें आपल्या विकारांना ज्यांनीं मारलें आहे आणि आजन्म ब्रह्मचाऱ्यापेक्षांहि अधिक उच्च कोटीची निर्विकारता ज्यांना अनुभवतां आली आहे.

खोटें बोलून किंवा दिलेलें वचन न पाळून माणसाला अपार नफा मिळत असेल तर माणूस काय सत्याचा आग्रह धरूं शकेल ? छे. लोभाची गति असा-

चारण असते. एकवेळ माणूस कामविकारावर विजय मिळवील पण लोभ सोडणारा विरळाच.

आणि तरीहि केवळ हरिश्चंद्रच नव्हे, कर्णच नव्हे, रामचंद्रहि नाहीं. पण असे हजारो बनिये, शेतकरी, कारागिर आढळून येतात, जे आपल्या छन्दासाठीं वाटेल तें नुकसान सहन करतात.

मत्सराचेंहि असेंच आहे.

संकट उभें राहिलें असतां पळ काढायचा आणि आपले प्राण वाचवायचे ह्या निसर्गाचा नियम आहे. मदमस्त हत्ती, वाघ, सिंह हे देखील जोपर्यंत त्यांच्या मनांत भीति उत्पन्न होत नाहीं तोपर्यंतच लढतात, पण आत्मविश्वास-विजयाचा संभव नाहींसा होतांच शेपूट दाबून असे तडक पळतात कीं त्यांना आवरणें अशक्य असतें. मृत्यूचें भय न वाटण्याचा संभव कदाचित् परमहंसाच्या बाबतींत असूं शकेल पण सामान्य माणसाच्या बाबतींत ही गोष्ट अशक्य आहे.

तरीहि आज आपण असें पाहतों कीं मूठभर किंवा हजार दोन हजार लोकच नाहीं, कोण्या एका विशिष्ट जातीचेच लोक नाहीं तर अलम् दुनियेतील साधारण माणसेंहि आग विझविण्याचा प्रयत्न करण्यांत, कॉलरा वगैरे सारख्या रोगांच्या साथींत पीडितांची सेवा करतांना, किंवा युद्धांत एक दुसऱ्याचा खून पाडतांना प्राणाची तसूभरहि पर्वा करीत नाहींत. तोफेच्या भडिमारांत समोर घुसून तोफखान्याचा कब्जा घेणारे शूर सैनिकहि अगदीं सामान्य अशाच मनुष्य जातीचे प्रतिनिधि असतात. ते कोणी असाधारण अवलिये नसतात!

मला कोणी शिव्या द्याव्या आणि मी मात्र उलट त्याला दहा शिव्या हासडूं नये असें होणें कसें शक्य आहे? माझ्या मनाला शिव्यामुळे जो मळ लागला तो अशा तऱ्हेने धुवून न काढतां मित्र्यासारखें स्वस्थ बसायचें? अगदीं अशक्य! मला जर कोणी शिव्या दिल्या तर त्याला जन्मभर आठवण राहील असेंच प्रत्युत्तर माझ्याकडून मिळेल!

ज्यांच्यावर कसलेहि संस्कार नसतात असले कमीन, क्षुद्र लोक वरीलप्रमाणेंच बोलतात आणि आचरतात. यावर जगांतले सामान्य सज्जन म्हणतात:—' शिवीला

उलट शिवी देण्यानें प्रतिपक्षाचें कांही वांकडें होईल कीं नाहीं हें आम्हांस ठाऊक नाहीं. पण आमची जीभ मात्र भ्रष्ट होईल. शिवी देणाऱ्याचा बंदोबस्त आम्ही जरूर करूं. परंतु त्यासाठीं आमचाहि अधःपात होईल अशा मार्गानें आम्हीं जाणार नाहीं.

अहिंसावादी देखील असेंच म्हणतात. आम्ही अत्याचारी माणसांचें अत्याचार थोडेच सहन करणार आहोंत. त्यांचा आम्ही असा बंदोबस्त करूं कीं त्यानें अत्याचाराचें पुनः नांवहि घेऊं नये. पण हा उपाय म्हणजे अत्याचाराचें अनुकरण नव्हे. त्याचा आम्ही अशा रीतीनें बीमोड करूं कीं त्याला आपल्या जिनगानीची लाज वाटावी आणि त्यानें आपला दुःस्वभाव टाकून द्यावा.

अशी स्थिति असतांना स्वचक्राच्या ( सिव्हिल वार ) किंवा परचक्राच्या प्रसंगीं प्रतिपक्षाला न मारतां त्याच्या समोर उभे राहण्यांत आणि आक्रमण न करतां मरायला तयार होण्यांत अशक्य असें काय आहे ? ज्या शिपायांना लष्करी शिक्षण मिळालेलें आहे त्यांच्यावर दगडांची आणि गोळ्यांची सरबत्ती जरी सुरू झाली तरी सेनापतीचा हुकूम मिळेपर्यंत ते प्रतिकार न करतां निमूटपणें सर्व सहन करीत राहतात. पळून जात नाहींत. लढायलाहि उद्युक्त होत नाहींत. स्वस्थानीं राहतात. मार खातात, मरतात, आणि त्यांच्या बद्दल प्रतिपक्षांच्या मनांत आदर व आश्चर्याचे भाव उठतात.

तेव्हां असेंच कां मानलें जाऊं नये कीं सत्याग्रही सेनेची एक अशीच तुकडी आहे, जिला हमेशासाठीं सेनापतीचा असाच हुकूम मिळाला आहे, कीं तुम्ही मरायला तयार असा, पण मारण्याचें मात्र नांव घेऊं नका ?

माणसाला हें मुळींच अशक्य नाहीं.

एकदां पैगंबर कोणच्यातरी लढाईत लढत होते. कुणीतरी येऊन त्यांना विचारलें कीं, 'नमाजाची वेळ झालेली आहे. आम्ही लढत रहावें कीं नमाज पढावा. नमाज सोडून लढणें योग्य आहे कीं लढणें सोडून नमाज पढणें योग्य होईल ? ' 'नबी' कडून उत्तर मिळालें, पैगंबराकडून हुकूम झाला, 'शत्रूचा मारा पाहिजे तर होत राहो. तुम्ही लढायचें सोडून रणक्षेत्रांतच नमाज पढून घ्या. थोडे लोक

मरतील, कदाचित् जास्तीहि मरतील, पण नमाज न पढणें हा गुन्हा आहे. असला गुन्हा करण्याचा आपल्याला अधिकार नाहीं.' पैगंबराचें सैनिक कुणी मोठे महात्मे नव्हते किंवा त्यांची विद्वत्ताहि वायां चालली नव्हती. त्यांनी पैगंबरांची "नसीहत" (उपदेश) मानली. आणि त्यांच्या सांगण्याबरहुकूम रणमैदानावर शत्रूच्या माऱ्यांत नमाज आटोपला. परिणाम असा झाला कीं मुसलमानांत असाधारण शक्ति निर्माण झाली आणि त्यांची ही वीरोचित निष्ठा पाहून प्रतिपक्षीहि त्यांची कदर करायला लागले.

हें सगळें झालें कसें? हें सगळें होतें कसें? कसे होत आलें आहे? ह्याला उत्तर एकच आहे. माणूस जेव्हां श्रद्धा ठेवतो, निष्ठा राखतो तेव्हां तो श्रद्धावान् होतो, निष्ठावान् होतो. श्रद्धेमुळें बलिदानाची तयारी करितो. बलिदान करून दुसऱ्याला उदाहरण घालतो. आणि शेवटीं हें असलें असाधारण वीरकर्म सर्वांसाठीं एक मामुली गोष्ट करून सोडतो.

यावरून आम्हीं असें कधीच म्हणूं शकत नाहीं कीं, अहिंसा म्हणजे मनुष्याच्या शक्तीबाहेरची अशी एखादी गोष्ट आहे: अहिंसा हा केवळ साधूंचा किंवा विरागी लोकांचा धर्म आहे असेंहि नाहीं. संयम हा सर्व संस्कृतीचा मूलाधार आहे. न्याय, प्रेम, निष्ठा, इमान, विधीनिष्ठा यापैकीं प्रत्येकाच्या मुळाशीं संयम असतोच. हीच संयमाची मात्रा अहिंसेसाठीं पुरे आहे. लोकाग्रणींनी एवढी फक्त निष्ठा बाळगायला हवी कीं हें सगळें शक्य आहे अन् ह्यांतच मनुष्य-जातीचें कल्याण आहे.

अहिंसा सामान्य माणसाला अशक्य नाहीं, एवढें कळल्यानंतर अहिंसेचा चमत्कारपूर्ण प्रभाव अपरिहार्य कसा आहे हें कळलें पाहिजे. या श्रद्धेचा अभाव असला तर अहिंसाधर्माच्या ठिकाणीं असलेली निष्ठा शिथिल होऊं शकते.

# ५ तरुणांनीं लक्ष द्यावें.

रात्रंदिवस काम काम आणि काम ह्याशिवाय दुसरा विचारच न करणारे तळमळीचे लोक पुढें आल्याशिवाय विधायक कार्यक्रम झेंपणार नाहीं, ही गोष्ट आतां आम्ही नीट लक्षांत घेतली पाहिजे. दुनिया विसरून, अहंकार मारून, खेडे-गांवांत कोंडून घेण्याची तयारी पाहिजे. आई मुलासाठीं खस्ता खाते त्याबद्दल मुलखांत आपली टिमकी वाजावी अशी तिला अपेक्षा नसते. पण मुलानें पुढेंमागें आपली चाकरी करावी अशी कदाचित् तिला आशा असेल. आपल्याला तर ह्याहून अधिक निरपेक्ष वृत्ति राखली पाहिजे. ज्या लोकांत आपण काम करणार, ज्यांची फिकीर करण्यांत आपण आयुष्य खपविणार, त्यांच्याकडूनहि एखाद्या बऱ्या बोलाची अपेक्षा आपणांस राखतां येणार नाहीं. सेवा करून मोबदल्यांत लाथा खावयाच्या आहेत, असेंच घेऊन चाललें पाहिजे. महारांची सेवा करतो म्हणून ब्राह्मण रुसले, आणि भंग्यांची सेवा करतो म्हणून महार रुसले. ही स्थिति सहन केली पाहिजे. आजपर्यंत निराळें होतें. एकाच बाजूनें मार सहन करावयाचा होता. राजकीय काम करणारांना सरकारचा मार आणि सामाजिक काम करणारांना लोकांचा मार अशी वांटणी होती. आतां दोन्हीं ताटें एकदम वाढून ठेविलीं आहेत. दोन्ही मार एकदम सहन करावयाचे आहेत. इतक्या सहनशक्तीचे टणक, चिवट, लोंचट म्हणा पाहिजे तर, लोक हवे आहेत. अशांच्या शिवाय आजचें काम उरकणार नाहीं.

काय असे लोक आज मिळणार नाहींत? भारतमाता इतकी वांझ झाली आहे? मला असें वाटत नाहीं. असें मानण्याला माझें मन तयार होत नाहीं. आज आमच्यांतले बहुतेक लोक अगदीं टेकीला आले आहेत, ह्यांत शंका नाहीं. त्यांच्यांत तकलीफ सहन करण्याइतका तणाव दिसत नाहीं. पण अशांना तकलीफ देण्याचा आपला इरादाच नाहीं. त्यांची तकलीफ दूर करण्याचा तर सारा प्रयत्न आहे. आपण माणसें मागतों मध्यम वर्गातून. खालच्या वर्गाला ग्लानि आली आहे. वरच्या वर्गाला गाढ झोंप लागली आहे. तरी पण मधल्या वर्गातून आशेला

जागा आहे. ह्याच्यांतल्या तरुणांनीं आपल्या आयुष्यांतलीं उत्साहाचीं चार-दोन वर्षें राष्ट्रांच्या सेवेला दिलीं पाहिजेत.

पुष्कळ तरुणांना देशसेवा करावीशी वाटते. पण देशसेवा करावयाची म्हणजे काय करावयाचें ह्याची मुळींच कल्पना नसते. देशसेवा करावयाची एवढीच भावना असते. ही देशसेवेची भावना कोणी एखादी कविता लिहून तृप्त करतो, कोणी वर्तमानपत्रांत लेख लिहून शांत होतो. ही हद्द झाली. स्पष्ट कल्पनाच नसते. त्यामुळें सुरुवात कुठून कशी करावी हें कळत नाहीं. अशा सर्व तरुणांना पुरतें काम देण्याची आपल्यापाशीं सोय आहे. आपण वर्ध्यांचेंच उदाहरण घेऊं. ( १ ) राष्ट्रीय शाळेचें काम, ( २ ) छात्रालयाचें काम, ( ३ ) अंत्यज-सेवेचें काम, ( ४ ) ग्रामरचनेचें काम, ( ५ ) खादी-मंडळाचें काम, ( ६ ) प्रचारकाचें काम, ( ७ ) सूत-वर्गाचें काम, ( ८ ) छापखान्याचें काम, ( ९ ) कॉंग्रेस कमिटीचें काम, इत्यादि अनेक कामें योग्य माणसांची वाट पाहत आहेत. ह्या सर्व कामांत तरुणांना देशसेवेचें आणि निष्काम कर्माचें शिक्षण मिळण्याची सोय आहे. शिवाय अधिक माणसें मिळाल्यास नवीन कामें सुरू करण्यासारखीं आहेत. अशीच कमजास्त मानानें पुष्कळ ठिकाणची स्थिति आहे. देशसेवा कशी करावी ह्याचें आतांच्या तरुणांना कांहींच कोडें पडावयास नको. देशसेवेचे दरवाजे चारी बाजूला खुले आहेत.

त्याग–वृत्तीनें काम करण्याचें वळण तरुणांना लागलें पाहिजे. शाळेंत चार अक्षरें घोकलीं म्हणजे शिक्षण झालें ही भावना बरोबर नाहीं. खरें शिक्षण शाळे-बाहेरच्या कर्मयोगांतच मिळतें. हें कर्मयोगाचें शिक्षण घेण्याची सोय सुदैवानें आपल्यापाशीं आहे. त्याचा उपयोग करून घेणें आपलें काम आहे. तरुणांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें, अशी माझी सूचना आहे.

[ महाराष्ट्र-धर्म १९२४ ]

# ५ तरुणांनीं लक्ष द्यावें.

रात्रंदिवस काम काम आणि काम ह्याशिवाय दुसरा विचारच न करणारे तळमळीचे लोक पुढें आल्याशिवाय विधायक कार्यक्रम झेंपणार नाहीं, ही गोष्ट आतां आम्ही नीट लक्षांत घेतली पाहिजे. दुनिया विसरून, अहंकार मारून, खेडेगांवांत कोंडून घेण्याची तयारी पाहिजे. आई मुलासाठीं खस्ता खाते त्याबद्दल मुलखांत आपली टिमकी वाजावी अशी तिला अपेक्षा नसते. पण मुलानें पुढेंमागें आपली चाकरी करावी अशी कदाचित् तिला आशा असेल. आपल्याला तर ह्याहून अधिक निरपेक्ष वृत्ति राखली पाहिजे. ज्या लोकांत आपण काम करणार, ज्यांची फिकीर करण्यांत आपण आयुष्य खपविणार, त्यांच्याकडूनहि एखाद्या बऱ्या बोलाची अपेक्षा आपणांस राखतां येणार नाहीं. सेवा करून मोबदल्यांत लाथा खावयाच्या आहेत, असेंच घेऊन चाललें पाहिजे. महारांची सेवा करतो म्हणून ब्राह्मण रुसले, आणि भंग्यांची सेवा करतो म्हणुन महार रुसले. ही स्थिति सहन केली पाहिजे. आजपर्यंत निराळें होतें. एकाच बाजूनें मार सहन करावयाचा होता. राजकीय काम करणारांना सरकारचा मार आणि सामाजिक काम करणारांना लोकांचा मार अशी वांटणी होती. आतां दोन्हीं ताटें एकदम वाढून ठेविलीं आहेत. दोन्ही मार एकदम सहन करावयाचे आहेत. इतक्या सहनशक्तीचे टणक, चिवट, लोंचट म्हणा पाहिजे तर, लोक हवे आहेत. अशांच्या शिवाय आजचें काम उरकणार नाहीं.

काय असे लोक आज मिळणार नाहींत? भारतमाता इतकी वांझ झाली आहे? मला असें वाटत नाहीं. असें मानण्याला माझें मन तयार होत नाहीं. आज आमच्यांतले बहुतेक लोक अगदीं टेकीला आले आहेत, ह्यांत शंका नाहीं. त्यांच्यांत तकलीफ सहन करण्याइतका तणाव दिसत नाहीं. पण अशांना तकलीफ देण्याचा आपला इरादाच नाहीं. त्यांची तकलीफ दूर करण्याचा तर सारा प्रयत्न आहे. आपण माणसें मागतों मध्यम वर्गांतून. खालच्या वर्गाला ग्लानि आली आहे. वरच्या वर्गाला गाढ झोंप लागली आहे. तरी पण मधल्या वर्गांतून आशेला

जागा आहे. ह्याच्यांतल्या तरुणांनी आपल्या आयुष्यांतलीं उत्साहाचीं चार-दोन वर्षें राष्ट्रांच्या सेवेला दिलीं पाहिजेत.

पुष्कळ तरुणांना देशसेवा करावीशी वाटते. पण देशसेवा करावयाची म्हणजे काय करावयाचें ह्याची मुळींच कल्पना नसते. देशसेवा करावयाची एवढीच भावना असते. ही देशसेवेची भावना कोणी एखादी कविता लिहून तृप्त करतो, कोणी वर्तमानपत्रांत लेख लिहून शांत होतो. ही हद्द झाली. स्पष्ट कल्पनाच नसते. त्यामुळें सुरुवात कुठून कशी करावी हें कळत नाहीं. अशा सर्व तरुणांना पुरतें काम देण्याची आपल्यापाशीं सोय आहे. आपण वर्ध्यांचेंच उदाहरण घेऊं. ( १ ) राष्ट्रीय शाळेचें काम, ( २ ) छात्रालयाचें काम, ( ३ ) अंत्यज-सेवेचें काम, ( ४ ) ग्रामरचनेचें काम, ( ५ ) खादी-मंडळाचें काम, ( ६ ) प्रचारकाचें काम, ( ७ ) सूत-वर्गाचें काम, ( ८ ) छापखान्याचें काम, ( ९ ) कॉंग्रेस कमिटीचें काम, इत्यादि अनेक कामें योग्य माणसांची वाट पाहत आहेत. ह्या सर्व कामांत तरुणांना देशसेवेचें आणि निष्काम कर्माचें शिक्षण मिळण्याची सोय आहे. शिवाय अधिक माणसें मिळाल्यास नवीन कामें सुरू करण्यासारखीं आहेत. अशीच कमजास्त मानानें पुष्कळ ठिकाणची स्थिति आहे. देशसेवा कशी करावी ह्याचें आतांच्या तरुणांना कांहींच कोडें पडावयास नको. देशसेवेचे दरवाजे चारी बाजूला खुले आहेत.

त्याग-वृत्तीनें काम करण्याचें वळण तरुणांना लागलें पाहिजे. शाळेंत चार अक्षरें घोकलीं म्हणजे शिक्षण झालें ही भावना बरोबर नाहीं. खरें शिक्षण शाळे-बाहेरच्या कर्मयोगांतच मिळतें. हें कर्मयोगाचें शिक्षण घेण्याची सोय सुदैवानें आपल्यापाशीं आहे. त्याचा उपयोग करून घेणें आपलें काम आहे. तरुणांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें, अशी माझी सूचना आहे.

[ महाराष्ट्र-धर्म १९२४ ]

## ६. जागृतीचीं साधनें.

एखाद्या निजलेल्या माणसाला जागें करावयाचें आहे, तर आपण हातांनीं त्याचें शरीर हालवितों आणि त्याला 'अमक्या ऊठ' म्हणून हांक मारतों. ह्या दोन क्रिया एकत्र केल्या म्हणजे तो मनुष्य लवकर उठतो. ऋषि जेव्हां शमदमादि कर्तव्यें आणि स्वाध्याय प्रवचन ह्यांचा जोडीनें उपदेश करतात तेव्हां त्या जोड-गोळीनें आत्मा लवकर जागृत व्हावा, अशी त्यांची योजना आहे. शमदमादि कर्तव्यें म्हणजे शरीर गदगदां हालविणें आणि स्वाध्यायप्रवचन म्हणजे हांक मारणें. तोंडानें हांक मारून शरीर गदगदां हालविलें म्हणजे माणूस ताबडतोब खडबडून जागा होतो.

राष्ट्राला जागें करण्यासाठीं राष्ट्रीय चळवळी असतात. त्यांतहि ह्याच दोन गोष्टींची आवश्यकता असते. लहान–थोर, गरीब–अमीर, जाणते–नेणते, सर्वांच्या हातून स्वराज्याचें प्रत्यक्ष काम आणि तेंहि राष्ट्रीय निष्ठा उत्पन्न होण्यासाठीं नित्य कर्मांच्या स्वरूपाचें म्हणजे एकरूप—असें कांहीं तरी होत राहिलें पाहिजे. चर-ख्यावर सूत कांतण्याचें काम हें नित्यकर्म होण्यालायक आहे. इतरहि राष्ट्रसेवेचीं कामें आहेत. तीं यथाशक्ति करावींच. पण सूत कांतण्याचा नित्यधर्म मात्र दरेकानें आचरावा. समर्थांच्या वचनांत थोडा फरक करून, "**बहु चांगलें काम हें कांतण्याचें। अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें॥**" असें सहज म्हणतां येईल. कांतण्याचें काम राष्ट्राला स्वावलंबन शिकविणारें म्हणून 'चांगलें,' राष्ट्राची नग्नता झांकणारें म्हणून 'साजिरें,' विशेषशा साधनाशिवाय एका लहानशा चातीवरहि होऊं शकणारें म्हणून 'स्वल्प,' स्त्री–पुरुष, बाळ–वृद्ध, अशक्त–अडाणी सर्वांना करतां येण्यासारखें म्हणून 'सोपें,' आणि नुसतें 'फुकाचें' च नव्हे पण आणखी दोन दाम देणारें असें आहे; म्हणून तें स्वराज्याच्या राष्ट्रीय चळवळीचें नित्यकर्म होण्याला सर्व प्रकारें योग्य आहे. ह्या नित्यकर्माचें चक्र राष्ट्रभर चालू करतां आल्यास त्यानें राष्ट्राचें शरीर गदगदां हालेल. राष्ट्राच्या हृदयाला स्वरा-ज्याच्या चळवळीचे शारीरिक धक्के बसतील. आणि त्याबरोबरच इकडे हांक मार-ण्याचेंहि काम सारखें चालू असलें तर राष्ट्रपुरुष तेव्हांच जागा होईल.

पण हें हांक मारण्याचें कामहि सतत चालूं राखलें पाहिजे. देवाच्या मूर्तीसमोर श्रवण-कीर्तन अवश्य पाहिजे. त्याशिवाय भक्तिमार्गाची पूर्ति होऊं शकत नाहीं. ऋषीलाहि शमदमादि साधनाबरोबर स्वाध्याय-प्रवचन हवेंच, राष्ट्राची झोंप म्हणजे कुंभकर्णाची झोंप. तेथें शरीराला टोंचण्या हव्यात. चळवळीच्या तत्त्वाचें कीर्तन खेड्यांपाड्यांतून, देशाच्या कोनाकोपऱ्यांतून, होत राहिलें पाहिजे. चरखा हें चळवळीचें 'यंत्र' आहे. पण यंत्राला मंत्राची जोड पाहिजे. चळवळीच्या मंत्राचें उच्चारण चालूं राहिल्यानें श्रद्धा दृढ होईल, आणि श्रद्धा दृढ झाली म्हणजे संकल्पाची सिद्धि होईल. किंवा चरखा चालविणें हें तप म्हटलें तर तत्त्व-संकीर्तन हा जप म्हणावा. तपाची टोंचणी लावूं आणि जपाचे नगारे पिटित राहूं तेव्हां राष्ट्रपुरुष जागा होईल.

---

म. ग्रं. सं. ठाणें.

# ७. ग्रामसेवेच्या शास्त्रांतील एक कलम.

## ' शरीरश्रम '

खेडेगांवच्या सेवेचें शास्त्र दिवसें–दिवस चिंतून राहिलों आहें. पुष्कळ गोष्टी निश्चित झाल्या आहेत. अनेक अजून व्हायच्या आहेत. ' कमींत कमी आठ तास शरीर-परिश्रम आणि आजच्या परिस्थितींत राष्ट्रीय जीवनांत पडलेला खड्डा भरून काढण्याचा, ' हें खेड्याच्या सेवेच्या शास्त्रांतलें एक कलम निश्चित आहे. आणखीं दुसरीं कलमें अशींच निश्चित होऊन राहिलीं आहेत. एकेक अंमलांतच आणून पाहूं म्हणजे निकाल लागेल.

शरीर-परिश्रमानें जडता येण्याची मला धास्ती नाहीं. विचाराची वाफ कोंडली गेल्यामुळें आणि चिंतनाला पुष्कळ अवकाश मिळत गेल्यामुळें उलट तीव्रता वाढते असा प्रत्यक्ष अनुभव येत आहे. शरीर दुबळें होण्याचें–योगपूर्वक काम केल्यास–मुळींच कारण नाहीं. बलवान होण्याचें कारण आहे. आठ तास काम करून शिवाय चार-पांच तास अवांतर सेवेसाठीं उरतात. आठ तासांचा शरीर-परिश्रम ही एक महान् सेवा ठरते. उदाहरणाइतकें वक्तृत्व बोलकें तर नाहींच. आणि वक्तृत्वाची मदत लागत असली तर शून्याची जशी एकाला लागते तशी लागत असेल व ती घेतां येईल.

## हिंदुस्थानचा महारोग आणि त्यावरील तोडगा.

हिंदुस्थानचा आजचा सर्वांत मुख्य रोग म्हणजे आळस. महारोग म्हटलें तरी चालेल. ह्यावर तोडगा म्हणजे उद्योगी माणसाचें जिवंत जागतें उदाहरण आणि संगति. आपण निरंतर उद्योग करीत राहून तो व्यवस्थित हिशेबी वृत्तीनें सफल करून आपल्या कृतीनें आणि संगतीनें आणि जोडीला समजावण्यानें आपण तो रोग काढू शकूं. म्हणून (१) उद्योग पाहिजे, (२) तो सतत पाहिजे. (३) तो पुरला पाहिजे, (४) त्यावर आपल्या जीवनाचा आधार पाहिजे,

(५) बाहेरचा सर्व आधार सोडला पाहिजे, (६) तो व्यवस्थित पाहिजे आणि (७) त्याची सफलता सिद्ध झाली पाहिजे. इतकें झाल्याशिवाय खेड्यांतल्या जनतेंत आपल्या कार्याचा समावेश होणार नाहीं. आमच्या देहाचा खुशाल होवो.

लोक-संग्रहाच्या किंवा सेवेच्या खोट्या मोहक आणि त्वरित कल्पनेला बळी पडून नाना उद्योग अथवा व्यवसाय अथवा ढोंगें अथवा चाळे उभारण्यानें क्षणभर लोकांचा जमाव जमलेला दिसेल. परंतु तो कार्यकारी होणार नाहीं.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६६९३

# ८. शरीरश्रम आणि सांस्कृतिक उन्नति.

कांहीं लोकांची अशी आपली समजूत आहे कीं कमींत कमी श्रम आणि जास्तीत जास्त अवसर मिळाल्याशिवाय माणूस आपला आत्मविकास करूं शकत नाहीं. 'दिवसभर मारे कामच काम, आराम विश्राम मात्र क्षणभरहि नाहीं. म्हणून जॅक कसा अगदीं ठोंब्या बनला' या अर्थाची इंग्रजींतील म्हण सर्व परिचित आहेच. या म्हणीला कुणीतरी—मला वाटते लॉर्ड अॅव्हेबरीने—उत्तर दिलें आहे. त्याचें म्हणणें असें कीं "रात्रंदिवस खेळच खेळ, काम मात्र नांवालाहि नाहीं. असें झालें तर बिचारा जॅक शतमूर्ख बनेल कीं!"

नुसत्या कामाने जर जॅक मठ्ठ होत असेल तर नुसते खेळ खेळून तर तो आणखीच मूर्ख बनेल, या विधानाचा अर्थ असा कीं जीवनांत श्रम आणि खेळ यांचा योग्य समन्वय झाल्यानेच जीवनांत आनंद आणि पुरुषार्थ यांचा मेळ साधेल.

आज स्थिति अशी आहे कीं कांही लोकांना अष्टौप्रहर कामाच्या गाड्याला जुंपून रहावें लागतें. उलट कांहीं अगदीं रिकामे बसून चैनींत दंग असतात. बऱ्याच जणांना आपला बौद्धिक किंवा सांस्कृतिक विकास करून घ्यायला सवड म्हणून मिळतच नाहीं. असें आढळून आल्यामुळें कांहीं लोकांनी प्रगतीचा मंत्र म्हणून माणसाला कमींतकमी श्रम आणि जास्तींत जास्त उसंत या सूत्राची घोषणा केली. कांही तर थरावर जाऊन म्हणूं लागले कीं अहो, उसंत, फुरसत, म्हणजेच स्वातंत्र्य-विश्राम म्हणजेच स्वराज्य!

तथापि, 'केवळ अवकाश, मिळाला कीं मानवाचा विकास होत नाहीं हें थोडा विचार केल्यास ध्यानांत येतें. माणसाला रिकामा वेळ असला कीं एक तर तो आळशी होतो किंवा उत्पाती बनतो. जोंपर्यंत आपल्या फुरसतींचा उपयोग माणूस कोणत्या ना कोणत्या चांगल्या कामीं करीत नाहीं तोंपर्यंत ना त्याची उन्नति होत, ना समाजाची. 'रिकाम्या डोक्यांत सैतान आपला कारखाना घालतो' हें कांहीं खोटें नाहीं.

माणूस निरोगी आणि कर्तबगार असला तर तो निष्क्रिय राहूंच शकत नाहीं. ज्याच्या आंगीं बळ असतें, हृदयांत हिंमत असते, मेंदूंत अक्कल असते तो स्वस्थ तरी कसा राहूं शकेल ? ' अंधार व अप्रवृत्ति, हीं तमोवृद्धीचीं लक्षणें आहेत.* शाबूत डोक्याचा, धष्टपुष्ट आणि मन जीवंत असलेला माणूस कांहींतरी केल्यावांचून जीवंत तरी राहूं शकेल काय ? असें वाटूनच जणुं बर्नार्ड शॉने कुठे तरी म्हटलें आहे कीं–' सततची निष्क्रियता म्हणजे दुसरा नरकच–' नरकासाठीं ही अगदीं योग्य परिभाषा आहे !

निष्क्रियतेचा अर्थ जर नरक असेल तर फुरसत किंवा अवकाश, उसंत यांचा अर्थ रिकामपण किंवा आळस असा करून चालणार नाहीं. मनुष्य आपल्या ज्या वेळाचा उपयोग स्वतःला आवडेल त्या कामीं करूं शकतो ती त्याची फुरसतीची वेळ, अशीच फुरसतीची व्याख्या करावी लागेल.

माणसाचे आवश्यक श्रमाचे तास कमी व्हावे असें जेव्हां आपण म्हणतो तेव्हां तसें म्हणण्यांत आपला उद्देश माणसाला आपली रुचि आणि आवड पाहून काम करायला जास्तींत जास्त वेळ मिळावा असा असतो. तेव्हां, समाजोपयोगी परिश्रम व माणसाची उन्नति व आनंद यांत कोणत्या तरी स्वरूपाचा स्पष्ट आणि अनिवार्य असा विरोध आहे काय कीं ज्यामुळें आम्ही माणसाला समाजोपयोगी परिश्रमांतून जास्तींत जास्त फुरसत देऊं इच्छितो ? असा एक मुद्दा उपस्थित होतो.

याचें एक उत्तर तर स्पष्ट आहे–" समाजाच्या धारणेसाठीं दोन प्रकारच्या कामाची आवश्यकता असते. एक कलात्मक किंवा आनंददायक आणि दुसरें, श्रमात्मक किंवा कष्टदायक. केवळ श्रमात्मक कामांत कसलेंच कौशल्य लागत नाहीं. एकच क्रिया त्यांत पुनः पुनः करावी लागल्यामुळें कंटाळा येतो. जीव उबून जातो. शरीर थकून जातें. मन उडून जातें. बुद्धि सुन्न होते. असल्या शरीरश्रमांतून माणसाची बुद्धि विकास पावत नाहीं. त्याची सांस्कृतिक उन्नति होत नाहीं.

---

* अंधार मोह दुर्लक्ष अप्रवृत्ति चहूकडे ।
देहांत माजलीं तेव्हां जाणावें तम वाढलें ॥ गीताई १४, १३ ॥

प्राचीन काळापासून आजतागायत असलीं कष्टदायक कामें समाजानें गुलाम, मजूर आणि स्त्रिया यांच्याकडून करवून घेतलीं आहेत. उलट कलाकुसर आणि पराक्रमाचीं कामें उच्च वर्गाकरितां राखून ठेवलीं आहेत. आज आम्हीं एक अशी समाज घटना तयार करण्यासाठीं झटत आहोंत कीं जिच्यांत वर उल्लेखिलेले काबाडकष्ट सर्व लोकांमध्यें बरोबर वांटून दिले जातील. त्याबरोबरच असाहि प्रयत्न करण्यात येईल कीं सर्वांना फारच थोडावेळ असले काबाडकष्ट करावे लागून उरलेला वेळ प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार स्वतःची उन्नति करून घेण्यांत खर्च करतां येईल. समाजाच्या गरजा भागविण्यासाठीं जीं कामें करावीं लागतात तीं सर्वांनाच आवडतील अशीं थोडींच राहणार! म्हणून अशींच व्यवस्था करणें योग्य ठरेल कीं ही बिगार कमींत कमी करविली जावी व सर्वांना जास्तींत जास्त उसंत मिळूं द्यावी.''

हें उत्तर सकृद्दर्शनीं पटण्यासारखें, अगदीं बहारीचें वाटतें. पण त्यांत एक तर्कदोष आहे. जर समाजाची धारणा आणि प्रगति यासाठी कोणत्या ना कोणत्या परिश्रमाची आवश्यकता आहे तर व्यक्तीच्या उन्नतीसाठीं आणि स्वास्थ्यासाठीं परिश्रमाची तितकीच आवश्यकता नाहीं कां? आपण असें प्रत्यहीं पाहतों कीं माणूस आपल्या शरीरस्वास्थ्यासाठीं स्वतःला न आवडणाऱ्या आणि वर कष्टप्रद असणाऱ्या अशा कितीतरी गोष्टी नेहमी करीत असतो. कसरत किंवा कवायत ही त्यांचीं उदाहरणें म्हणून पुढे करतां येतील. बैठक म्हटली की तो नुसत्या उठाबशाच काढीत बसतो. तें पाहून बघणाऱ्याला शीण येतो पण उठाबशा शरीरस्वाथ्याला आवश्यक आहेत म्हणून तो माणूस मात्र त्यांत चुकारपणा करीत नाहीं. कवायतीचेंहि तसेंच. त्यांत एकच एक पवित्रा कितीतरी वेळ टाकावा लागतो. अनेकदां तचि तीच आवृत्ति करीत राहाणें यालाच तर अभ्यास म्हणतात. खेळाचें देखील असेंच आहे. खेळामध्यें शरीरश्रम होऊनहि आनंद मिळतो. कारण त्यांत कौशल्य, सहयोग, आणि पराक्रमाची जरूर असते; पण खेळ म्हणा, कला म्हणा, किंवा उद्योग म्हणा त्यांत केव्हां ना केव्हां तरी जीव उबेल अशा परिश्रमाचीं तर गरज असतेच!

व्यायाम कवायत इ. मध्यें जे शरीरश्रम केले जातात त्यांत आनन्दापेक्षा पुरुषार्थाची व उपयुक्ततेची भावना असते. त्यांत गोडी वाटते याचें कारण तथा

गोष्टी भोग किंवा सेवा यांना साधनभूत मानल्या जातात. व्यायाम व कवायत यांच्या योगें जी शक्ति किंवा कौशल्य कमाविलें जातें त्याचा उपयोग जो मनुष्य भोग किंवा विक्रय यासाठी करतो त्याची समाजांत फारशी प्रतिष्ठा असत नाहीं. उलट जो त्या सामर्थ्याचा उपयोग सेवेसाठी करतो त्याला समाजांत प्रतिष्ठा मिळते. अशी वस्तुस्थिति असल्याने केवळ परिश्रम किंवा काबाडकष्ट जेव्हां समाजाच्या सेवेचें साधन होतात तेव्हां त्यांत आपल्याला गोडी वाटते, व सेवेची भावना उत्कट असल्यास आनंदहि मिळतो. मनुष्याचीं भोगवृत्ति आणि सेवावृत्ति यांत ज्या मानाने अविरोध किंवा ऐक्य असतें त्या मानाने तो सुसंस्कृत किंवा सभ्य बनत जातो.

फुरसत किंवा अवसराचा उपयोग करावयाचा झाला तर त्यालाहि वरील नियमच लागू आहे. माणूस आपल्या फुरसतीचा उपयोग एकतर आपल्या मनोविनोदाकडे करील किंवा आपल्या रुचीप्रमाणे परिश्रम करण्यांत करील. समाजव्यवस्था अशी असावी कीं जिच्यांत माणूस आपल्या फुरसतीचा उपयोग अहितकर आणि अनिष्ट कार्याकडे कमींत कमी करू शकेल. त्याच्या शिक्षणप्रणालीनेहि त्याला या उद्देशाच्या पूर्तिसाठी मदत केली पाहिजे.

सेवा, आजिविका आणि आनन्द यांचा समन्वय कसा केला जाईल हा शिक्षणांत देखील सर्वांत कठिण आणि महत्वाचा प्रश्न होऊन बसला आहे. शिक्षण आनन्ददायी कसें होईल, शिक्षण तेजस्वी कसें होईल ? असले प्रश्न शिक्षणशास्त्रांत प्रामुख्यानें दाद मागत आहेत. जे प्रश्न शिक्षणशास्त्रासमोर तेच समाज व संस्कृति यांच्यापुढेंहि तितक्याच प्रामुख्यानें उभे आहेत. आपल्या जीवनाच्या गरजा पुऱ्या पाडण्यासाठीं माणूस जो व्यवसाय करील त्यांत आणि त्याच्या मनोविनोदनाच्या व सेवेच्या साधनांत जितका अविरोध राहील तितकी त्याची सांस्कृतिक उन्नति जास्त होईल. हा समन्वय सांस्कृतिक उन्नतीचें प्रमुख लक्षण आहे.

गांधीजी एकदा सहज बोलतां बोलतां म्हणाले कीं–" मनुष्य आपलीं सारीं कामें यंत्राच्या साह्यानें जर अर्ध्या तासांत संपवूं लागला तर उरलेल्या

वेळांत त्यानें काय हजामती कराव्यात ? " यावर महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विद्वान देशभक्त मला म्हणाले, " गांधीजी मनुष्य स्वभावाला इतकें हीन कां लेखतात ? हीच कां त्यांची मनुष्यस्वभावावरील श्रद्धा ? माणूस आपला फावला वेळ निद्रा, आळस, कुकर्म यातच घालवील असेंच ते कां म्हणून गृहीत धरतात ? "

गांधीजींचा निजधर्म म्हणून जर कांही असेल तर त्याचें पहिलें सूत्र मनुष्य-स्वभावाच्या ठिकाणीं असीम श्रद्धा हेंच होय ! मानवी स्वभावाबद्दल त्यांना अविश्वास नाही पण समाजव्यवस्था अशी असावी कीं जेथें माणसांच्या सत्प्रवृत्तींचा उत्कर्ष होईल आणि असत्प्रवृत्तींचा विनाश होईल. हा त्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. माणसाला केवळ भोगसाधनें वाढविण्याचेंच शिक्षण जर दिलें जाईल तर त्याची संस्कृति भोगप्रधान होईल. तो आपला सवडीचा वेळ केवळ विलासापायीं खर्च करील. असें झालें तर माणसें एक दुसऱ्याला आपलीं भोगसाधनें मानूं लागतील.

केवळ व्यक्तिगत लाभासाठीं माणुस जेव्हां उद्योग करीत नाहीं तेव्हां त्याच्या उद्योगाची प्रेरकशक्ति एकतर मनोरंजन होऊं शकते किंवा समाजसेवा ! गांधीजींचें म्हणणें इतकेंच आहे कीं मनुष्याची करमणूक व समाजसेवा यांच्यामधलें अंतर जितकें कमी तितकी त्याची संस्कृति श्रेष्ठ व तितकीच समाजाची उन्नति जास्त. आज माणूस पोटासाठीं उद्योग करतो. उद्याच्या आमच्या समाजव्यवस्थेंत त्याला समाजाच्या आवश्यक गरजा पुऱ्या करण्यासाठीं उद्योग करावा लागेल. आज त्याच्या स्वत:च्या चरितार्थाचा प्रश्न आहे. उद्या त्याच्यापुढें समाजाच्या चरितार्थाचा प्रश्न उभा राहील.

आपल्या पोटासाठीं म्हणा किंवा समाजाच्या जीविकेसाठीं म्हणा माणूस जो उद्योग करील त्यांत आणि त्याच्या अभिरुचींत, त्याच्या प्रगतींत, विरोध राहणेंच अगत्याचें आहे कां ? त्याची स्वाभाविक प्रवृत्ति, अभिरुचि समाजोपयोगी परिश्रमा-साठीं अनुकूल असणें संभवतच नाहीं कां ? समाजोपयोगी आवश्यक परिश्रम त्याला कष्टप्रदच वाटत जावे व त्यांपासून आपली सोडवणुक करून घेण्यासाठीं त्याने सतत प्रयास करीत राहावें–यांतून सुटकाच नाहीं कां ?

असा प्रश्न आहे खरा !

गांधीजींच्या विचारप्रणालींत समाजोपयोगी परिश्रम, मनोविनोद आणि माणसाची सांस्कृतिक उन्नति यांत अगदीं अनिवार्य असा विरोध नाहीं. उलट जसजसें या तिन्हीमधील अंतर कमी होत जाईल तसतशी माणसाची व मानव-समाजाची प्रगतीच होत जाईल. सामाजिक जीवनासाठीं जर कोणत्या ना कोणत्या प्रकारचे श्रम आवश्यक आहेत तर मग व्यक्तिगत जीवनाच्या विकासालाहि त्यांची गरज आहे. पराक्रम व उपयुक्तता यांचा पगडा भावनेवर बसला असतांना जर व्यायाम व कसरत हीं आनंदप्रद ठरूं शकतात, सामुदायिक जीवनाची इच्छा पूर्ण होते म्हणून जर खेळाला मजेचें स्वरूप प्राप्त होऊं शकतें तर सामाजिक जीवन-सिद्धीची म्हणजेच सेवाधर्माची भावना शरीरश्रमालाहि आनन्दमय बनवूं शकेल अशी आशा बाळगायला काय हरकत आहे? श्रम, उपयोगिता आणि सेवा यांचा समन्वय हेंच संस्कृतीचें किंवा सामाजिक उन्नतीचें सर्वश्रेष्ठ साधन आहे!

म्हणूनच गांधीजींच्या अर्थनीतीमध्यें या गोष्टीवर आग्रहपूर्वक भर दिला आहे कीं आमच्या उद्याच्या समाजरचनेंत माणसाला शरीरश्रमासाठीं योग्य व पुरेसे स्थान असलें पाहिजे. त्यांच्या आवश्यक व्रतमालिकेमध्यें* शरीरश्रमाचा समावेश जो केला गेला आहे तो देखील या साठीच!

---

* **आवश्यक व्रतमालिका**

अहिंसा सत्य अस्तेय ब्रम्हचर्य असंग्रह
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चें

(विनोबा)

# १ गांधीजींची रणनीति

"हिंदुस्थान हा लष्करी मुलुख आहे, या विधानाबद्दल माझा पूर्ण मतभेद आहे आणि तो मतभेद मी मोठ्या सन्मानाने प्रकट करितों. हिंदुस्थान लष्करी मुलुख नाहीं, याबद्दल मी ईश्वराचें आभार मानतों." गांधीजींनी असें जेव्हां लिहिलें तेव्हां कित्येक देशाभिमानी लोकांना ही गोष्ट लागली. गांधींच्या म्हणण्याचा त्यांनीं असा अर्थ लावला कीं हिंदुस्थान हें एक पौरुषहीन राष्ट्र आहे. गांधीजींचें म्हणणें खोडून काढण्यासाठीं सर्व प्रकारचे ऐतिहासिक व काल्पनिक पुरावे उपस्थित केले गेले आणि हिंदुस्थान हेंहि एक सैनिक राष्ट्र आहे असें दाखवून देण्याचा निष्फळ प्रयत्न करण्यांत आला.

गांधींवर जी टीका करण्यांत आली ती विचार स्पष्ट नसल्याची द्योतक आहे. ज्याला 'सैनिकता' किंवा 'फौजीपणा' म्हणतात तो आणि शौर्य किंवा पौरुष ह्या गोष्टी एक नव्हत हें आपण विसरून गेलों. कांहीं अंशीं असें जरी मानून चाललों कीं सैनिकतेंत वीरता असते, तरी देखील हे दोन्ही शब्द समानार्थी किंवा समव्याप्त नाहीत. उलट असें देखील म्हणतां येईल कीं जेथें सैनिकवृत्ति संपते तेथून वीरवृत्तीला सुरुवात होते.

मूळ मुद्दा असा कीं वीरवृत्तीचें आश्रयस्थान काय? माणसाचें हृदय? त्याचे हात? कीं त्याचीं हत्यारें? यापैकीं हत्यारें केवळ साधनमात्र आहेत. साधन कितीहि तीक्ष्ण, कार्यक्षम आणि कुशल असलें तरी अखेर साधनच! साधन वापरणारे हात जर मजबूत नसतील तर उपयोग काय? ह्याच न्याय माणसाच्या हातांनाहि लागू आहे. ते हात कितीहि बळकट असले तरी त्यांना प्रेरित करणारें हृदय जर दुबळें असेल तर ते हातहि कांहीं कामाचे नाहींत. तात्पर्य, वीरतेचें आश्रयस्थान हत्यार किंवा हात नाहींत, माणसाचें हृदय आहे. सबब वीरवृत्तीच्या विकासासाठीं माणसांच्या हृदयांचा विकास होणें जरूर आहे. वीरतेचा विकास म्हणजे शस्त्रबळाचा किंवा बाहुबळाचा विकास नव्हे. तर मनोबलाचा विकास होय अधिक निश्चित आणि असंदिग्ध भाषेंत यालाच आत्मबळ म्हणायचें.

हिंदुस्थान फौजी मुलख नाहीं असें जेव्हां गांधीजी म्हणतात तेव्हां हिंदुस्थान शूर मुलख नव्हे असें किंचित् सुद्धा ध्यानांत आणण्याचा त्यांचा हेतू नसतो. त्यांच्या म्हणण्याचा अभिप्राय एवढाच कीं सैनिकता ही भारताची विशिष्ट प्रकृति नव्हे, सैनिक वृत्तीची प्रतिष्ठा आणि पूजा भारतीय संस्कृतीची प्रधान प्रवृत्ति नव्हे. क्षात्रवृत्तीला येथे स्थान अवश्य होतें. पण तें अग्रस्थान मात्र कधींच नव्हतें. गांधीजी आणखी असेंहि सुचवूं इच्छितात कीं भारताचा अधःपात आणि गुलामी याचें कारण तो एक फौजी मुलख नाहीं हें नव्हे !

हिंदुस्थान निःशस्त्र आणि सैनिक शिक्षणांत मागासलेला देश आहे, हें जर हिंदुस्थानच्या गुलामीचें कारण नसेल तर दुसरें कारण तरी कोणतें ? या प्रश्नाचें योग्य उत्तर असें देतां येईल कीं जेव्हां हिंदुस्थानच्या कपाळीं गुलामी आली तेव्हां हिंदी लोकांच्या हातीं हत्यारें होतीं. त्यांच्या शौर्याबाबत कुणाला कसलाच संशय नव्हता. शस्त्रास्त्रविद्येत त्यांचें कौशल्य स्वयंसिद्ध होतें. कारण कीं विजेत्यांच्या सैन्यांत त्यांची संख्या विदेशी सैनिकांपेक्षां कितीतरी अधिक होती. ज्या मुहूर्तावर या देशांत इंग्रजांचें शुभागमन झालें त्यावेळीं हिंदी लोकसंख्या कांही नाही तरी तीस कोटी असेल. इंग्रजांनीं हत्यारांचा कायदा केला आणि कसलाहि विरोध न करतां हिन्दी लोकांनीं आपलीं हत्यारें त्यांच्या स्वाधीन केलीं. जगाच्या इतिहासांत ही एक नवी आणि अभूतपूर्व अशी घटना आहे. तीस कोटी लोकांनी लाख, दोन लाख गोऱ्या लोकांच्या स्वाधीन आपलीं हत्यारें निमूटपणें केलीं तरी कशीं ? कोणत्या भावनेने ? परंतु या प्रश्नाचें विवेचन हा प्रस्तुतचा विषय नव्हे. येथे एवढेंच दिग्दर्शित करायचें आहे कीं हिंदुस्थानच्या गुलामीचें कारण त्याचें निःशस्त्रीकरण नव्हे. आज देखील पुष्कळ हिंदी लोकांच्या हातीं हत्यारें आहेत. पण त्यांचा प्रयोग विजेत्यांच्या बाजूनें आपल्या लोकांवरच बहुधा करण्यांत येतो.

तेव्हां असें म्हटलें पाहिजे कीं आमच्यापुढे महत्वाचा मुद्दा सैनिकतेच्या विकासाचा नसून मनोबलाच्या व संघटनशक्तीच्या विकासाचा आहे. सशस्त्र सैन्यांत देखील संघशक्ति हीच शौर्याची गंगोत्री मानली जाते. इंग्रजींत जिला 'स्पिरिट डी कोर' म्हणजे सांघिक भावना म्हणतात, तीच सैनिक शिस्तीचा मूलाधार होय. जोपर्यंत ही भावना उत्पन्न होत नाहीं तोंपर्यंत कोणत्याहि प्रकारची सामुदायिक शक्ति उत्पन्न होऊं शकत नाहीं.

या सामुदायिक शक्तीचा अभाव हेंच भारताच्या दुरवस्थेचें मुख्य कारण आहे. इंग्रजींत एक अशी म्हण आहे कीं चोराच्या टोळीमध्येंहि एक परस्पर प्रामाणिक भाव असावा लागतो. चोरांची कां होईना पण परस्पर विश्वासावांचून टोळीच बनूं शकत नाहीं. आणि टिकूंहि शकत नाहीं. हिंदुस्थानांत व्यक्तिगत शौर्य आणि सद्गुण यांची वाण नाहीं. येथील कितीतरी व्यक्ति आपापल्यापरी आपापल्या क्षेत्रांत जगांत अद्वितीय आहेत. पण अनेक व्यक्तींचें एकीकरण करून एक संकलित शक्ति निर्माण करण्यासाठीं ज्या सामुदायिक चारित्र्याची गरज असते तें चारित्र्य आपल्यांत नाहीं. या सामुदायिक दानतीचा विकास हाच भारताचा मुख्य प्रश्न आहे. सैनिक बलाच्या उत्कर्षानें व अवाढव्य खटाटोपानें हें साधणें शक्य नाहीं.

आज आम्ही आपला मुख्य प्रश्न सोडविण्याचा प्रयास करीत असतांना आम्हांला एका नव्या संस्कृतीचें अग्रदूत होण्याचीहि संधी मिळत आहे ही आमच्यासाठीं एक निरुपम गौरवाची गोष्ट आहे. गांधीजी आम्हांला असें समजावूं इच्छितात कीं आमची परंपरा, संस्कृति आणि परिस्थिति या महान् कार्यासाठीं सर्वथा अनुकूल आहेत. जग आज अशा एका संस्कृतीसाठीं धडपडत आहे कीं जिच्यांत साहस, पराक्रम, कष्टसहिष्णुता, आत्माहुति इत्यादि सद्गुणांना भरपूर वाव असूनहि हत्या आणि हिंसेला मात्र जिच्यांत तिळभरहि स्थान नाहीं. अशा प्रकारच्या वृत्तीचा विकास आणि संघटन हेंच गांधींचें जीवनकार्य होय.

समाजांत शिपायाची प्रतिष्ठा कोणत्या गुणामुळें होते याचा प्रथम विचार करायला हवा. युद्धाच्या प्रतिष्ठेचा आधार काय ? समाजांत शिपायाला जो मान मिळतो तो एवढ्यासाठीं कीं तो आपले प्राण धोक्यांत घालायला कचरत नाहीं. रणमैदानांवर क्षणाक्षणाला त्याला मृत्यूशीं सामना करावा लागतो. जिथें मरणाचें भय असतें अशा ठिकाणीं व अशा प्रसंगीं तोंड देण्यांतच खऱ्या शौर्याची खूण पटते. हाच क्षात्रधर्म होय. गीतेमध्यें याचाच निर्देश ' युद्धेचाप्यपलायनम् ' या शब्दांत केलेला आहे.

हिंसा वर्ज्य करून मृत्यूला तोंड देण्याचे प्रसंग आले असतां उत्साहानें, हौसेनें धावून जाण्याची आकांक्षा आमच्या अहिंसक सैनिकांत जागृत करूं शकूं

त्यावेळींच आमच्या सामुदायिक जीवनांत गांधींची अहिंसा पुरेपुर बाणली आहे असें होईल. पुरानें भरधांव वहात असलेल्या नदीच्या प्रक्षुब्ध पात्रांत बेधडक उडी घेणें, उभ्या गावाला आणि अनेक जीवांना भस्मसात् करण्यासाठीं उठलेल्या आगीच्या विकराल ज्वालांना भीक न घालतां पुढे होणें, महासागराची खोली अजमावण्याची आकांक्षा ठेवणें आणि गौरीशंकराच्या गगनचुंबी शिखरांवर चढून जाण्यासाठीं उतावीळ होणें—हीं सगळीं अहिंसक वीरतेचीं लक्षणें होत.

यासाठीं आम्हांला आजकालच्या सशस्त्र सैनिकासारखीच विशिष्ट शिस्तीची अत्यंत जरूरी आहे. हिंसक सैन्यामध्यें शिस्त नीट रहावी म्हणून शिपायांना विचार करण्याची सक्त मनाई असते. नेपोलियनने कोठेंसे म्हटलें आहे कीं 'ज्याक्षणीं माझे सैनिक विचार करूं लागतील त्या क्षणीं माझ्या सैन्यांतील सारी शिस्त नाहीशी होईल.' शिपायांच्या मनांत कसल्याहि प्रकारचा विचार, सहृदयता, पारिवारिक प्रेम इत्यादि मानवोचित भावना निर्माण होऊं नयेत म्हणून आटोकाट प्रयत्न करण्यांत येतो. त्यांच्या बुद्धीला विचार करतां येऊं नये म्हणून त्यांना दारू पिण्याचें प्रोत्साहन दिलें जातें. त्यांच्या मनांत कोणत्याहि प्रकारचें कौटुंबिक किंवा व्यक्तिगत प्रेमपाश राहूं नयेत म्हणून त्यांना कौटुंबिक जीवनांपासून वंचित ठेवलें जातें; त्यांच्या पशुसुलभ वासना तृप्त करण्यासाठीं त्यांना आहार, मदिरा, आणि मदिराक्षी पुरविल्या जातात. शांततेच्या वेळीं त्यांना रेडे, एडके किंवा कोंबडे यांच्यासारखें खाऊं पिऊं घालून झुंज खेळण्यासाठीं सज्ज केलें जातें.

आज आमच्या हिंसक सैनिकांत सभ्यता आणि मानवोचित कोमलता यांचा अंशहि नसतो म्हटलें तरी चालेल. याचें प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे शांततेच्या वेळीं सभ्य नागरिक, स्त्रिया आणि मुलें सैनिकांपासून दूर राहूं इच्छितात हें होय. हिंसेचा प्रतिकार प्रतिहिंसेनें करण्याचा सैनिकाला इतका सराव झालेला असतो कीं तो स्वत:च हिंसेची प्रतिमा बनून जातो. म्हणून ज्यावेळीं शांतता, शिष्टता आणि सभ्यता नांदते त्यावेळीं सैनिकांबद्दल लोकांची भावना भयाची किंवा उपेक्षेची असते.

हिंसक सैन्यामध्यें देखील प्रचलित राज्याचें रक्षण करणारी सेना आणि क्रांतिकारक सेना यांच्यांत फरक असतो. पहिल्या सैन्याचे शिपाई अन्नाचे गुलाम असतात तर क्रांतिकारक सैन्याचे शिपाई स्वयंसैनिक असतात. तथापि जगांतल्या क्रांतिकारकांनीं आपल्या क्रांतिकारक सैन्यामध्यें आजवर परंपरागत युद्धप्रणाली

आणि प्रचलित युद्धसाधनेंच वापरलीं आहेत. सैन्याच्या संघटनेंत आणि आयुधांत ते क्रांति करूं शकले नाहींत, म्हणून कोठे कोठे त्यांची क्रांति असफल तर कोठें अल्पसफल ठरली आहे!

गांधीजी आपल्या विशिष्ठ सरणींचे एकमेव क्रांतिकारक आहेत. ते क्रान्तीच्या युद्धप्रणालींत, सैन्यांत आणि युद्धसाधनांतहि क्रांति करूं इच्छितात. इतर क्रांतिकारकांसारखेच तेहि जगांतून मोठी पोथी आणि मोठी थैली यांची प्रतिष्ठा नाहींशीं करूं इच्छितात. एवढेंच नव्हे तर मोठी लाठी, आणि तीक्ष्ण तरवारींचीहि प्रतिष्ठा नाहींशी करूं इच्छितात. समाजांत सभ्य नागरिकांची प्रतिष्ठा जोपर्यंत सैनिकांच्या तरवारीनें सुरक्षित राखली जाते, तोपर्यंत ती प्रतिष्ठा किंवा इज्जत मानवतेची नव्हे तर तरवारीची आणि लाठीचीच असते. याचेंच नांव लष्करशाही किंवा सुसंघटित लाठी राज्य!

मी शाळेंत शिकत होतों. त्यावेळीं रोज एका सावकाराला आपल्याबरोबर हमेशा चार लाठीबंद वागवितांना पहात असें. तेव्हा मी त्याच्या मुलाला विचारलें, 'तुझे वडील या गुंडांना घेऊनच कां बाहेर निघतात?" तो म्हणाला, "हे माझ्या वडिलांच्या प्रतिष्ठेचे, इज्जतीचे रक्षक आहेत." मी पुन: विचारलें, "समजा, या गुंडांच्याच मनांत तुझ्या वडिलांची प्रतिष्ठा किंवा इज्जत घेण्याचें आलें तर?" तो मुलगा शहाणा होता. त्याला कळून चुकलें. तो म्हणाला, "तुझें म्हणणें असेंच ना, कीं इज्जत खरोखरी वडिलांची नसून या गुंडांच्या लाठीची आहे?" समाजाची सुरक्षितता जोंपर्यंत थोड्याशा सशस्त्र शिपायांवर अवलंबून राहील, तोंपर्यंत मानमरातब, इज्जत, किंमत, शस्त्रांची व काठीचीच राहील, मानवी आत्म्याची नाहीं.. जर तुम्हांला क्रान्तीचे अग्रदूत व्हायचें असेल तर शस्त्रांचें मूल्यहि नाहींसें करावें लागेल.

सारांश, आम्हांला स्वयंभावना, शिस्त, सामुदायिक कार्य ह्या गोष्टी हव्या आहेत. पण हिंसेला आम्हीं फाटा देऊं इच्छितों. एका उद्देशाने प्रेरित होऊन, सेनापतीच्या आज्ञेने, एकदिलाने, एकसाथ काम करण्याचा अभ्यास हेंच खरें अनुशासन आहे. या प्रकारचें अनुशासन किंवा शिस्त हिंसक किंवा अहिंसक अशा दोन्ही प्रकारच्या सैनिक संघटनांसाठीं आवश्यक आहेत. फरक एवढाच कीं हिंसक शिपाई शिस्तीचें पालन यंत्रांसारखें करतों व अहिंसक शिपाइ समजून उमजून आपल्या आत्म्यांच्या प्रेरणेनें शिस्त पाळतो. सशस्त्र सैन्यांत संख्येचें जे महत्व

आहे तें एवढ्यासाठींच. प्रत्येक शिपाई अगदीं एकएकटा कांहीं मोठा शूर रहात नाहीं. पण सर्व मिळून एकसाथ ते मोठमोठीं बिकट कामेंहि करून टाकतात. अहिंसक सेनेंत देखील एका विशिष्ठ मर्यादेपर्यंत संख्येचें महत्व आहेच. पण या सेनेचें सर्वस्व आत्मबल असल्यामुळें संख्येपेक्षां तिच्या गुणालाच अधिक महत्व असतें.

आणि शस्त्रधारी योद्धयाच्याहि वीरतेचा अंतिम आधार झाला तरी तो त्याचा आत्माच असतो. धर्मयुद्धाच्या शिस्तीत राहणारा योद्धा आपल्या यश:शरीराच्या रक्षणासाठीं विजयाची व प्राणाचीहि पर्वा करीत नाहीं. शिखंडीच्या शरवर्षावानें विद्ध होऊन देखील महर्षी भीष्मांनी धर्मयुद्धाची शींव उल्लंघिली नाहीं, ती यासाठींच. पॉम्पे शहराची राख होत असतांना तो अज्ञात सैनिक केवळ आपल्या सेनापतीची वाट पहात उभा जळून भस्म झाला, तो देखील येवढ्या-साठींच. शिस्तीची परिणती एका विशिष्ठ स्वभावांत आणि मनोवृत्तींत होते. एका मानसशास्त्राच्या पुस्तकांत एक दाखला दिला आहे. कोणी एक शिपाई दुधाची झारी घेऊन जात होता. एका वात्रट मुलानें उगीच खोडकरपणानें जोरानें हुकूम दिला "टेन्शन." आपण काय करीत आहों ह्याचें भान येण्यापूर्वीच त्या शिपायानें दुधाचें भाडें फेंकून दिलें आणि अटेन्शनच्या स्थितींत तो उभा राहिला. हा विशिष्ट संवयीचा परिणाम आहे. ती अगदीं स्वभावगत होऊन जाते.

अशाच प्रकारची गांधींची देखील इच्छा आहे. त्यांना असें वाटतें कीं अहिंसक सैनिकांचें शिक्षण आणि अभ्यास असाच असावा. त्याचीहि अशीच एक विशिष्ट मनोवृत्ति व स्वभाव तद्द्वारा बनावा. शारीरिक बळ कितीहि मोठें असलें तरी तें अमर्याद थोडेंच असतें ? पण आत्मशक्ति मात्र अमर्याद व अमोघ असते. ज्यांना रक्त पाहून मूर्च्छा येते ते अहिंसकहि नव्हत आणि कोमल मनाचे पण नव्हत. कोमलपणा म्हणजे भित्रपणा नव्हे आणि क्रौर्य किंवा निर्घृणता म्हणजे शौर्य नव्हे. एका निःशस्त्र, हताश राष्ट्रामध्यें आत्मविश्वास जागविण्याची गांधीजींची इच्छा आहे व एवढ्यासाठींच ते राष्ट्राला निरुपम व अगाध अशा आत्मबलाची दीक्षा देऊं इच्छितात. त्यांच्या सैनिकसंघटनेचें व अभूतपूर्व रणनीतीचें हेंच रहस्य होय !

# या 'साधने' संबधी

सत्याग्रहासाठीं काय तयारी करावी लागते हें जाणून घेण्याचा जे पाश्चिमात्य प्रयत्न करतात त्यांच्या आकलनाकरितां आणि मार्गदर्शनाकरितां श्री. रिचर्ड. बी. ग्रेग यांनीं ही छोटीशी पुस्तिका लिहिली आहे. 'शांततावादा' च्या ऐवजी मी जाणूनबुजून 'सत्याग्रह' हा शब्द वापरीत आहें. कारण शांततावादांत जें येतें व खपतें तें आणि सत्याग्रहानें ज्याचा बोध होतो तें यांत सारखेपणा नाहीं. श्री. ग्रेग हे अत्यंत तत्पर आणि पद्धतशीर काम करणारे असे आहेत. हिंदुस्थानांत व तेंहि साबरमतीच्या आश्रमांत ते जवळ जवळ वर्षभर होते. सबब, त्यांना सत्याग्रहाविषयीं अधिकृत माहिती आहे. त्यांची ही पुस्तिका अगदी योग्य वेळीं बाहेर पडत आहे, आणि हिंदुस्थानांतील सत्याग्रही मंडळीनाहि तिचा उपयोग झाल्यावाचून राहावयाचा नाहीं. पाश्चिमात्त्यांना समजेल व रुचेल अशा धर्तीवर त्यांनी हें पुस्तक लिहिलें असलें तरी त्यांतील सार पाश्चिमात्त्य सत्याग्रही काय किंवा पौर्वात्त्य सत्याग्रही काय यांना एकच आहे. म्हणून या पुस्तकाची ही स्वस्त आवृत्ति हिंदुस्थानांत काढली आहे. हेतु हा कीं हिंदी वाचकांनाहि तिचा उपयोग व्हावा. पुष्कळांना त्यापासुन लाभ होईल अशी आशा आहे. आपल्या येथील सत्याग्रहाच्या प्रत्यक्ष कार्यपद्धतीचें अवलोकन करून श्री. ग्रेग यानीं या पुस्तकांतील मजकूर रचला आहे. त्यामुळें आपल्या सत्याग्रही मंडळीवर एक विशेष जबाबदारी येऊन पडली आहे. सर्व माहिती पद्धतशीर रीतीने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने एक सारग्रंथ म्हणून हें पुस्तक कितीहि उत्कृष्ट आणि मार्ग-दर्शक वाटलें तरी, हिंदुस्थानांतील सत्याग्रहाचा प्रयोग जर असफल ठरला तर या पुस्तकाचा उद्देशहि विफल झाला असेंच मानावें लागेल.

सेवाग्राम<br>
२४-८-४१

**मो. क. गांधी.**

# अहिंसेची साधना

**आज** कितीतरी वर्षांपासून माणसाच्या मनावर लष्करी शिस्तीची पकड बसली असून तिच्यावर त्याची श्रद्धा टिकून आहे. संयोजित हिंसेचे परिणाम अल्पकालिक, ढोबळ आणि घातकी असून देखील हिंसेंत जी सुव्यवस्था, जो टक्केपणाचा आव आणि डंका दिसून येतो त्यामुळें तिच्याबद्दल जगाला खूपच वचक आहे. युद्धाचा आपल्याला कितीहि उबग असो पण जेव्हां कधीं न्याय व शांतता स्थापन करण्याची आपल्याला विवंचना पडते तेव्हां आपणापुढें एकच शक्ति उभी रहाते व ती म्हणजे लष्करी शिस्तीची ! या शक्तीचें रहस्य कशांत आहे ? मानवी मनांत हिंसेबद्दल जी दहशत बसली आहे तीच केवळ याच्या मुळाशीं आहे कां ?

नेपोलियन म्हणत असे–“ युद्ध–तंत्रांत जे घटक विजय मिळवून देतात त्यांत शेकडा ७५ टक्के शिस्तीचा भाग असतो. ” फॉशच्या मतें “ सैन्याची सर्व मदार शिस्तीवर असते.” ड्यूक ऑफ वेलिंग्टन् म्हणे–“ संवय, शिस्त किंवा वळण हें स्वभावापेक्षां दसपट बलवत्तर असतें. ” प्रसिध्द कवि आणि आयर्लंडातील शेतकी सहकारी संघाचा संस्थापक जॉर्ज रसेल ( ए. इ. ) याचा असा विश्वास होता कीं “लष्करी जीवनापेक्षां नागरिक जीवनालाच अधिक उपयोगी पडूं शकणारा जीवनाचा नियम युद्धविशारदांनी शोधून काढला आणि अत्यंत यशस्वीरीतीने अमलांत आणून दाखविला. तो नियम किंवा स्वभाव म्हणजे स्वत:च्या वैयक्तिक बाबी विसरून सर्वांच्या हितासाठी आपल्या हितावर पाणी सोडण्याचें व्यक्तीला लागूं शकणारें वळण ! ज्यायोगे हें वळण दिलें जातें तें साधन म्हणजे सैनिक शिस्त ! ती अद्भुत चमत्कार घडवून आणते. या शिस्तीमुळे समष्टीच्या हितापेक्षां आत्महित कमी मानायला व्यक्ति जितक्या लवकर तयार होते तितक्या लवकर दुसऱ्या कशानेहि होऊं शकत नाहीं. * ”

---

* पहा—A. E. “ The National Being ”. New York, Macmillan, P. 127

लष्करी तज्ञांची हीं मतें जर खरीं असतील तर यांतून एक गोष्ट निश्चित फलित होते. ती म्हणजे, सैन्याची शक्ति त्याच्या शस्त्रसुसज्जतेवर किंवा संहारक शक्तीवर अवलंबून नसून त्या सैन्याला जे वळण आणि संचालन लाभतें त्यावर अधिष्ठित असते. विमानें, लढाऊ जहाजें, बंदुका, बाँबगोळे हे कांही सैन्याच्या शक्तीचें अधिष्ठान नव्हत. खरें अधिष्ठान म्हणजे सैनिकांना मिळालेलें वळण व नव्या संवयी लावून घेण्याची त्यांची क्षमता !

नेपोलियनचें देखील असेंच मत आहे कीं सैन्याची पाशवी शक्ति व नैतिक घटक याचें परस्पर प्रमाण एकाला तीन असें पडतें. प्रसिद्ध लष्करी तज्ञ, युद्धतंत्री आणि लष्करी इतिहासकार कॅप्टन बी. एच. लिडेलहार्ट यांच्या मतें तर हल्लींच्या युद्धतंत्रांत वरील प्रमाणाचें सापेक्ष महत्त्व एकाला सहा असें आहे.

लष्करांचे तज्ञ म्हणून नांवाजलेल्या लोकांची वर जीं मतें उद्धृत केलीं आहेत त्यावरून जगांतील सर्व संघर्ष अहिंसेच्या मार्गानें दूर करूं इच्छिणाऱ्यांना कांहीं आदेश टिपतां येईल का? किंवा हेंच दुसऱ्या भाषेंत मांडावयाचें झालें तर असें कीं जनतेच्या न्याय्य आकांक्षा अहिंसेच्या मार्गानेच पूर्ण होतील व संघर्ष थांबतील असें एकादें सौम्य साधन सांपडण्याची आशा आहे का? मोठमोठ्या संघर्षांत देखील नैतिक घटकांना अत्यंत महत्त्व असतें, हें जर खरें तर आपल्यालाहि अशी शिस्त नाहीं कां अंगीकृत करतां येणार कीं जी लढाईतील शिस्तीपेक्षां जास्त नैतिक आणि म्हणून जास्त उपयोगी व भरींव राहील? आपल्याला अशी एक सामाजिक शक्ति नाहीं कां उभवितां येणार कीं जिला सैनिक शिस्तीपेक्षां व शक्तीपेक्षां जास्त भरींव असें नैतिक अधिष्ठान असेल?

जॉर्ज रसेलचें मत आपण वर उद्धृत केलेंच आहे. अहिंसक प्रतिकाराच्या बाबतींत त्यांचें म्हणणें असें कीं तो नैतिक दृष्ट्या कितीहि लोभनीय असला तरी व्यावहारिक आणि मोठे प्रश्न सोडविण्याला तो कुचकामी आहे.* अहिंसक प्रतिकार अव्यावहारिक असण्याचें त्यांच्या दृष्टीनें मुख्य कारण कोणतें तर तो माणसांपासून

*पहा—A. E. "The Living Torch." London, Macmillan 1937. P. 170

आवाक्याबाहेरील अपेक्षा करतो. सत्याग्रह कांहीं बाबतींत यशस्वी ठरला हें त्यांना कबूल आहे. तथापि त्यांचा मुद्दा असा कीं बहुजनसमाजाला इतकी उच्च ध्येयदृष्टि आणि शिस्त दीर्घकाल टिकविणें शक्य नाहीं. ती त्यांच्या शक्तीपलीकडील गोष्ट आहे. सबब हें अहिंसक प्रतिकाराचें साधन अयशस्वीच ठरणार! हें त्यांचें मत दुसरे एक लष्करी तज्ञ—ज्यांचा उल्लेख आपण वर केला आहे ते कॅप्टन लिडेलहार्ट—उचलून धरतात.* कांहीं बाबतींतील सत्याग्रहाची अमोघता हे हार्टसाहेब देखील प्रांजळपणे कबूल करतात पण अहिंसक प्रतिकारानें एखादा दीर्घकालीन लढा यशस्वी करून दाखवावयाला ज्या नैतिक शिस्तीची अत्यंत गरज आहे ती नैतिक शिस्त एखादें राष्ट्र इतक्या सामूहिक रीतीनें टिकवूं शकेल कीं काय याबद्दल त्यांच्याहि मनांत किंतु आहेच!

हीं मतें कमी महत्त्वाचीं आहेत असें नाहीं. पण माझ्या मतें तीं चूक आहेत. वरील टीकाकारद्वय किंवा विचारशील व सद्हेतुप्रेरित असे दुसरेहि कित्येक लोक मुळीं हेंच गृहीत धरून चालतात कीं सर्व जनतेला प्रभावी सभ्यतेचें वळण लावण्यासाठीं जी शिस्त हवी ती फक्त दैवी किंवा अध्यात्मिक शक्तीचें अधिराज्य असेल तरच शक्य आहे.

अहिंसक त्याचप्रमाणें लष्करी शिक्षणालाहि कवायत आणि शिस्त यांची अवश्यकता आहे आणि असलें कवायतीचें आणि शिस्तीचें शिक्षण शरीरश्रमाच्या मार्फत देतां येतें हेंच यापुढील विवेचनांत स्पष्ट करण्याचा माझा हेतु आहे.

मात्र मी जो कार्यक्रम सुचविणार त्यांत एक विशिष्ट आणि निश्चित अशी आर्थिक दृष्टि अंतर्भूत असेल हें आरंभीच सांगणें इष्ट आहे. तरीहि या आर्थिक दृष्टीचा उद्देश मुख्यतः अहिंसेच्या साधनेसाठीं जें शारीरिक वळण हवें असतें तें लावण्याचा आहे. समजा, एक लष्करी अंमलदार आहे. त्याला मोटार वापरणें सोयीचें जातें कारण त्याला ती मुक्कामीं लवकर पोचवितें. इतकें असूनहि सैन्याच्या बाबतींत मात्र शिस्तीच्या उपयुक्ततेमुळें पायीं कूच करणें त्याला पटतें. तीच गोष्ट अहिंसक साधनेची. अहिंसेचा साधक शारीरिक श्रमाची आवश्यकता याच दृष्टीनें

*पहा--B. H. Liddell Hart, "Europe in Arms" London and New Yark 1937 Chapt. I

मानतो. हातानें काम केलें म्हणजे मालाची उपज कमी होईल, पुरवठा तुटेल, हें त्याच्या ध्यानीं नसतें असें थोडेच आहे ?

आतां सैनिक शिस्तीचे काय परिणाम होतात, कोणकोणते, गुण त्यामुळें अंगीं येतात हें जरा पाहूं या. एकतर त्यांच्या कवायतीमुळें सैनिकांना आपलीं हत्यारें सहज लीलया वापरण्याचा सराव होतो. रणमैदानाची रचना कशी करावी, कोणकोणते उपाय योजावे हें त्याला कळून येतें. सततची कवायत किंवा तत्सम इतर चळवळी यांच्या योगें जें उच्च सैनिक शिक्षण दिलें जातें त्यायोगें शिपायांत तत्काल आज्ञापालन, समयसूचकता, आत्मसन्मानाची जाणीव, स्वावलंबन आदि गुणांचा विकास होतो. सैन्याचा एक घटक होऊन राहण्यापुरती एकनिष्ठता, इमानीपणा, चिकाटी, कार्यनिग्रह हे गुण त्याच्यांत विकास पावतात. त्याच्यांत आत्मविश्वास येतो. त्याच्यांतलि आत्मसंयमाच्या व आत्मत्यागाच्या वृत्तींना पोषण मिळतें. शिवाय, सर्वसामान्य कार्यासाठी जी कष्टसहिष्णुता लागते तिची तसेंच व्यक्तीच्या हितापेक्षा श्रेष्ठ अशा साध्याच्या सफलतेसाठी जें कार्यकौशल्य आणि सहयोग लागतो त्याची जोपासना होते. साध्या माणसांतहि अशी जाणीव उत्पन्न होते कीं आपण लोकांचें, त्यांच्या मालमत्तेचे व राष्ट्राचे रक्षक आहोंत. या जाणीवेने सैनिकांत उत्साह व धैर्य वाढतें.

हें सर्व आंगीं येणार असेल तर ही मोठीच कमाई मानली पाहिजे. हीच कमाई अहिंसेच्या साधकाला जर करायची असेल तर त्याने कोणतीं साधनें वापरावीं ? कोणत्या प्रकारची कवायत त्यानें अंगीकृत करावी ?

सत्याग्रहाची मर्यादा फक्त निषेधापुरती म्हणजे अन्यायमूलक आज्ञेचें प्रतिपालन न करण्यापर्यंतच सीमित असेल तर सत्याग्रह हा हृदयपरिवर्तन करण्या-इतका यशस्वी होऊं शकत नाहीं हें आतां सर्वांना कळून चुकलें आहे. अहिंसा हा पुरुषार्थाचा धडाडीचा मार्ग आहे आणि ती अहिंसा विधायक कार्याच्या द्वारें प्रगट झाली पाहिजे हें उघड आहे. केवळ तरुणांतच नव्हे तर मनानें निरोगी व उत्साही असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या ठायीं कांहीं तरी करून दाखविण्याची, संघर्षात साहस करण्याची हांव असते. जेव्हां राष्ट्रव्यापी लढा उभा राहतो तेव्हां तर या गोष्टीचें आपल्याला स्पष्ट प्रत्यंतर येतें. ही प्रवृत्ति कोठेतरी कार्यपर

व्हावयाला हवी व तें कार्य बुध्दिपूर्वक घडायला हवें. ज्या उद्देशानें त्या कार्याचा उपक्रम केला तो उद्देश सफल करुन दाखविण्यापुरती शक्ति त्यामुळें निर्माण झाली पाहिजे, व त्या शक्तीच्या द्वारें चिरंजीव सुव्यवस्था, सुरक्षितता, स्वतंत्रता नैतिक समानता, या सारख्या परस्पर आदर, मैत्री, आणि शांतता वाढविणाऱ्या गुणांना वाव मिळाला पाहिजे. सर्वांना झेपेल आणि अंमलांत आणतां येईल अशी एखादी सर्वंकष योजना ( नुसतें बोलणें नव्हे. ) मांडली गेल्याशिवाय पुष्कळ युद्धविरोधी लोकांना आपली अहिंसेवरील श्रद्धा टिकवितां येणें शक्य नाहीं. केवळ तत्वघोषानें तर हें काम होणेंच नाहीं. नैतिक दृष्टीनें आणि मानसशास्त्राच्या दृष्टीनेंहि असल्या एखाद्या विधायक कार्ययोजनेची गरज तीव्रतर होत आहे. ती गरज वेळींच भागविली गेली नाहीं तर शांततावाद हा केवळ निषेधात्मक होऊन बसेल. ऑल्बर्ट आइन्स्टिन, बर्ट्रांड रसेल, ए. ए. मिल्ने, आणि बेवर्लि निकल्स यांच्यासारख्या एकेकाळीं नाणावलेल्या शांततावादी मंडळीचा आज अहिंसेवरील जो विश्वास उडाला आहे याचेंहि कारण झालें तरी वर उल्लेखिलेल्या एखाद्या विधायक कार्यक्रमाचा आणि त्यावरील निष्ठेचा अभावच होय !

## शरीरश्रम आणि मानसशास्त्र.

बहुजन समाज शरीरश्रमाच्या द्वारेंच शिकतो. केवळ भाषेच्या द्वारें दिलेलें ज्ञान उमजत नाहीं. गणितासारख्या बौद्धिक विषयालाहि हें लागू पडतें. गणित नीट समजावून घ्यावयाचें असल्यास भूमितीच्या आकृति, बीजगणिताचीं समीकरणें किंवा गणिताचीं उदाहरणें प्रत्यक्ष करुन पहावीं लागतात्. त्याविना त्या विषयाचें मर्मच आकलन होऊं शकत नाहीं. तसेंच सिद्धांतांचेंहि आहे. एकादें तत्त्व किंवा सिद्धान्त प्रत्यक्ष कृतींत उतरवून पडताळल्याशिवाय तदन्तर्गत कार्य-कारणभाव नीट उकलत नाहीं. बहुसंख्य लोकांना बाह्येंद्रिय संवेदनाच्या द्वारेंच सुखाचा व समाधानाचा प्रत्यय येतो. हेंच काय पण विचारयुक्त व भावमिश्रित अशी आपली वृत्ति देखील ( Sentiment ) * विशिष्ट प्रकारच्या सृजनात्मक

* Sentiment या शब्दाचा मानसशास्त्रीय अर्थ येथें अभिप्रेत आहे. तो म्हणजे—an organized arrangement of feelings and thaughts. पहा:— T. N. Whitehead " Leadership in Free Society. " Cambridge; Mass; Harvard University Press, 1936.

कृतींतूनच विकसित होते, व क्रियासातत्यानें स्वभावाला वळण लागतें. आपल्या सिद्धांतांकडून काम घेतां यावें, त्यांना राबवितां यावें म्हणूनच ते कृतीने कसास लावावे लागतात. या सर्व कारणामुळेंच कोणतीहि कवायत असा, कोणतेंहि अनुशासन असो, चारित्र्यशिक्षणाचें कोणतेंहि साधन असो त्यांत शारीरिक श्रमांना जास्त अवसर दिला जाणें युक्त आहे. लष्करी, व्यापारी, धार्मिक किंवा वैज्ञानिक यापैकीं कोणतेंहि अनुशासन असो त्याला वरील विधान लागू पडतें.

अहिंसेच्या साधनेसाठीं क्रिया म्हणून मी हस्तव्यवसायाची, शरीरश्रमाची निवड करतों. त्यांतील खालीं दिलेले संकेत मात्र ध्यानांत ठेवलें पाहिजेत:—

( १ ) तो हस्तव्यवसाय अशी वस्तु उत्पन्न करणारा असावा कीं जी वस्तु समाजाला व विशेषतः गरीब बेकार जनतेला उपयोगी आणि हितावह होईल.

( २ ) तो व्यवसाय गरीब आणि बेकार जनतेला अंगिकारितां आला पाहिजे. त्यायोगें त्यांना आत्मसन्मानपूर्वक आपली उपजीविका करतां आली पाहिजे.

या अटी जर पाळल्या गेल्या तर अहिंसेच्या साधनेसाठीं घेतलेला हा हस्तव्यवसाय सैनिक शिस्तीपेक्षांहि जास्त नैतिक, चारित्र्य वाढविणारा आणि म्हणून शक्तिवर्धक ठरणार आहे.

असलीं कामें कोणतीं असूं शकतात यासंबंधीं पुढें चर्चा करूंच. असल्या कामाचें मूल्य दोन तऱ्हांनीं मापतां येतें:—

१. समाजहित आणि बंधुभाव वाढविण्याच्या दृष्टीनें.

२. सत्याग्रहाची साधना सफल व्हावी म्हणून.

शरीरश्रमाचें हें साधन विकासक्रमाच्या दृष्टीनेंहि सत्याग्रहाच्या साधनेला अत्यंत तर्कशुध्द कसें ठरूं शकतें, हें अनेक सबल कारणांनीं सिध्द करतां येईल. माणूस आणि इतर प्राणी यांत हातांचेंच अंतर आहे. म्हणजे माणसांना हात आहेत व प्राण्यांना नाहींत. हातानें आपण अवजारें वापरूं शकतों. ही देण आपल्याला मिळाल्यामुळेच आपण सृष्टीशीं निकट साहचर्य वाढविलें, सृष्टीवर आधिपत्य मिळविलें. या विजयाचें प्रतीक म्हणून आपल्याला हीं अवजारें दाखवितां येतील. जगांतील घडामोडींच्या मुळाशीं कार्यकारणभाव असतो याची

आपल्याला अस्पष्ट कां होईना पण जी कल्पना आली ती या अवजारांमुळेंच. बाह्य सृष्टींतील कार्यकारणभाव आकलन करता करतांच आपण अतःसृष्टीची घडामोड समजूं शकलों आणि त्यायोगेच मानसिक वस्तुचित्रें* उभाविण्याची शक्तीहि आपण विकासित केली. हात व डोळा यांच्या अनुबन्धाने व त्यांच्या सामायिक उपयोगानें आपल्या ठायीं आत्मप्रत्यय आला. मानवजातीच्या उत्क्रांतींत मानवी मनाला विकसन आणि उत्तेजन जर कशानें मिळालें असेल तर तें त्याच्या हातांनी आणि अवजारांनीच !× आपल्या विचारांना, भावनांना, मनोविकारांना अवजारांच्या सतत उपयोगानें अजाणतां एक निश्चित वळण मिळतें. त्यामुळे आजुबाजूच्या परिस्थितीशीं मिळवून घेतांना एकप्रकारें आत्मविश्वास आणि धिवसा वाटतो. बुद्धि आणि इन्द्रियें यांना हा जो अनुभव येतो व तो अंगवळणी पडल्यामुळे जो सामवायिक परिणाम होतो त्यायोगे श्रद्धा, आत्मविश्वास, स्वाभिमान, आत्मसन्मान व कल्पक-शक्ति हे गुण अंगीं येतात व शेवटपर्यंत टिकतात.

बौद्धिक कामातच जे बहुधा मग्न असतात त्यांना हें पटायचें नाहीं. त्यांना असेंहि कदाचित् वाटेल कीं हें सर्व फुगवून लिहिलें आहे; पण अनुभव घेतल्यानंतर त्यांची खात्री पटेल. याचें एक प्रत्यक्ष प्रमाण आपल्याला वेड्यांच्या इस्पितळांत मिळतें. तीव्र विषण्णतेच्या मानसिक रोगाने जे पछाडले असतात त्यांच्यासाठीं सूक्ष्म पण जलद गुणकारी मात्रा म्हणून साध्या शरीरश्रमाची योजना केली जाते. त्याचा परिणाम रोग्याच्या ठायीं आत्मविश्वास, जीवनरुचि, आशा व धैर्य वाढविण्याकडे होतो. आपल्या गरजेच्या वस्तू जर आपण आपल्या हातांनीं करून वापरल्या तर जीवनरुचि व आत्मसन्मान कसे वाढतात हें या शरीरश्रमात्मक उपचारांनीं स्पष्ट होतें.

---

* पहा—Jack Lindsay, "A Short History of Culture," London Gollanez 1939 p. p. 23-25.

× G. Elliot Smith यांनी लिहिलेल्या "Early Man: His Origin, Developement and Culture" या पुस्तकांतील "Evolution of the mind" पहा. आवृत्ति London, Ernest Benn Ltd. 1931. पुनः Jones and Portels यांचें "The Matrix of the Mind" हें पुस्तक पहा. आवृत्ति Honolulu, Hawaii, University Press Association 1928.

## प्रास्ताविक शंका

या विषयाचा उहापोह करण्यापूर्वी एका तीव्र आक्षेपाला उत्तर देणें जरूर आहे. एखादा संशयात्मा असें विचारील कीं, काय हो, अहिंसेच्या साधनेसाठीं हे तुमचे शरीरश्रम जर उपयोगी पडतात तर मग शेतकरी किंवा शहरांतील कामगार (ज्यांचाच देशांत जास्त भरणा आहे) तुमच्या उपयोगी पडतीलच. कारण ते श्रमजीवि आहेत. त्यांच्या जीवावर करा कीं मग तुमच्या संभाव्य शत्रूविरुध्द सत्याग्रहाची मोहीम ! तत्परता, अवधान, चापल्य, बुध्दीचें समत्व इत्यादि गुण जे एकाद्या सैनिकांत आढळतात ते या शेतकऱ्यांत व मजुरांत कां आढळूं नयेत ? आमच्या दक्षिणेकडील पहाडी लोक * आपलीं सर्व कामें स्वतःच आणि तींहि त्या तुमच्या अवजारांनींच करतात. त्यांचा निर्वाहच त्यावर आहे. पण या कारणामुळें त्यांच्या जीवनाचें वळण अहिंसक आहे असा आमचा आढळ नाहीं. असें कां ?

आक्षेपकांच्या या युक्तिवादाला आपण जें उत्तर देणार त्याचें तीन विभाग पडतात. पहिलें उत्तर असें कीं, सत्याग्रहाच्या मोहिमेसंबंधींच बोलावयाचें तर शेतीवरील असो किंवा कारखान्यांतील असो जे कामकरी असतात त्यांच्यांत व्यक्तिशः खरोखरीच अशी मोहीम चालविण्याची जास्त कुवत असते. कामगारांचे संप याची प्रतीति देतील. पुष्कळशा संपांचें स्वरूप बहुतांशी अहिंसकच असतें. संपफोड्यांना, पोलिसांना, संपाचें स्वरूप हिंसक दाखविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना किंवा वर्तमानपत्रवाल्यांना जरी त्या संपांत हिंसा आणतां आली किंवा जरी ते तशी आणीत असले तरी संपाचें स्वरूप वस्तुतः अहिंसक असतें हें खरें आहे. या विधानाला ज्यांनीं प्रत्यक्ष जाऊन संपाचें स्वरूप पाहिलें आहे असे किंवा अनुभवी व प्रामाणिक बातमीदार पुष्टि देतील. जेव्हां एखादा अहिंसक असलेला पुढारी त्यांना लाभतो तेव्हां हेच कामकरी कमालीचा आत्मसंयम दाखवितात. अहिंसेचा स्वीकार करण्याची त्यांची जी ही मनोरचना असते ती माझ्या मतें शरीरश्रमामुळेंच बनते. असा त्यांचा स्वभाव कां व कसा बनतो हें पुढे येईलच.

---

* अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांमधील हायलँडर्स. श्री. ग्रेग यानीं हें पुस्तक अमेरिकन लोकांसाठीं लिहिलें असल्यामुळें त्यांत संदर्भ तिकडील आले आहेत. —संपादक.

तथापि मोठ्या प्रमाणावर दीर्घकालीन लढा अहिंसेने लढण्याची आज या कामकऱ्यांची तयारी नाहीं. कारण त्यांची बाजू मांडण्याचें जेव्हां काम पडतें तेव्हां मध्यम वर्गातील पुढाऱ्यांकडे ते संवयीने धांव घेतात आणि या पुढाऱ्यांत एकता आणि राजकारणाला लागणारें चातुर्य यांचा अभाव असतो. शिवाय पुढाऱ्यांपैकीहि फारच थोड्यांना अहिंसेचें दर्शन झालेलें असतें. पुष्कळांना तें कळलेलेंहि नसतें. आणि त्यांचा त्यावर विश्वासहि नसतो.

आतां आक्षेपाचा दुसरा भाग. त्याचें उत्तर असें. दीर्घकालीन सामूहिक अहिंसक प्रतिकारासाठीं ज्या शिस्तीची गरज असते त्या शिस्तीचें शिक्षण नुसत्या शरीरश्रमांनीं मिळत नाहीं. त्या शरीरश्रमामागें विशिष्ट प्रकारची भूमिका व मार्गदर्शन असावें लागतें. भागन् भाग अलग केलेल्या घड्याळाचा दृष्टांत येथें लागू पडतो. घड्याळ चालू व्हावयाला जितक्या चाकांची किंवा स्प्रिंग्सची अवश्यकता असते तेवढें सर्व सामान तिथें असतें; पण सर्व भाग अव्यवस्थितपणे पुंजका करून ठेवलेलें. घड्याळाकडून जर काम घ्यायचें तर ते सर्व भाग नीट जुळवायला हवेत. एका चाकाचा दुसऱ्याशीं कार्यसंबंध सांधायला हवा म्हणजे मग तें घड्याळ चालेल. तसेंच शरीरश्रमाचें आहे. अहिंसक जीवनादर्शाची सर्वांगीण जाणीव ठेवून जर तें काम केलें गेलें तर व्यक्तीसाठीं देखील तें शिस्तीच्या शिक्षणाचें एक अमोघ साधन बनूं शकतें आणि तेंच काम सामूहिकरीत्या मोठ्या प्रमाणावर केलें गेलें, सामाजिक किंवा राजकीय सुधारणेच्या उद्दिष्टाकरितां आखलेल्या कार्यक्रमांतील एक बुध्दिगम्य योजना म्हणून जर त्या कामाचा अवलंब केला गेला, व त्या कार्यक्रमाच्या व्याप्तीची, कार्यदिशेची संपूर्ण जाणीव ठेवली तर तेंच शरीरश्रमाचें काम सामूहिक शिस्तीचें एक रामबाण साधन ठरूं शकतें.

एकादें काम, त्याची पुरी कल्पना असतांना करणें वेगळें आणि त्या कामाचा समजउमज नसतांना तें करणें वेगळें. या दोहोंत मोठा फरक आहे. एक मुलगा रेषाचित्रें चांगलीं काढतो; पण त्याला बीजगणित, भूमिति, त्रिकोणामिति यांचा गंधहि नाहीं. तर तो काय करील ? तो त्रिकोणमितींतील सिध्दांताच्या रेखाकृति फारतर हुबेहुब काढील; परंतु त्यायोगे त्याच्या डोक्यांत कांहीं प्रकाश पडणार नाहीं. पण तेंच ज्याला वरील सिध्दांतांचें आवश्यक ज्ञान आहे असा दुसरा एक

मुलगा घेऊं. तो जरी तीच आकृति काढील, आपल्या हाताचा व डोळ्यांचा जरी तितकाच उपयोग करील तरी त्याचा परिणाम मात्र वेगळा दिसेल. त्याला त्या आकृतींतून अर्थ काढतां येईल. जमीन मोजण्याच्या कामीं त्याच आकृतीचा किती उपयोग होतो हें कळल्यानें त्याला मोठा विस्मय वाटेल. या त्याच्या हुशारीनें मोजणीच्या कामीं त्याची नेमणूक सुद्धां होऊं शकेल आणि त्याचें आवडीचें कामच त्याला मिळालें असें होऊन त्यांत तो रमेल. पुढें, पूल, रस्ते बांधणें इ. समाजहिताच्या बांधकामांत तो आपली हुशारी दाखवूं शकेल. लहानपणीं जाणीवेनें त्यानें एक आकृति पेन्सिलीनें काढली काय व त्यामुळें त्याचें सर्व जीवनच बदलून त्याला एक नवेंच वळण लागतें काय ! हेंच उदाहरण आतां जनतेच्या बाबतींत लागू करतां येईल. एकादी योजना जनतेच्या मनांत पूर्णतया ठसली, तिचें समग्र दर्शन जनतेला होऊं शकलें, तिचे उद्देश तिला मान्य असले तर उत्साहाच्या, जोमाच्या, आत्मीयतेच्या, समरसतेच्या केवढाल्या ऊर्मी उसळतील ! असें होतें किंवा नाहीं हें पहावयाचें असल्यास आरंभीची बालचमूंची चळवळ, आयर्लंडांतील सिनफेन चळवळ, व मध्ययुगीन युरोपांतील धर्मयुद्धें यांचा इतिहास पहावा.

या भूमिकेवरून हायलँडर्स म्हणजे शेतकरी व कामकरी यांच्या कामाचा विचार केला तर असें दिसेल कीं ते अंगमेहनत तर करतात पण तिच्या मुळाशीं वर वर्णन केलेला समाजसुधारणेचा निःस्वार्थी असा उद्देश नसतो. ते स्वतःपुरतें, स्वतःसाठींच काम करतात. सबब सत्याग्रहाच्या शिस्तीचें एक टिकाऊ साधन म्हणून त्याचा उपयोग होत नाहीं.

आतां उत्तराचा तिसरा भाग ! आज श्रमजीवि लोकांना सामूहिक सत्याग्रहाचें वळण नाहीं. याचें कारण एकतर ते ज्या प्रकारचीं कामें करतात त्यांचा अनुबंध धंद्याशीं किंवा व्यापाराशीं स्पर्धेच्याच मुख्य उद्देशानें साधलेला असतो. हें विधान कारखान्यांतील मजूर किंवा मध्यमवर्ग यांच्या बाबतींतच लागू पडतें असें नाहीं तर शेतकऱ्यांनाहि तितकेंच लागू होतें. स्पर्धेच्या तत्त्वावर उभारले गेलेले अवाढव्य कारखाने किंवा व्यापार आजच्या परिस्थितींत आर्थिक संघर्षाला कारण होतात आणि जिथें कोणत्याहि प्रकारचा संघर्ष असतो तिथे अहिंसेचाच मुळा अभाव असतो.

हें झालें एका आक्षेपाचें उत्तर. आणि यानंतर दुसरे कदाचित् आक्षेप घेतील व म्हणतील कीं आम्हांला हें तुमचें शरीरश्रमाचें तत्त्व अहिंसक साधनेसाठीं पसंत नाही. कारण नाशीवादी किंवा फाशीवादी लोक तरुणांना ज्या रीतीनें वळण लावतात तशा प्रकारचा याहि शिस्तीला वास येतो. याला काय उत्तर देणार? येवढेंच म्हणायचें कीं अहो, प्रत्येक चांगल्या वस्तुचा चुकीच्या जीवनादर्शांशीं जोड घालून दुरूपयोग केला जाणें शक्य असतें. अशा आक्षेपकांना आमचें येवढेंच सांगणें आहे कीं त्यांनी आमचें सर्वंध विवेचन ऐकण्यापूर्वींच आपलें स्वतःचें मत निर्णायक मानूं नये.

एखाद्या उच्च उद्देशाच्या सफलतेसाठीं लढा उभा करण्याचा निर्णय जेव्हा घेतला जातो तेव्हा कवायद, शिस्त, व्यवस्था, शस्त्रास्त्रें यांची जुळवाजुवळ करण्यासाठी महिनेच काय पण वर्षेंहि खर्ची घालण्याची तरुण मंडळींना अवश्यकता वाटते. विधायक आणि अहिंसकरीत्या यश मिळावें म्हणून देखील वरीलसारखीच तयारी करावी लागते, व ती शरीरश्रम या साधनांच्या द्वारेंच होऊं शकते. कशी ती पाहूं!

## शरीरश्रम आणि सैनिक शिस्त यांचे परिणाम सारखेच!

लष्करी शिस्तीने सैनिकांत खालील गुण येतातः—

१. आज्ञाधारकता. २. स्वाभिमान. ३. स्वाश्रयीवृत्ति. ४. मनोनिग्रह. ५. संकल्पनिष्ठा. ६. परैक्यभाव. ७. सामूहिक कष्टसहिष्णुता. ८. सहकार व सुव्यवस्था यांचें महत्त्व. ९. जोम. १०. साहस. ११. बुद्धीची स्थिरता. १२. समत्व, इ.

हेच गुण सर्वंकष, बुद्धियुक्त आणि सततच्या शरीरश्रमांनी अंगीं येतात व शस्त्रांच्या तोडीचीं नैतिक साधनें शोधून काढण्याची संवय लागते. पुष्कळांना हें सगळें अत्युक्त वाटेल, आणि त्यांचा विश्वास देखील यावर बसायचा नाहीं. पण नीट रीतीनें पृथक्करण करून पाहिलें तर वरील विधानांची सत्यता पटायला वेळ लागणार नाहीं. हें सर्व कसें घडतें हें उदाहरणांनीच दाखवून देऊं म्हणजे झालें!

## आज्ञाधारकता.

सैनिकाला वरिष्ठ अधिकाऱ्याचे हुकूम तत्काल अमलांत आणण्याचें वळण असतें. अहिंसक लढ्यांतहि आज्ञापालनाचे प्रसंग कधीं कधीं येतात. सत्याग्रहीला आपल्या पुढाऱ्याचे हुकुम पाळावे लागतात. पण सामान्यपणें अहिंसकाला आपली सदसद्विवेकबुद्धि आणि आपले जीवनादर्श यांचेच आदेश सर्वप्रथम ऐकणें प्राप्त असतें व तेच त्यानें ऐकले पाहिजेत ! हा गुण अंगा यावा म्हणून जे शरीर-श्रम योजावे लागतील त्याच्या जोडीला विचारविनिमय व चिंतनहि मिळवावें लागेल. ध्यान किंवा चिंतनामुळें सदसद्विवेक बुद्धीचे आदेश पाळणें, ती बुद्धि जास्त परिणत, सर्वस्पर्शी, व्यापक करणें, तसेंच तिची पोंच व्यवहाराला जास्त धरून राहील असें वळण लावणें—इ. गुणांचा विकास करणें सुलभ होतें. आपले जीवनसिद्धांत अभिव्यापक, भरींव, सकस बनविण्यासहि चिंतनानें मदत होते. अहिंसक प्रतिकाराच्या ज्या सिद्धांतांनीं पुढाऱ्याला काम करण्याची स्फूर्ति मिळाली ते सिद्धांत मनांत ठसले, त्याचा जनतेच्या मनावर व बुद्धीवर काय परिणाम होतो हें नीट आकलन करतां आलें तर हें आज्ञापालनाचें वळण लागायला चांगली मदत होते.

## स्वाभिमान, स्वाश्रयीवृत्ति, मनोनिग्रह.

प्रथम स्वाभिमान. अहिंसक सैनिकाला शरीरश्रमाची साधना करतांना असें वाटतें कीं आपण कामसू, मेहनती आहोंत, आपल्याला देखील आपल्या हातांनीं कांहीं निर्माण करतां येतें. जी वस्तू आपण तयार केली ती चांगली ठस-ठशीत आहे, नित्योपयोगी आहे, सुंदरहि कदाचित ठरून जाईल व या सर्वांवर ताण म्हणजे तिला बाजारभाव आहे. असा प्रत्यय येत गेला आणि ही वृत्ति पोसली गेली म्हणजे स्वाभिमान वाढतो.

स्वाश्रयीवृत्तीचेंहि असेंच आहे. शहरवासियांना, बुद्धिजीवि लोकांना, श्रमविभागामुळें परावलंबी बनलेल्यांना, तसेंच, श्रमविभागणींत आपल्या वाट्याला जें काम आलें असेल त्यांतच गुणोत्कर्ष साधल्यामुळें इतर कामीं निरुपयोगी ठरलेल्यांना या स्वाश्रयी वृत्तीची अगदी पौष्टिक औषधाइतकी गरज आहे. सध्याचे दिवस आर्थिक हलाखीचे आहेत. सर्वच राष्ट्रांतील मध्यम वर्ग दिवसेंदिवस विपन्न

स्थितीला येत आहे. आपण कोणत्यावेळीं अगदीं निष्कांचन होऊन जाऊं याचा नेम राहिला नाहीं. सबब आपल्या गरजेच्या वस्तू बनवून घेण्याची ही संवय आपल्याला वादळांत सांपडलेल्या नौकेच्या नांगराप्रमाणें उपयोगी ठरावयाची आहे. कारण तिच्यामुळें भरींव, टिकाऊ असा विशिष्ट आत्मविश्वास आणि आत्मावलंब अंगीं बाणतो. हा विश्वास केवळ दिखाऊ व दांभिक असा नसतो. त्याचें स्वरूप सखोल व स्वानंददायी असें असतें. सत्याग्रहीला तर या स्वाश्रयीवृत्तीची सैनिका-पेक्षाहि जास्त गरज आहे. कारण त्याला कधीं कधीं सुदूर आघाडीवर लढावें लागतें. तिथें तो एकटा एकाकी असा असतो. ना त्याला कुणाचा सहकार ना कुणाचा आधार!

वरील गुणांचा विकास झाला म्हणजे मग जबाबदारीची जाणीव होते, व जबाबदारीचीं कामें अंगावर घेण्याचीहि मनाची तयारी होऊन पुढें येण्याला पैस मिळतो. अग्रेसर होण्याची अवश्यकता सर्वत्रच आहे. चळवळीच्या बाबतींत तिचा स्वतंत्र उल्लेख केल्यानेच तिचें महत्व वाढेल असें नाहीं.

आपण निर्माण केलेली वस्तू सुंदर आणि कलापूर्ण व्हावयास आपले हात, डोळे, बोटें यांच्या सर्व क्रिया सुसंवादी, सहज आणि सामवाइक रीतीनें घडावयास हव्यात. नियमित काम शांतपणें करीत रहाण्याची संवय असली कीं असें कार्य-कौशल्य साधतें. त्यासाठीं समत्व लागतें. मनाचा, भावनांचा, शरीराचा तोल संभाळावा लागतो. आणि त्यांतून मनाचा व शरीराचा निग्रह फलित होतो.

दिवसांतून एकाद दुसरा तास हातकाम करीत राहण्यांत कांहीं मंडळींना असें वाटेल, आपण मोठा त्याग करीत आहोंत. पण हा त्याग नव्हे. खरें पाहूं जातां हातकामानें स्वार्थत्यागाचा अर्थ कळतो. त्याची अवश्यकता, त्यापासूनचें फलित यांची जाणीव होते व स्वार्थत्यागाची शिकवण मिळते. केवळ एकादी गोष्ट सोडून देणें म्हणजे त्याग नव्हे. श्रेष्ठासाठीं श्रेयस्, मोठ्या फायद्यासाठीं छोटें हित, अधिक चांगल्यासाठीं चांगलें सोडून देण्याला त्याग म्हणतात.

## संकल्पनिष्ठा.

लष्करी सैनिक आपल्या कवायदीच्या मैदानावर रोज खेप मारतो. त्यामुळें त्याच्या आंगीं चिकाटी येते. रोजच्या नियमित संवयीचा हा परिणाम होतो. सततच्या हातकामानें—जर तें शांतपणें करीत राहिलें तर-हाच गुण विकसित होतो. मानसशास्त्राच्या दृष्टीनेहि याची उपपत्ति लावतां येईल. आपण एकादा निश्चय किंवा संकल्प करतों त्यांत दोन गोष्टी येतात. पहिली म्हणजे आपण जी स्थूल

क्रिया करावयाचें ठरवितों तिच्याबद्दल स्पष्ट कल्पना. दुसरी, ज्या रीतीने तो संकल्प पूर्ण करण्याचें ठरतें त्या रीतीने तो पूर्ण करतांना सतत प्रेरणा मिळावी म्हणून निवडलेल्या बाह्य साधनांची व्यवस्था. * सैनिकाच्या अभ्यासक्रमांत या दोन गोष्टी असतात. व त्यांचा सैनिकांच्या संकल्पशक्तीवर इष्ट असा परिणाम होतो हें नाकबूल करतां येत नाही. ज्या रीतीने हातकामाची आपण चर्चा करणार आहोंत त्यांत देखील वर दिलेल्या दोन्हीं गोष्टी आहेत. आपलें अवलोकन जास्त वाढलें कीं हातकाम करणाऱ्यांवर त्या गोष्टींचा काय परिणाम होईल याची कल्पना आपल्यास येऊं शकेल.

## परैक्यभाव

जी व्यक्ति एकाद्या संघटनेचा घटक ( ती संघटना राष्ट्रव्यापी असेल तर अधिकच उत्तम ) होऊन स्वेच्छेनें, नेकीनें आणि बुद्धिपूर्वक शरीरश्रम पत्करते तिच्यांत सहकाऱ्याशीं आत्मभावानें वागण्याची वृत्ति येणें स्वाभाविक आहे. महिनोगणती किंबहुना वर्षानुवर्षे सहकार्य केल्यानें जेवढें स्नेहबंधन वाढतें तेवढें इतर गोष्टींनी क्वचितच वाढत असेल आणि मौज अशी कीं असलें हें सहकार्य शरीरश्रमात्मक असलें तर हा एकोपा विशेषच घनिष्ठ होतो. माणसाला आपल्या स्वत्वाची जाणीव जेव्हांपासून झाली तेव्हांपासून तर त्याच्या आजच्या उत्क्रांत स्थितिपर्यंत माणसाच्या हाताचा व मनाचा आत्मप्रत्ययाशीं घनिष्ठ संबंध राहिलेला आहे. आपल्या मेंदूच्या समोरील भागांतून ( म्हणजे जेथून आपण विचार करतों ) निघणारे दोन तृतीयांशांपेक्षां जास्त मज्जातंतू मेंदूच्या मागच्या भागीं ( ज्यायोगें आपल्या कृतीवर नियंत्रण ठेवलें जातें ) एकत्रित होतात. आपण अंगीकारलेल्या क्रियेला अनुकूल होईल अशारीतीनें आपल्या स्नायूंना गति देण्याचें, त्यांना सुसंचालित ठेवण्याचें कार्य हे मज्जातंतू करतात. * मनाचे आणि शरीराचे व्यापार किती साहचर्यानें होतात याचें हें प्रमाण आहे. शरीरश्रमात्मक सहकार्यानें परस्परांतील एकोपा विशेष घनिष्ठ जो होतो तो याचमुळें !

---

* H. G. Wyatt 'The Psychology of Intelligence and will," London, Kegan Paul; New York, Harcourt, Brace 1930. A. R- Luria 'The Nature of Human Conflicts," New York, Liveright, 1932.

* G. G. Campion and Sir G. Elliot Smith, "The Neural Basis of thought" New York, Hartcourt 1934, Brace, PP. 24, 25.

आपले सर्व प्रकारचे विचार आणि कांहीं थोड्या भावना कोणत्या ना कोणत्या संकेतांच्या किंवा प्रतीकांच्या द्वारा उद्भवतात. पुष्कळसे विचार आणि काही थोडे आवेग शब्दांच्या म्हणजे दृश्य किंवा श्राव्य संकेतांच्या द्वारां उद्भवतात. या व्यतिरिक्त स्पर्शजन्य, गंधजन्य, शब्दजन्य संकेतहि आहेतच. ( स्नायूंच्या चलनाचा, स्पर्शभाव, सांध्याच्या गतीचा प्रत्यय इ. गोष्टी अनुक्रमें आल्याच ) समतोल हालचाल करितांना, वास घेतांना, उष्णतेचा प्रत्यय घेतांना जो वस्तुबोध होतो, त्यांतूनहि कल्पनाचित्रांसारखीं किंवा संकेतासारखीं भासणारीं विचारप्रेरक व भावप्रेरक साधनें निघतातच. बहुतेक माणसांना उपरोक्त प्रेरक साधनांचा कमी-जास्त उपयोग करून घेणें साधेंते. पण सर्वांनाच तें जमतें असें नाहीं. सर्वांना मात्र एक किंवा दोन साधनांचा उपयोग सहज सुलभतेने करून घेतां येतो. आपल्याला जितक्या जास्त साधनांचा कौशल्यानें उपयोग करून घेतां येईल तितकें जनतेच्या चारित्र्याचें, स्वभावाचें आपलें ज्ञान अधिक विश्वसनीय, परिपूर्ण, विविध, संस्कारक्षम असें होईल व तितकें इतरांशीं आपल्याला व्यापक, घनिष्ठ, भरींव असें ऐक्य साधतां येईल. ज्यांना आपले भाव स्पष्ट करतां येत नाहींत आणि ज्यांचें शालेय शिक्षण व्यापक झालेलें नाहीं त्यांचें विचारसंकेत व भाव-संकेत हे स्पर्शज्ञान, रसज्ञान, स्नायूचें चलन, यांवरच अधिष्ठित असतात. शरीर-श्रमानें स्नायू, सांधे, स्पर्शेंद्रिय यांना समान चालना मिळते. म्हणून शरीरश्रम पत्करणाऱ्यांना सहजच परस्परांचा निकट परिचय होतो, जो परिचय शरीरश्रमाच्या अभावीं होऊं शकत नाहीं.

अवजारांच्या साह्यानें माणूस वस्तूला आकार देऊं शकला. हा आकार देण्यासाठीं मनासमोर कल्पनाचित्रें उभविण्याची जी शक्ति मानवाच्या ठायीं विकास पावली तिचा उपयोग अंशतः बोलण्याच्या क्रियेचा विकास करण्याकडे झाला असावा. अवजारें आणि भाषा यांच्यायोगें माणसामाणसांत सामाजिक ऐक्य-भाव वाढला. मन आणि श्रमकौशल्य यांचा संबंध असा उत्क्रांतिसिद्ध आहे. सबब एखाद्या सामुदायिक सत्याग्रहासारख्या सर्वसमभाव साधणाऱ्या कोणत्याहि महान चळवळीचा जर आपल्याला श्रीगणेशा करावयाचा झाला तर चळवळीचें साहचर्य शारीरिक परिश्रमाशींच जोडणें समंजसपणाचें ठरणार आहे. कारण या अनुबन्धानें उद्दिष्ट चळवळीला भरभक्कम मूलाधार मिळेल.

शिवाय स्पर्शाची जाणीव जरी सूक्ष्मतया हातालाच होत असली तरी तिचा परस्परसहानुभावांशीं अत्यंत निकट संबंध असतो. * सहानुभाव स्पर्शाच्या द्वारेंच प्रगट होतो. जिच्याविषयीं आपल्या मनांत सौहार्द वसत असतें अशा व्यक्तिबद्दल किंवा ज्या विषयीं अनुकंपा वाटते अशा माणसाबद्दल आपली संवेदना प्रगट करावयाची झाल्यास आपण अगदीं सहजतेनें स्पर्शाचा अवलंब करतों; अशी वस्तुस्थिति असल्यामुळें मानवैक्याची प्रतिष्ठापना करण्यासाठीं जी चळवळ आपण करूं तिचें प्रगटीकरण बऱ्याच अंशीं स्पर्शाच्याच द्वारें व्हावें लागेल, म्हणजे त्या चळवळींत हाताचा हिस्सा जास्त असेल.

अवजारांचा उपयोग करूं लागल्यापासूनच माणसाला आपल्या कामांत भरींवपणा व सार्थकता आणतां आली यांत संदेह नाहीं. सामूहिक काम करतांना त्याला सहकार्याची गरज भासली व त्या गरजेनें समाज निर्माण केला. अर्थात् असल्या सहकारामुळें कामकरी एक दुसऱ्याच्या चळवळी जाणून घेण्याचा प्रयत्न करतील हें ओघानेंच आलें. एकाच उद्देशासाठीं खपणाऱ्या समाजाचा एक घटक या नात्यानें ते एक दुसऱ्याची कदर जरूर करतील, कार्याचें मोल ओळखतील. अशा समाजांत शेतकऱ्यांचा तसेंच शहरांत काम करणाऱ्या श्रमजीवी लोकांचाहि समावेश असणार त्यामुळें खेड्यांतील व शहरांतील कामगारांत सहभाव वाढेल.

आपल्याला आपलें काम जनतेसाठीं व जनतेला घेऊनच करावयास हवें. केवळ पैसे पुरवून हें काम थोडेंच पुरें होणार आहे! शरीरश्रमांनीं जें साधतें तें द्रव्यानें मुळींच साधत नाहीं. मजूर, बेकार, मध्यमवर्गीय, बुद्धिजीवि, श्रीमंत इत्यादि समाजांतील सर्व [illegible] च्य लोकांना एकाच प्रकारच्या शरीरश्रमात्मक कार्यांत जर सहभागी होतां आलें तर सहानुभावाचा प्रत्यय तर येईलच पण त्या शिवाय तें कार्य 'सहवीर्यं करवावहै' सारख्या लोकसत्तेचें एक प्रतीक होऊन बसेल आणि वर्गावर्गांत ज्या सध्यां चरा पडलेल्या आहेत त्या सांधायलाहि मदत होईल.

---

★ पहा, Nathaniel Shaler, "The Neighbour" Boston, Houghton, Miffin 1904.

"The Individual" New York, D. Appleton & Co., 1900 ch. VI.

R. B Gregg "Training for Peace" Philadelphia J. B. Lippincott Co., 1937.

जनता आणि नेता यांच्यांत जास्त सहभाव वाढेल. हें करणें प्रत्येकाच्या हातचें आहे. प्रत्येकाला तें जमूं शकतें, आणि म्हणूनच भिन्नभिन्न लोकच काय पण जमात आणि राष्ट्रहि त्यायोगें संघटित होऊं शकतें.

ऐक्यभावाचें पोषण व्हावें म्हणून आणखीहि एक उपाय करतां येईल. पांच पासून बारापर्यंत माणसांच्या छोट्या तुकड्या कराव्यात आणि रोज त्या माणसांनीं उत्पादक शरीरश्रम करावे. हातानें काम चाललें असतांनाच अहिंसक कार्यक्रमाची चर्चा करतां येते व सहभावाला त्यायोगें मदत होते. *

हें लिहितांना मी असें मात्र सुचवूं इच्छित नाहीं कीं अशा कामासाठीं स्वावलंबी आश्रम किंवा संघ बनवावे आणि त्यांनीं स्वतंत्र रीतीनें आपली वसाहत करून जिवनाचा एक वेगळाच अहिंसक नमुना घडवावा. कांहीं थोड्या लोकांना तसें करणें कदाचित् श्रेयस्करहि ठरेल आणि अशांच्या मार्गांत मोडता घालायचा माझा उद्देश पण नाहीं. तथापि येवढें मात्र नक्की कीं हा रस्ता वाटतो तितका सुगम नाहीं. सर्वस्व पणास लावणें हें फार थोड्यांना साधतें. असेच लोक गेले तर या मार्गें जाऊं शकतील. शिवाय त्यांचें जाणें कितपत हिताचें ठरेल याचाहि संशय आहे. कारण असें, कीं पूर्णपणें स्वावलंबी अशी वसाहत स्थापण्याला निरनिराळ्या पेशांत कुशल असलेलीं तेवीस कुटुंबें हवींत आणि शंभराच्यावर माणसें पोसूं शकेल इतकी शेतजमीन हवी. हें जमिनीचें त्रांगडें सोपें नाहीं. चांगलें खर्चाचें आहे. दुसरें असल्या पद्धतीनें रहावयाचें म्हणजे आपण आपल्या दैनंदिन जीवनांतून निघून एका वेगळ्याच जीवनांत प्रवेश करणें होय. तसें झाले म्हणजे आपल्या रोजच्या संवयींपैकीं बऱ्याचशा संवयी आपल्याला एकदम बदलाव्या लागतील. तसें करणें अगत्य असलें तरी अतिकठिण आहे. या सर्व कारणांमुळें अहिंसेवर विश्वास असणाऱ्या मंडळींनी सामान्य जनतेंतच राहून अहिंसेसाठीं वातावरण तयार करणें

---

* मोठमोठ्या उद्योगकेंद्रांतूनहि छोट्या छोट्या तुकड्या करून काम चालूं असतांना संभाषणाला प्रोत्साहन दिल्यास व्यक्तिगत, औद्योगिक, तसेंच नागरिक दृष्ट्याहि किती फायदे होतात याचें मनोरंजक स्पष्टीकरण व पुरावा हवा असल्यासः- T. N. Whitehead "Leadership in a free Society," Elton Mayo "The Human Problem of an Industrial Civilization" New York, Macmillan 1933. पहा.

श्रेयस् व्हावयाचें आहे. येवढ्याशा विरजणानें कितीतरी दूध विरजतें. अहिंसक मंडळींना हेंच विरजणाचें काम जनसमुदायांत राहून करतां येईल. व्यक्तिश: व सांघिक रीतीनें केलेल्या परिश्रमांनीं त्यांच्या या प्रयत्नांना अधिक जोम, सुसूत्रता, आणि सार्थकता येईल. ही सार्थकता अंशत: ‘ अर्थेनसह ’ देखील असेल. या कार्याच्या अंगीकारानें समाजावर जो परिणाम होईल व जें कार्य साधेल तें स्वतंत्र आश्रमनिष्ठ वसाहती स्थापन करून मिळालेल्या यशापेक्षां जास्तच राहील असें मला वाटतें. कसेंहि असो. दोन्ही मार्ग उपयोगी आहेत हें खरें !

वर वर्णन केलेल्या नैतिक घटकांची वाढ झाल्यावर सांघिक श्रम करीत असतांना सुखाचा आणि मन:पूर्वक समाधानाचा प्रत्यय येईल हें सांगायलाच हवें असें नाहीं. असलें स्वत: निवडलेलें काम स्वत:ची किंमत पटवून देतें. इतकें समाधान मिळवून देणाऱ्या त्या कामाबद्दल व ज्या संघाचा एक घटक होऊन तें काम केलें जातें त्या संघाबद्दल आपल्या मनांत प्रामाणिकतेची, इमानदारपणाची वृत्ति वाढते. हें समाधान लाभत गेलें आणि रोजरोजच्या कामानें असल्या संवयी अंगीं उतरत गेल्या तर कार्यस्थिरता येते. व्यक्तीची आणि संघाची आण व बाण वाढते. चिरस्थायी प्रतिष्ठा व चारित्र्य वाढतें !

उत्पादक शरीरश्रमाच्या द्वारा ज्या वस्तु निर्माण होतात त्याच्यामुळें वरील गुण एकप्रकारें साकार, सगुण रूप घेतात. पुनरावृत्तीनें त्या गुणाचें सम्यक् दर्शन होतें. जसजसा या निर्मिलेल्या वस्तूंचा उपयोग वाढेल व त्यांचा जसजसा प्रचार होईल तसतसा सम्यक्‌दर्शनाचा हा उमाळा जोराचा, परिणामकारक, उत्साहवर्धक असा असेल.

## सामूहिक कष्टसहिष्णुता, सहकार व सुव्यवस्था यांचें महत्व.

ज्यांच्याशीं मिळून मिसळून आपण हे शरीरश्रम करतों त्यांच्या उपयोगी पडण्याची, त्यांच्या हालअपेष्टांत सहभागी होण्याची आपल्या मनाला शिकवण मिळते. यालाच आपण सामूहिक कष्टसहिष्णुता असें नांव दिलें आहे.

सांघिक काम करण्यानें त्या कार्याच्या दृश्यादृश्य आविष्काराची जी प्रचीति येते ती आपल्यामध्यें सुव्यवस्थेची, आटोपाची जाणीव निर्माण करते आणि समान कार्यांत, उद्देशांत सहकार करण्याची भावना प्रेरित करते. सहकार्यानें

परस्परविश्वास आणि भरंवसा वाढतो. सहोद्देशानें सहकार्य करीत असतां आपण एकमेकांवर कसें अवलंबून आहोंत हें मनावर बिंबतें आणि त्यायोगें परस्पर-विश्वासाची भावना जोरानें फोंफावते. आपण कुणाच्या तरी उपयोगी पडत आहोंत, चैतन्यशील परिणामकारक व महत्वाची अशी एक सुव्यवस्था निर्माण करण्यांत आपलाहि हात आहे या सततच्या लागणीनें एकप्रकारचें निस्सीम समाधान मनांत सतत खेळत राहतेंसें वाटतें. आनंदलहरींनीं आपलें मन पुलकित होतें. सर्वत्र सुख शांति असावी, सर्व गोष्टी आदर्शरीतीने घडाव्यात, सर्वांशीं मित्र-भाव वाढावा, लोकांवर आपला हक्क असावा व आपण देखील लोकांच्या उपयोगी पडावें असल्या शुभ, सखोल, आणि जोमदार आकांक्षा आपणापैकीं प्रत्येकाच्या मनांत असतात. या आकांक्षांना सगुणरूप यावें म्हणून मानवजात सततची झटते. पुष्कळांना सैनिक होण्यांत, नाविक होण्यांत किंवा रेल्वेची नोकरी करण्यांत जें जबर आकर्षण वाटतें त्याचें कारण झालें तरी वरील आकांक्षा हेंच होय. प्रत्येक माणसाच्या मनांत सुव्यवस्थेची जी सहजवृत्ति असते तीच समाजधारणेला कारण आहे. समाजवृत्तीचें मोठें बल तेंच! या कारणानें, एक परिणामकारक समाज-व्यवस्था आपल्याला निर्माण करावयाची आहे, तसें करण्याकरितां आपल्याला सेवा करावयाची आहे, आपण सेवा करूं, खूप सेवा करूं अशी जी एक जबरदस्त जाणीव शरीरश्रमाच्या द्वारें एका भरींव सन्निधानाचा घटक म्हणून निर्माण होते तिचें राष्ट्राच्या भावी स्वातंत्र्याच्या दृष्टीने फार मोल आहे.

## समाजरक्षण.

हाताने तयार केलेल्या वस्तूंची निर्मिती आणि त्यांचा वापर यांचा संबंध जमातीवर सर्वंकष परिणाम होतो. विशेषतः शेतकऱ्यांच्या जीवनावर, शहरांतील बेकारांवर, आणि मध्यमवर्गीय जनतेवर असा परिणाम किती होतो याची कल्पना जे असल्या उत्पादनांत सहभागीं होतील त्यांना येईल व त्यांची खात्रीहि पटेल. पहिलाच परिणाम तर असा होईल कीं गरीब व सुखवस्तु, बेकार व कामकार, शहरी व गांवकरी, बहुजनसमाज व बुद्धिजीवि लोक तसेंच निरनिराळ्या जमाती यांच्यात सध्या ज्या राजकीय व सामाजिक खाड्या निर्माण झाल्या आहेत त्या जीवनाने भरतील. श्रमजीवि लोकांत अशी भावना पसरेल कीं आपण समाजाची

संपत्ति निर्माण करणारे आहोंत, नवीन समाजरचना घडविण्यांत आपला सहभाग असल्यामुळें आपल्याच भाईबंधांच्या पुनरुत्थानास कारण होणार आहोंत, येवढेंच काय पण आगामी कालांत आपलें म्हणून मानलेल्यांच्या मनोरथांना अवसर देणारें जें राष्ट्रमंदिर तयार होईल त्याची वीट न् वीट आपल्याकडून उभविली जाणार आहे व त्या मंदिराचे संरक्षकहि आपणच आहोंत! छोट्या छोट्या प्रयत्नांचा आणि वस्तूंच्या उत्पादनांचा जो सामयिक परिणाम होतो त्याला नदीची उपमा शोभेल. थेंबाथेंबांनी धारा बनतात, आकाशांतून सरीवर सरी कोसळतात व नदीचें पाणी वाढूं लागतें. मानवी जीवनांतीलच दाखला घ्यायचा झाला तर रयत पैसा पैसा करून कराच्या रूपानें मध्यवर्ति तिजोरींत भरते व त्यावर सर्व राष्ट्राचे नियंत्रक व्यवहार चालतात.

## कामाचा उत्साह–जोम.

शरीरश्रम आणि तद्द्वारा मिळालेले अनुभव यांनी व्यक्तिगत आणि सार्वजनिक काम करण्याला कसा हुरूप वाढूं शकतो याची आतां आपल्याला कल्पना करतां येते. माणुस आशेनें सर्व कांहीं करतो. त्याचें अवघें जीवनच आशेवर उभविलें असतें. आशेच्या मानससरोवरांतून उत्साहाच्या सिंधुगंगा निघणारच! या आशेच्या जोडीला परस्परश्रद्धा, संख्याबलानें येणारा जोम, स्नेहांत रूपांतरित होणारा परस्पर सद्भाव हे जर मिळाले तर अधिकस्य अधिकं फलम्! एका नव्या संन्निधानांत आपण स्वेच्छेने भागीदारी केली आहे या जाणीवेचें वर जें विवेचन केलें आहे त्यांतूनहि आपल्याला कार्यस्फूर्ति मिळते व जोम वाढतो. तो टिकतोहि. सर्व मंडळी मिळून काम करतात ही बाबहि कमी उत्साहप्रद नाहीं. प्रत्येक व्यक्तीचें स्थान स्वतंत्र असून तिचे समाजाच्या बाबतींत निश्चित असें महत्वाचें कर्तव्य आहे ही भावना एकदा नीट बाणली गेली तर फार व्यापक अशा आनंदाचा आणि समाधानाचा वाढता प्रत्यय येत जातो. त्यायोगे जनतेंत कितीतरी उत्साह खेळत रहातो.

प्राणिशास्त्राने जे नवेनवे शोध लावले त्यांत असें आढळून आलें कीं सर्व जीवजंतूंत (अत्यंत साधी जीवन-प्रक्रिया असणाऱ्या बिनाहाडाच्या, पेशीरहित जीवांपासुन तो तहत गुंतागुंतीचें जीवन असणाऱ्या मानवापर्यंत) जीवनकलहांत

तग धरण्याची जी शक्ति असते तिचा प्रकर्ष अनेकांच्या एकत्र संघशक्तींत जितक्या पटीने प्रत्ययास येतो तितका तो प्रत्येकाच्या विभिन्न स्फुटशक्तींत येत नाहीं. * उदाहरणच घ्यायचें तर जीवाणूंचें घेतां येईल. प्रतिकूल परिस्थितींत टिकाव धरण्याची शक्ति एका जीवांत जितकी असेल त्याच्या दोनशें पटीने जास्त शक्ति तीस जीवाणू एकत्र असले तर आढळेल !

शरीरश्रम करून वस्तु निर्माण करणारे व त्या वस्तु वापरणारे आपापल्या ठिकाणीं एक एकटे राहून जी शक्ति आणि प्रतिष्ठा मिळवूं शकतील त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त संघशक्ति व प्रतिष्ठा जर उत्पादक आणि वापरणारे एकत्र झाले तर निर्माण होणार आहे. संख्येत जसजशीं वाढ होईल तसतसें या शक्तीचें आणि गतीचें प्रमाण वाढेल. ती वाढ एक दोन तीन अशी अंकगणिताच्या प्रमाणाने न होतां, दोन चार आठ अशा भूमितीच्या प्रमाणाने होईल, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. [ एक माणूस जर दोन शेर अन्न खातो तर पंधरा माणसें तीस शेर अन्न खातील हें झालें गणिताचें प्रमाण. एक माणूस जर दोन मण वजन उचलतो तर पंधरा माणसें १५×२=३० शेर वजन उचलतील असें गणिताने म्हणतां येईल. तें तसें नसतें. पण तीं माणसें भूमितीच्या प्रमाणाने म्हणजे १५×३०=४५० शेर वजन उचलतील. गणिताच्या आणि भूमितीच्या प्रमाणांत हा फरक आहे.—अनु. ]

## साहस.

आतां आपल्याला असें सिद्ध करावयाचें आहे कीं श्रमिक समूहाचा घटक म्हणून शरीरश्रम करीत राहिल्यानें धृति बांधली जाते. सकृद्दर्शनीं हें विधान कदाचित् हास्यास्पद वाटेल. शरीर-श्रमासारख्या साध्या आणि निरुपद्रवी चळवळीने धैर्य तें कसें वाढणार ?

धैर्य हा अविभाज्य स्वरूपाचा गुण नाहीं. त्याचे पुष्कळ पैलू आहेत. संमिश्र घटकांचा तो एक प्रभावी समवाय आहे. अनेक पैलूंपैकी धृतीचा एक पैलू असा कीं आत्मेतर कोणत्या तरी वस्तूशीं संपूर्ण तन्मयता पावल्यानें धैर्याचा परिपोष होतो. याचें उदाहरण म्हणून मांजर आणि तिचीं पिलें यांचें देतां येईल. आपल्या

* पहा—W. C. Allee, "The Social life of Animals" New York, W. Norton Co., 1939

पिलांचें रक्षण करण्यासाठीं मांजर आपल्यापेक्षां कितीतरी पटीनें मोठ्या असलेल्या कुत्र्यावर तुटून पडते. त्याला पळवून लावते. अपत्यप्रेमामुळें तिला आपला व आपल्या प्राणाच्या भीतीचा विसर पडतो. असली तन्मयता व निष्ठा विकसित होण्यास जें आकर्षण आणि प्रेरणा लागते ती शरीरश्रमानें देखील लाभूं शकते.

धैर्याचा दुसरा पैलू असा कीं आपण सर्व एक आहोंत, आपल्या बरोबर आपले सहकारी असून सर्वसाधारण परिश्रमांत त्यांची आपल्याला मदत आहे, याची जाणीव मनांत वसत असली म्हणजे मोठा धिंवसा वाटतो. जितके सहकारी जास्त तितकीच हिंमत, दिलासाहि जास्त वाटतो. इतर परिस्थिति मात्र अनुकूल हवी. श्रमिकांचें जर एक व्यापक संघटन तयार झालें तर त्यांत समाविष्ट होणाऱ्या प्रत्येकाला मोठा धीर वाटणें स्वाभाविक आहे. राष्ट्रांतील बहुसंख्य जनतेने जर शरीर-श्रम पत्करले, निष्ठेनें अनुष्ठिले, तर केवढा मोठा ऐक्यभाव निर्माण होईल !

कामाचा जोम असला म्हणजेहि धैर्य वाढतें. हातकामाच्या योजनेप्रमाणें श्रम करीत राहिल्यानें शारीरिक व मानसिक जोम वाढतो व तेवढ्या प्रमाणांत धैर्य देखील वाढतें.

सुरक्षिततेची आशा, व जाणीव, प्रगतिपर जीवनादर्शाशीं कायावाचामनें-करून झालेलें सामरस्य, या सर्व गोष्टी धैर्य वाढविणाऱ्या आहेत. शरीरश्रमानें त्या प्राप्त होतात व म्हणून धैर्य गुणाचाहि त्यायोगें परिपोष होतो.

शरीरश्रम करतांना मन शांत ठेवावें लागतें, सतत तेंच काम करीत राहिल्यानें स्थिरता वाढते, अनुभव येतो आणि या दोन्ही गोष्टी योग्यवेळीं उपयोगी पडतात. हे धैर्याचेच घटक होत. कारण यांत मनःशांति ठेवण्याचा अभ्यास जडतो. शिवाय आपण बाह्य शक्तींवर नियंत्रण करूं शकतों ही जाणीव ज्यायोगें आपल्यांत येईल ती गोष्ट धैर्यगुणाला पोषक ठरेल. उदाहरणार्थ, आपल्या अंगीं वैद्यकीय कौशल्य असेल तर साथीच्या रोगांतहि आपण घाबरत नाहीं. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तींत उद्योगनैपुण्य असलें तर व्यक्ति किंवा राष्ट्र यांच्यावर कोसळलेल्या आर्थिक विपत्तींचें संकट जाणवत नाहीं. आपण ज्यासंबंधीं विवेचन करीत आहोंत अशा हस्तव्यव-सायाचा राष्ट्रभर जर व्याप वाढला तर बेकारी, दैन्य, फूट, औदासिन्य, निराशा यासारख्या गंभीर स्वरूपाच्या सामाजिक आणि राजकीय विपत्तींचें निवारण करण्यासाठीं त्याचा उपयोग होईल.

हस्तव्यवसाय व तज्जन्य वस्तूंचा उपयोग या दोन गोष्टींमुळें साधें राहणें अंगवळणीं पडतें. त्यामुळें आपल्या मागचा व्याप कमी होतो. व्याप नसला म्हणजे आर्थिक विवंचना रहात नाहीं. आज ज्या काही विवंचना आपल्या मागें लागल्या आहेत त्यांत आर्थिकच जास्त आहेत. या पैशांच्या काकऱ्या ज्या गोष्टीनें कमी होतील व आपल्यांत आर्थिक स्वाश्रय वाढेल ती गोष्ट आपलें धैर्य वाढवीलच.

आणखी, हाताने वस्तु बनवितांना आणि तिचा उपयोग करतांना आपल्या विचारांत व कृतींत ज्या मानाने सुसंगति येते त्या मानानें आपल्या कामना व अंतरीचे संघर्ष कमी होऊन चित्ताचें समत्व वाढतें व म्हणून धिवसाहि येतो. शारीरिक साहसापेक्षां मनोधैर्याच्या बाबतींत तर हें विशेषच लागू पडतें. असल्या मनोधैर्याची पुढाऱ्यांना फार गरज आहे, सबब त्यांच्या बाबतींत तर हातकाम जास्तच अगत्य आहे.

एकादें काम निस्सीम मनोभावाने करीत असतांना त्यांत जी आस्था व जें प्रेम आपण ओततों त्यामुळेंहि धैर्याचा परिपोष होतो. प्रेम, मग तें कोणत्याहि स्वरूपांत असो, आपल्या मनांत धैर्य निर्माण करतें. खरें पाहूं जातां भीतीचा विरुद्ध गुण धैर्य हा नसून प्रेम हा आहे. अभयांत प्रेम आणि ऐक्य दोन्हीहि असतात. हा समोर उभा आहे तो आपला प्रतिपक्षी आहे व तो ज्या भूमिकेवर असेल त्याच नैतिक भूमिकेवरून आपल्याला त्याच्याशीं सामना करावयाचा आहे इतपतच काय तो विचार धैर्यवान माणूस करतो. पण प्रेमाचें तसें नाहीं. प्रेमाला उभयपक्षांत एकताच दिसते. प्रेमाची भूमिका उच्च असते. परभाव, शत्रुभाव तिथवर पोचतच नाहींत. म्हणून ज्यायोगें प्रेम किंवा प्रेमाचा व्यवहारबंधु परस्पर-सद्भाव वाढीला लागेल ती गोष्ट धैर्याला पोषक होईलच !

परस्परसद्भावाच्या या विकासाला आर्थिक परिभाषेंत उद्योगाचें मूलधन म्हणतां येईल. ज्या राष्ट्राने हा गुण वाढविला नाहीं त्याला या मूलधनावर व्यापार करतां येत नाहीं. याच्या उलट ज्या राष्ट्राने हा पारस्परिक सद्भाव भक्कम पायावर उभारलेला आहे तें राष्ट्र राजकीय, सामाजिक व आर्थिक बाबतींत साहस* करूं शकतें. अशा राष्ट्राला नैतिक उदारताच काय पण राजकीय आणि आर्थिक उदारता दाखविणेंहि जड जात नाहीं.

---

* 'साहसे श्रीः प्रतिवसति' या उक्तीकडे लक्ष देऊन साहस हा शब्द आर्थिक परिभाषेंत वापरला आहे.—अनु.

## बुद्धीची स्थिरता व समत्व.

शरीरश्रम करीत असतांना न कंटाळतां एकसारखें काम करीत राहण्याचा जो सराव आपल्याला होतो त्याचीहि धैर्य वाढविणाऱ्या आणखी एका घटकांत गणना करतां येते. शरीरश्रमाचा अनुभव असणाऱ्यांना ह्या गोष्टीचा प्रत्यय आलेला आहे. आपले विचार व भावना यांच्या अंतःसमन्वयावर व सर्वव्यापी ऐक्याच्या प्रयत्नावर बुद्धीचें समत्व आणि मनोबल अवलंबून आहेत. हा अंतःसमन्वयाचा विषय सत्याग्रही शिस्तीच्या अन्यतर अवस्थेंत येत असला तरी मनाचा समतोल-पणा व चरित्रबल हें कांहीसें माणसाच्या कार्यशक्तीच्या केंद्रीकरणावर, तिच्या योग्य उपयोगावर आणि दिग्दर्शनावर अवलंबून आहे.

प्रत्येक व्यक्ति म्हणजे कार्यशक्तींचें केंद्र आहे. ती शक्ति शारीरिक, बौद्धिक, नैतिक, आध्यात्मिक, मानासिक अशा अनेक द्वारांनीं प्रकट होते. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यांत अनेकदां चुथड्याचे, चवाचिंधीचे, अपमानित जीवन जगण्याचे, आत्मनिर्भत्सनेचे प्रसंग येऊन जातात. ते कां येतात? एक तर असें कीं आपल्या आकांक्षा, आशा, योजना, अर्धवट सिद्धीस गेलेल्या कृति यांच्यामागें असलेल्या कार्यशक्तींचा कोंडमारा झालेला असतो. अशी कुचंबणा झाली कीं त्याची प्रतिक्रिया होते. उबग वाढतो. असेंच चालत राहिलें तर उबगाचें पर्यवसान कडवटपणांत, विद्वेषांत होतें. ही उबगाची लाट कधीं कधीं सहजपणेंच निराळ्या वृत्तींतून प्रकट होते. एकाद्या घड्याळाचा लांब स्प्रिंग जसा वेटोळ्यांनीं लहानशा यंत्रांत जखडलेला असतो तशा या क्रोधाच्या ऊर्मि आपल्या अंतरांत दबलेल्या असतात. बाळपणीं आणि मोठेपणींहि जे कांहीं अन्यमनस्कतेचे किंवा भर्त्सनेचे प्रसंग आपल्यावर बेतले ते आपण विसरून जातों पण त्या क्रोधाच्यामुळें उत्पन्न झालेल्या कार्यशक्तीच्या ऊर्मि मनाच्या बाटलींत बंद केलेल्या असतात. कधीं एकादें लहानसेंच निमित्त होतें, बंदुकीच्या चापावर हात पडतो आणि एकदम धडाडधूम होऊन त्या तुंबलेल्या क्रोधोर्मि बाहेर पडतात. त्या कधीं व केव्हां बाहेर पडतील याचा नेम नसतो. ★

★ E. M. F. Durbin and J. Bowlby. "Personal Aggressiveness and War," London, Kegan Paul. New York, Columbia University Press, 1939.

मनांत दबलेल्या या ऊर्मींना लढाईमध्यें पैस मिळतो. त्यांचा उपशम झाल्यानें मन हलकें होऊन समाधान वाटतें, पुष्कळ लोकांना लढाई कां बरी वाटते याचें कांहींसें हेंहि कारण असूं शकेल. आपण असें पाहतों कीं सतत दबविलेले, राबविलेले लोक युद्धाच्या वेळीं फार क्रूरपणें वागतात. ज्यांचीं समाजबंधनें फार कडक आणि जाचक असतात असे लोक देखील फार निर्घृण होतात. ही क्रूरता आणि तुरळक होणारे आपसांतील दंगे, संघर्ष यांचें मूळहि कांहींसें वरील प्रक्रियेंत सांपडतें. *

सामुहिक, विधायक व शांततामय अशा वाटेनें बाहेर पडावयास या ऊर्मींना जितका अवसर मिळेल तितका त्यांच्या उद्रेकाला आळा बसेल. कधीं कधीं आपल्या मनांत नव्यानेंच एकादा विचका उत्पन्न होतो. तथापि असल्या प्रसंगविशेषीं येणाऱ्या क्रोधाला आटोक्यांत ठेवण्यापुरता संयम आपल्यामध्यें सामान्यतः असतोच. परंतु ज्या क्रोधाच्या गांठी फार दिवसांपासुन आपल्या अंतर्मनांत घर करून बसलेल्या असतात त्यांच्यावर ताबा ठेवणें, त्यांच्या उद्रेकाला आळा घालणें आपल्याला फार जड जातें. त्यासंबंधीं खबरदार राहून काळजी घेणेंहि कठीण. कारण त्यांची आपल्याला जागती जाणीव मुळींच नसते. अशा या ऊर्मींना बाहेर वाट द्यावयाला विधायक योजनेची गरज आहे व ती विचारपूर्वक आंखलेली योजना शिस्तीचा एक भाग म्हणुन समजणें अवश्य आहे. या क्रोधाच्या गांठी मनांतुन निघाल्यावर क्रियाशक्तीला मनाचें व बुद्धीचें समत्व वाढवावयाला अवसर मिळेल. कार्यशक्तींचा कोंडमारा करणारीं सामाजिक, आर्थिक, राजकीय कारणें उद्भवतात त्यांचें निराकरण होण्यास जी योजना केली जाते तिचें स्वरूप आणि आपण सुचविलेल्या शरीरश्रमाचें व त्याच्या संयोजनाचें स्वरूप सारखेंच असतें. मन आणि हात, शारीरिक कृति आणि भावना यांचा संबंध घनिष्ठ आणि उत्क्रांतिसिद्ध आहे. या संबंधाला शरीरश्रमाची जोड मिळाली कीं वर वर्णन केलेली क्रोधोर्मींना अवसर देण्याची—उन्नयनाची—क्रिया जास्त सफल आणि परिणामकारक होते.

शिपायांत भ्याडपणा असणें आणि सत्याग्रहीमध्यें क्रोध असणें हें परिणामाच्या दृष्टीनें सारखेंच असतें. शिपाई भितो व पळतो. त्यामुळें लष्करी शिस्त

* Edgar Snow, "The Battle for Asia" New York, Random House, 1941.

मोडली जाते. सत्याग्रही रागावतो आणि हिंसा करतो. त्यामुळें अहिंसक शिरत मोडली जाते. सबब ज्या गोष्टींमुळें रागाची सामान्य प्रवृत्ति कमी होत जाईल ती गोष्ट सत्याग्रहाचा लढा सफल करावयाला मदत करील.

१९१४–१८ च्या महायुद्धानंतर पुष्कळ ब्रिटिश सोजीर रिकामे झाले. त्यांना काम मिळेना. फलतः त्यांच्या मनांत सर्वच आधुनिक संस्कृतीविषयीं व राज्यशासकांविषयीं विद्वेष उत्पन्न झाला. अखेर त्यांना पोटापुरता धंदा मिळावा या उद्देशानें ज्या योजना आंखल्या गेल्या त्यान्वयें अशा असंतुष्ट लोकांपैकीं कांहींना शेती व जनावरांसाठीं थोडीशी जमीन देण्यांत आली. ते लोक अंगमेहनत करूं लागले. मोकळ्या हवेंत खणणें उपसणें, करावें लागल्यामुळें परिणाम असा झाला कीं आपण स्वतः कांहीं तरी करूं शकतों व अंशतः स्वावलंबी होऊं शकतों ही जाणीव त्यांच्यांत उत्पन्न झाली. हलके हलके त्यांच्या मनांतील विद्वेषाच्या, क्रोधाच्या गांठी सैल झाल्या. दाह शांत झाला. मनांतील पराभूत, अपमानाची भावना मंदावली. आत्मसंमान वाढला. न्यूनगंडाची भावना निमाली, व त्यांच्या मनाला पुनः एकदा गेलेली शांति लाभली. ज्या ज्यू लोकांना जुलूम जबरदस्तीमुळें निघून जाऊन पॅलस्टाईनचा आश्रय करावा लागला, त्यांचेंहि असेंच झालें. त्यांना देखील असेंच शेतीवर खपावें लागत होतें.

मन निवळण्याचा वर जो उपाय सांगितला आहे तो विधायक शरीरश्रमाच्या बाबतींत लागूं पडतो. साध्या साध्या अवजारांचा उपयोग करून शरीरश्रम केल्यानें माणसाच्या स्वभावावर व कार्यशक्तींवर अत्यंत नाजुक व अदृश्य असा परिणाम कसा होतो हें पूर्वीं सांगितलेंच आहे. आतां सांगावयाचें तें हें कीं एकाद्या शरीर-श्रमाच्या योजनेंत जर मनःपूर्वक भाग घेतला गेला तर मनाचें व बुद्धीचें समत्व वाढविण्याकडे त्याचा फार उपयोग होईल. हेंच काय पण एकादी सुधारणा करण्या-साठीं किंवा बंधविमोचनासाठीं जर वेळप्रसंगीं लढा लढावा लागला तर त्यांत संपूर्ण अहिंसा टिकविणेंहि बऱ्याच अंशीं शक्य होईल.

## शस्त्रतुल्य अहिंसक नैतिक साधनांचा सराव.

लष्करी शिक्षणाच्या कार्यक्रमांत होईल तेवढें प्रत्यक्ष लढाईसारखेंच वातावरण तयार केलें जातें व त्या वातावरणांत शस्त्रांचा सराव व संवय कशी वाढवावी

याचें शिक्षण दिलें जातें. अहिंसेच्या शरीर-श्रमात्मक शिस्तीलाहि कांहीं अंशीं हेंच लागू आहे. हिंसक आणि अहिंसक यांच्यांत किंवा हिंसक व हिंसक यांच्यांत लढा सुरू झाला असतां लढाईचा मुख्य उद्देश प्रतिपक्षाच्या आशा, आकांक्षा व जीवितमूल्यें बदलविण्याचा असतो. हेतू हा कीं उभयपक्षांत पूर्वीपेक्षा जास्त टिकाऊ व चांगला असा संबंध घटावा. अशा प्रसंगीं अहिंसक पक्षाचें आद्य कर्तव्य हें कीं त्यानें प्रतिपक्षाच्या मनांत आपल्यासंबंधीं आदर उत्पन्न केला पाहिजे. हा आदर आपल्यांतील एकजूट, खेळमेळ, निश्चयदृढता, शौर्य, सहनशीलता, इत्यादि गुणांमुळें निर्माण होतो. या आदरभावाबरोबरच विश्वास आणि अनुकूल भावहि त्यानें निर्माण केले पाहिजेत. आपण जे उपाय सुचवूं ते अव्यवहार्य नाहींत येवढेंच काय पण त्यांची अंमलबजावणी करून दाखविण्याची धमकहि आपल्यांत आहे अशी प्रतिपक्षियांची खात्री करून द्यायला हवी. आपल्या शक्तीचा, आपल्या सूचनांच्या व्यवहार्यतेचा, आपल्या चिकाटीचा प्रत्यय त्यांना आपल्या उद्योग-धंद्यांतून, आपल्या आर्थिक व राजकीय क्षेत्रांतून, आपल्या चारित्र्यांतून मिळाला पाहिजे. समाजव्यापक किंवा राष्ट्रव्यापक हातकामाची योजना प्रत्यक्ष अंमलांत आणून दाखविल्यास प्रतिपक्षाचें मन अनुकूल करणाऱ्या वरील गोष्टींपैकीं कांहींचा तरी परिपोष झालेला दाखवून देतां येईल.

या दृष्टीनें पाहिल्यास सत्याग्रहींनें हिंसक शस्त्रांऐवजीं जीं अहिंसक नैतिक साधनें वापरावयाचीं त्यापैकीं कांहींच्या अभ्यासासाठीं हातकामाची योजना उपयोगी पडण्यासारखी आहे.

लष्करी शिस्तींत आणि सत्याग्रहाच्या साधनेंत आणखी एक साम्य आहे. सैन्यांतील प्रत्येक विभागांत त्या विभागापुरतें जें कौशल्य सैनिकाला मिळवावयाचें असतें किंवा ज्या शस्त्राचा सराव करावयाचा असतो त्यांना अनुलक्षून शारीरिक वळण लावण्यासाठीं कवायदीची योजना केलेली असते. प्रत्येक विभागांतील असल्या कवायदींचें स्वरूप वेगवेगळें असतें. पायदळांना जी कवायद शिकविली जाईल ती घोडदळाच्या कामीं येणार नाहीं किंवा घोडदळाची विमानदलाच्या उपयोगी पडणार नाहीं. तथापि या खास कवायदींतदेखील एक सर्व सामान्य गोष्ट आढळते. व ती म्हणजे 'एक कतार' "आगे बढो" अशा सारखी रांगारांगानीं कूच करण्याची पद्धति. अहिंसेच्या साधकांनाहि या पद्धतीचा अवलंब करतां येईल. आवश्यक

कवायद म्हणून कांहींनीं "सेरेसॉल आंतरराष्ट्रीय सेवादल"च्या सभासदा-सारखें फावडेकाम अंगीकारावें, कांहींनीं गांवसफाई तर कांहींनीं हिंवतापनाशक सेवेचें कार्य हातीं घ्यावें. पण शक्यतोंवर सर्वांनीं असेंच कार्य पत्करावें कीं जें सर्व-सामान्य असेल. ज्या एका विशिष्ट बाबीच्या शिस्तीला आपण सराईत होऊं इच्छितों ती शिस्त आणि तज्जन्य ऐक्य हें सत्याग्रहीमध्ये सैनिकापेक्षांहि जास्त परिपूर्ण व निर्लेप असलें पाहिजे हें विसरून चालणार नाहीं. जगांतून सुसंघटित हिंसेचें उच्चाटन करण्यासाठीं जो संगर करावा लागणार आहे तो मानवजातीनें यापूर्वी कधींहि केला नाहीं इतका दुर्धर व प्रचंड व्हावयाचा आहे आणि म्हणून त्या-साठीं करावी लागणारी साधनाहि निरपवाद व निर्दोष असणें अत्यावश्यक आहे.

## सत्याग्रहीला आवश्यक असणारे आणखी कांहीं गुण.

आपल्या कार्यसाफल्यासाठीं सत्याग्रहीला स्वतःच्या ठायीं वर उल्लेखिलेले लष्करी सैनिकाचे गुणच नुसते वाढवून भागावयाचें नाहीं. सत्याग्रहाच्या लढ्यासाठीं आणखी इतर गुणांची त्याला गरज आहे. त्याच्यांत सहिष्णुता, शांतता, नम्रता, सत्यप्रियता, इ. गुणांची आणखी वाढ व्हायला हवी. माणूस स्वभावतः भला आहे, म्हणून सौजन्यक्षम आहे, ही सत्याग्रहीची निष्ठा असायला पाहिजे. आणि सर्वांत महत्वाचें म्हणजे सत्याग्रहीची अहिंसेवर अढळ श्रद्धा असली पाहिजे. तिच्या शक्तीची त्याला जाणीव हवी आणि तिच्या सामर्थ्याबद्दल मनीं तादृशहि किंतु नको.

## नम्रता आणि तितिक्षा.

नम्रतेची संवय शरीरश्रमांनीं वाढवितां येईल. खरा कामगार स्वतःला विसरून आपल्या कामांत इमानेंइतबारें राबतो. नम्रतेचें हें एक महत्वाचें लक्षण आहे. त्याचा परिणाम संसर्गानें नम्रतेच्या इतर लक्षणांवरहि होतो. हातकाम करणारे सर्व कामगार योग्यतेच्या दृष्टीनें सारखेच असतात. एकादा कामकरी दुसऱ्यापेक्षां जास्त काम करूं शकेल हें खरें पण तें कुठवर? त्याच्या एकट्याच्या शक्तीची तर त्याला मर्यादा आहे ना? सबब एकाद्याला आपल्या हुशारीचा गर्व झालाच तरी तो आटोक्याबाहेर जाईल इतका नसतो. कारण संबंध राष्ट्राच्या उत्पादनाच्या तुलनेनें एका व्यक्तीचें उत्पादन इतकें कमी असतें कीं त्यामुळें फुशार-कीला वावच मिळत नाहीं. म्हणून नैतिक दृष्टीचाच परिपोष होतो.

आतां येथें असें विचारण्यांत येईल कीं काय हो, यांत नवीन असें काय आहे ? एकादा माणूस यंत्राच्या साह्यानें जेवढी पैदास करूं शकेल तिचें प्रमाणहि राष्ट्राच्या एकंदर उत्पादनाच्या मानानें अत्यंत कमीच असेल आणि मशीन चालविणाऱ्या दोन माणसांतहि कामाच्या दृष्टीनें फार फरक राहणार नाहीं. हें खरें आहे व त्यामुळेंच हें विधान आपल्या हातकामाच्या बाबतींत केलेल्या विधानाला खोडूं शकत नाहीं. आजच्या कामगारांची वृत्ति अहिंसकच असते. प्रसंगीं त्यांनीं डोळ्यांत भरण्याजोगी अहिंसा पाळली असून नम्रताहि कशी दाखविली आहे याचें विवेचन पूर्वी येऊन गेलेंच आहे.

आधुनिक काळांत मानवजातीला अभिमानास्पद जर कांहीं वाटत असेल तर तीं यंत्रें आणि यंत्रनैपुण्य ! यांत आपण विज्ञानाचा समावेश करतां नये. कारण विज्ञानाच्या पद्धतींची माहिती फारच थोड्यांना व तीहि ज्यांनी चांगलें उच्च शिक्षण घेतलें असतें अशांनाच असते. तेच विज्ञानाचा उपयोग करूं जाणतात. आपला मतलब परिणामापुरता असतो. मशीन आणि यंत्रनैपुण्य यांची गोष्ट वेगळी आहे. आपल्यापैकीं पुष्कळांना त्याबद्दल बरीच माहिती असते आणि त्यांचा उपयोगहि आपण करूं जाणतों. या जाणीवेनें स्वतःला 'ग' ची बाधा न होऊं देणारे फार थोडे. आपण इतर वर्णियांपेक्षां श्रेष्ठ आहोंत असें जें श्वेतवर्णियांना वाटतें त्याच्या मुळांशीं पुष्कळांशीं हा यंत्रमूलक अभिमानच असतो. यंत्रें आणि यंत्रकला राबविणाऱ्या इतर वर्णियांच्या मागेंहि ही अभिमानाची रास लागते. आपल्यांत येणाऱ्या दुरभिमानाला यंत्रें कारणीभूत होत असतील तर थोड्याच प्रमाणावर कां होईना पण लहान लहान क्षेत्रांत जाणून बुजून यंत्राच्या ऐवजी आपण हातकामाला वाव दिला तर नम्रता वाढविण्याला थोडेंच कां होईना पण खरें खरें उत्तेजन मिळेल. हें यंत्रनियंत्रण यंत्रद्वेषानें प्रेरित होऊन किंवा सोंवळेपणानें न करितां, आपण स्वतःची आणि यंत्राची मर्यादा जाणतों, कुवत ओळखतों येवढ्याच भावनेनें करावयाचें ! यंत्रद्वेषाला बळी पडून तसें केलें जाऊं नये.

## सत्यप्रियता.

अवजारें व बाह्य औद्योगिक साधनें यांच्या साह्यानें सतत काम करीत असतांना माणसांत सरळ वृत्ति, वस्तुस्थितिसंबंधीं कदर, मोकळेपणा, प्रामाणिकपणा, कळकळ, निर्माण होते. हीं सर्व सत्यप्रियतेचींच अंगें आहेत. निदान अचूकपणा

हें तर सत्यप्रियतेचें अंग आहेच ! कुशलपूर्वक करावयाच्या हातकामानें डोळ्यांना आणि हातांना अचूकपणाची संवय लागते. कामाचा जसजसा सराव होत जाईल आणि केवळ बुद्धीच्या द्वारेंच नव्हे तर पंचेंद्रियें, मनोभाव, संकल्प आणि दीर्घकालीन शारीरिक सहयोगाच्या द्वारेंहि त्या कामाचें राष्ट्रीय उपयुक्ततेच्या दृष्टीनें जितकें व्यापक रहस्य मनावर ठसेल तितकें सत्याचें संगूढ, समग्र, राष्ट्रव्यापी स्वरूप, त्याचें वैशिष्ट्य, त्यांतील अडचणी, यांचा वाढता प्रत्यय येत राहील.

## मानवतेवरील श्रद्धा.

जेव्हां आपण इतरांबरोबर शरीरश्रम करतों तेव्हां इतरांचे नैतिक गुण आपल्याला कळून येतात. त्यामुळें आपण आपल्या सहकाऱ्याची दिवसेंदिवस जास्त कदर करूं लागतों. मानवी भलेपणावर आपली श्रद्धा वाढत जाते. ज्यांचा मानवाच्या भलेपणावर, संस्कारक्षमतेवर मुळींच विश्वास नसतो असे मानवद्रोही शरीरश्रम करणाऱ्यांमध्यें सहसा सांपडत नाहींत. शरीरश्रमात्मक चळवळ आपल्या हितकर परिणामांनीं मानवतेवरील श्रद्धेचें स्वरूप जास्त व्यापक, विस्तृत, सकस आणि चिरस्थायी करील.

या दृष्टीनें विचार केला तर अहिंसेचा राष्ट्रव्यापी प्रचार करायला शिस्तीचें एक अत्यंत प्रभावी साधन म्हणुन हातकामाची योजना कामीं येऊं शकते. मानव-जातीच्या इतिहासाकडे पाहिलें तर असें आढळून येतें कीं माणसाला आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीवर व भौतिक वस्तूंवर विजय मिळविण्यांतच आनंद वाटत आला आहे. जेव्हां जेव्हां त्याला तसें करावयाला अवसर मिळाला नाहीं तेव्हां तेव्हां त्याच्या ह्या प्रभावी कार्यपर, सहजवृत्ति निराळयाच मार्गानें अभिव्यक्त होऊन माणूस आपल्या बांधवांवर प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न करूं लागला. या वृत्तीचीं फळें कधीं ना कधीं सर्वदूर कडूच यावयाचीं. स्वामित्वाची इच्छा करणाऱ्या ह्या प्रभावी वृत्ति हातकामाच्या द्वारें व्यक्त झाल्या तर माणूस अधिक सहजरीतीनें म्हणजे माणुसकीनें वागूं शकतो. आणि त्याच्या इतर मानवबांधवांनाहि सामान्यतः समाधान लाभूं शकतें. अर्थात् हा एकमेव नियामक उपाय नसला तरी अनेकांपैकीं एक महत्वाचा उपाय समजावयाला हरकत नाहीं. हातकामानें कार्यशक्तीचें विवेक-पूर्वक उन्नयन करतां येतें.

शिवाय हातकामाची ही शिस्त लष्करी कवायदीसारखी स्वयंस्फूर्तीनें एकानें

काम करण्याची वृत्ति चिणून टाकीत नाहीं, किंवा तिला केंद्रीय सन्निधानाचेंहि स्वरूप येत नाहीं. व्यक्तीची व राष्ट्राची अहिंसक भूमिका तयार करायला सुयोग्य अशा शिस्तीचें तें एक साधन आहे.

अशा कामाचें जें फलित असतें त्याला केवळ अहिंसेचीच साधना न म्हणतां व्यक्ति, समाज व राष्ट्र यांचें चारित्र्य घडविण्याचें साधन म्हणून संबोधणेंच योग्य ठरेल. शिक्षणतज्ञांचें व सर्व राष्ट्रपुढाऱ्यांचें याच कारणास्तव याकडे लक्ष वेधलें गेलें पाहिजे.

## तृप्ति.

सामान्य जनता कोणतीहि नवी गोष्ट स्वीकारायला सहसा धजत नाहीं. एकादी योजना जनतेंत सर्वत्र प्रसृत व्हावी व दीर्घकालपर्यंत तिचा अंमल चालावा असें वाटत असेल तर तिच्याद्वारें खरें खरें व तेंहि तत्काल समाधान लाभलें पाहिजे. येवढेंच नव्हे तर पुढच्या फायद्यासाठींहि बुद्धीस पटेल असा अवसर त्यांत असला पाहिजे. पुष्कळांच्या बाबतींत तर या संतोषाचें स्वरूप इंद्रियगम्य व शारीरिकहि असायला हवें.

हातकामाचें साधन या अटी पूर्ण करूं शकतें. आपल्या दशेंद्रियांपैकीं × सहा इंद्रियांना हातकामानें चालना आणि सराव मिळतो. हीं सहा इंद्रियें म्हणजे दृष्टि, स्पर्श, श्रवण, ( अवजारांच्या संनादानें आणि कामासंबंधी बोलण्यानें ) तोल, स्नायूंच्या चालनेनें होणारी जाणीव, हातपाय, सांधे वगैरेंच्या हालचालींनीं होणारी जाणीव हीं होत. याचा अर्थ असा कीं हातकामानें इंद्रियांना पुरेशी संवेदना मिळते. राहिलेल्या चार इंद्रियांचीं कामेंहि चालू असतातच; तीं बंद तर नसतात.

यंत्राच्याद्वारें केलेल्या कामापेक्षा हातकामांत उपक्रम, निर्मिती, पुरेपूर सहकार, नाविन्य, स्वतंत्रता, इ. गुणांच्या विकासाला जास्त अवसर मिळतो. काम करीत

---

× आपल्याकडे साधारणत: पांच ज्ञानेंद्रियें आणि पांच कर्मेंद्रियें यांचा उल्लेख केला जातो. युरोपांतील नव्या शरीरविज्ञानाप्रमाणें जुन्या पंचज्ञानेंद्रियांशिवाय, ज्यांच्या योगें आपण आपला तोल संभाळू शकतों, सांध्यांना चालना देऊं शकतों, इ. सर्व वेगळीं इंद्रियें मानलीं गेलीं आहेत. याशिवाय स्पर्शज्ञानांत थंडी, उष्णता, दमटपणा यांचें ज्ञान वेगवेगळ्या ज्ञानतंतूंच्या द्वारें होतें. त्यामुळें त्यांना त्यांनीं तीन स्वतंत्र इंद्रियें मानलीं आहेत. ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें ते देखील मानतात. —अनुवादक.

असतांना परस्पर परिचय, दिलजमाई जास्त होऊं शकते. हातकामानें जी आत्मसंमानाची भावना निर्माण होते तिच्याद्वारें माणसाची महत्वाची आंतरिक इच्छा पूर्ण होऊन त्याला संतोष मिळतो. प्रतिष्ठेच्या बाबतींत हेंच लागू पडतें. हातकामाला प्रतिष्ठा कां असते याचीं कारणें आतां आपल्याला समजूं शकतील. पोटासाठीं हातकाम करणारे किंवा स्वेच्छेनें हातकाम पत्करणारे यांच्या प्रत्ययाला ही गोष्ट जेव्हा चांगल्या रीतीनें येईल तेव्हा समाजांत पडलेले खंदक भरून येतील. या आशेंत भाविष्यकाळीं मिळणाऱ्या तृप्तीचें बीज आहे.

ज्या मानानें हातकामाचें व्यापक रहस्य प्रगट होईल त्या मानानें त्या कामापासून बौद्धिक, मानसिक, सौंदर्यविषयक, नैतिक तृप्ति मिळत जाईल. ही तृप्ति तत्काळ मिळणारी, सखोल अशी आहे. शिवाय वेगवेगळ्या लहान लहान कामांतून जेव्हां मोठें काम साध्य होतें तेव्हां त्या कामाचें मोल व त्यामुळें मिळणाऱ्या भविष्यकालीन संतोषाची आशा दृढ होते. या मूल्याचें स्वरूप कांही अंशीं आर्थिक, अंशत: सौंदर्यविषयक, कांहीं सामाजिक तसेंच राजकीय देखील असूं शकेल.

अहिंसेच्या साधनेसाठीं हातकामाचा उपयोग करायला मानसशास्त्राच्या दृष्टीनें आणखी एक कारण असें कीं उत्तेजन आणि तत्पूर्ति, प्रेरणा आणि प्रत्यंतर यासंबंधीं मनाचा जो नियम आहे तो हातकामामध्यें पाळला जातो. थोड्या थोड्या पण योग्य उत्तेजनांनीं ( जर त्या सतत मिळत राहिल्या तर ) जीवन समृद्ध होतें. जीवनाचा असा सिद्धांतच आहे. शरीरघटकांचा विकास करण्याच्या बाबतींतच केवळ नव्हे तर मनाच्या, भावनेच्या, सौंदर्यतृप्तीच्या तसेंच नैतिक दृष्टीच्या बाबतींत देखील हा सिद्धांत लागू होतो. वर सांगितलेल्या रीतीनीं रोज हातकामाची जर संवय लावली तर वरील सिद्धांतांत अंतर्गत असलेली प्रेरणा किंवा उत्तेजना मिळून जीवन–समृद्धीवर अचूक परिणाम होतो.

थेंबा थेंबानें तळें सांचतें. सेविंग बँक किंवा करवसुलीच्या मोठमोठ्या रकमा पै पै मिळून कशा जमा होतात यांची कल्पना आजच्या युगांतील लोकाना चटकन् येऊं शकते. अनेकविध लहान लहान कृतींचा पायरीपायरीनें असाच मानसशास्त्रीय आणि नैतिक परिणाम होत राहतो.

## मनावरील ताण कमी होणें.

अहिंसक शिस्तीचें साधन म्हणून हातकामाचा पुरस्कार करीत असतांना त्यावर घेतलेल्या आक्षेपाचा उल्लेख मागे आलाच आहे. तो आक्षेप असा कीं

सत्याग्रहाला नैतिक भूमिका अत्यंत उच्च प्रकारची लागते. सामान्य बहुजनसमाजाला असलें नैतिकबल दीर्घकालपर्यंत टिकविणें अशक्य असतें. मानवसमाज नेहमीं इतक्या उच्च पातळीवर राहणें शक्य नाहीं. आतांपर्यंत केलेल्या विवेचनांत या आक्षेपाचें बरेंच निरसन केलें गेलें आहे.

दुसऱ्याहि दृष्टीनें हा प्रश्न उत्तराला घेतां येईल. हातकामाचें स्वरूप अनेक दृष्टींनीं वैशिष्ट्यपूर्ण आहे. हातकाम चटकन् मनाला आकर्षक वाटत नाहीं कारण तें रोज, सतत, चिकाटीनें करावें लागतें. असें जरी असलें तरी त्यांत एकसूत्रीपणा आणि संवादित्व असतें. त्याला धिमेपणा लागतो. त्यामुळें अडचणींतून मार्ग काढीत टिकून राहण्याची संवय जडते. त्यायोगें सांत्वना मिळते. सत्याग्रहाचा लढा उघडपणें लढत असतांना मनावर जो नैतिक व अध्यात्मिक ताण पडतो त्याचा परिहार हातकामानें पुष्कळच होतो. काम करून ज्या वस्तु निर्माण होतात त्या नित्योपयोगी असतात. कधीं कधीं सुंदरहि असतात. त्यामुळें आंतरिक मेळ आणि प्रेरणा मिळत राहते.

गरुडानें आकाशांत सुदूर उड्डाण साधल्यावर पंखांना आराम द्यावयासाठीं जमिनीवर उतरून ताजें तवानें व्हावें तसेंच सत्याग्रहीनें देखील लढून लढून आलेला मनाचा नैतिक शीण नाहींसा करण्यासाठीं कलात्मक आणि परिहारक अशा हात-कामांत मन घालावें. त्यामुळें ताण सहन करण्याची शक्ति वाढते. झीजहि भरून निघते. मनाला विसांवा मिळतो. हें व्यक्ति आणि समाज दोघांच्याहि बाबतींत सारखेंच लागू पडतें.

## साधनेसाठीं हातकामाचे प्रकार.

अहिंसक शिस्तीचें साधन म्हणुन ज्या शरीरश्रमाची योजना करावयाची त्याचें स्वरूप कसें असावें याचें उल्लेखन झालेंच आहे. त्याचा सारांश असा कीं तें काम समूहाच्या आणि विशेषतः गरीब जनतेच्या उपयोगाचें असलें पाहिजे. दुसरें, त्या कामानें त्यांना स्वावलंबन आणि प्रतिष्ठा साधतां आली पाहिजे. अशा तऱ्हेचीं हातकामें पुष्कळच आहेत. त्यापैकीं बरींच कामें खालील संस्थांनीं अंगी-कृतहि केलीं आहेत:—

१ ' अमेरिकन फ्रेंडस सर्विस कमिटी, ' या समितीनें आपल्या परिश्रमा-लयांत प्रयोग केले आहेत.

२ ' ब्रिटिश अॅण्ड अमेरिकन क्वेकर्स रिलीफ अॅंड रिकन्स्ट्रक्शन वर्क, ' या संस्थेनें गेल्या महायुद्धांत आणि युद्ध संपल्यावरहि कामें केलीं आहेत. त्या नंतर स्पेनमध्यें आणि युरोपांतील इतर भागांतहि त्यांनीं काम केलें आहे.

३ " पेरी सेरेसाल्स सर्विस इंटरनॅशनल." यांनीं आपली कक्षा खालील कामें उचलण्यापर्यंत वाढविली आहे:—( अ ) अन्नाच्या तुटवड्यामुळें नि:सत्व बनलेल्या स्त्रिया व मुलें यांना अन्न पुरविणें.( हिं )गरीबांना कपडे पुरविणें. ( से ) दवाखाने चालविणें. ( ची ) बालोद्यान आणि क्रीडांगणें यांचें संचालन. ( सा ) घरें बांधणें, सुधारणें, चुन्याची डागडुजी करणें, ( ध ) रस्ते, पाटबंधारे बांधणें. ( ना ) झाडें लावणें. ( ले ) शेतीचीं कामें करणें. ( ख ) फळफळावळ, भाज्या यांची सांठवण करण्याचे उद्योग करणें. ( क ) खेळांचीं मैदानें, पोहण्याचे तलाव बांधणें. ( रि. ) भूकंप, पूर इत्यादिकांपासुन झालेलें नुकसान, तोडफोड दुरुस्त करणें. ( बी. ) दलदलीचें पाणी काढून लावणें. (ग्रे) विहिरी खोदणें. (ग.) नळ व गटारें यासाठीं नाल्या खोदणें इ.

याशिवाय खालीं दिलेल्या कामाचाहि समावेश वरील कामांत केला आहे.

१. फर्निचर बनविणें. २. वेताचें काम. ३. कशीदा काढणें. ४. विणणें. ५. घोंगड्या तयार करणें. ६. दवाखान्यांत उपयोगी पडणाऱ्या वस्तु बनविणें इ.

## शिस्तीचें उत्कृष्ट व अमोघ असें एकमेव साधन.

हीं सर्व कामें चांगलीं आणि इष्ट हेतु साध्य करणारीं आहेत. पण मला अशा एकाच हातकामाची निवड करावयाची आहे जें सर्व हेतु साध्य करूं शकेल. हातकामाच्या बाबतींत जे महत्वाचे मुद्दे आतापर्यंत मांडण्यांत आले ते कमी अधिक प्रमाणांत वर उल्लेखिलेल्या सर्व कामांना लागू पडतात. पण जें शिस्तीच्या दृष्टीनें नमुनेदार व प्रभावी ठरूनहि सर्वसुकर असेल असें जर एकच एक काम सांपडूं शकलें तर मोठेंच कार्य साधेल !

या कामाच्या योगें समाजाचें ऐक्य साधण्याचा उद्देश समोर ठेवावयाचा असल्यास त्याचें स्वरूप असें असावें कीं जें गरिबांना, साधनांची फारशी अनुकूलता नसतांहि करतां येईल; समाजांतील बहुसंख्य वर्गाची फार दिवसांपासुनची गरज ज्यायोगें पूर्ण होईल व ज्यांच्या गरजा जास्त आहेत अशा वर्गाचीहि सोय

होईल. याशिवाय, जी गरज भागविली जाईल ती अन्न, वस्त्र, घरदार यांसारख्या जीवनांतील प्राथमिक गरजांपैकीं असावी. त्या कामाचें फल किंवा त्यापासूनची तृप्ति ही तत्काल मिळावी, मिळत रहावी. तें सर्वांना जमण्यासारखें असावें. असें असलें तरच तें काम नित्याचें व टिकाऊ होऊं शकेल व बहुसंख्य समाजावर त्याची छाप पडूं शकेल.

आजच्या युद्धाची तऱ्हा अशी आहे कीं त्यांत सैनिकांना जितक्या यातना सोसाव्या लागतात तितक्याच स्त्रियांना, मुलांना व वृद्धांना सोसाव्या लागतात. अहिंसक प्रतिकाराच्या लढ्यांत दमदार नवयुवक जसे भाग घेऊं शकतात तसा व तितकाच महत्वाचा सक्रिय भाग स्त्रिया व मुलें यांना घेतां येतो, येवढेंच काय पण अहिंसक प्रतिकारांत पुरुषांपेक्षां स्त्रियांचेंच कार्य अधिक प्रभावी ठरतें. सबब शिस्तीसाठीं जें हातकाम आपण निवडूं पहातों त्यांत स्त्रियांनाहि सुलभतेनें भाग घेतां आला पाहिजे.

शेतीचें काम निवडलें तर? तें त्याच लोकांना शक्य आहे ज्यांना जमीन मिळूं शकते. शेतकीची निवड करावयाची तर शहरांतील लोक दुरावतात. म्हणजे आपल्या देशाची ( अमेरिकेची ) अर्धी जनता शिस्तीसाठीं निवडलेल्या या कामाला आंचवणार. हीच अडचण जंगलकाम व जमीनी लागवडीस आणण्याचें काम निवडल्यास उभी राहणार. शिवाय बऱ्याच भागांत शेतकीसारखीं कामें वर्षांतून सहा महिनेच पुरतात.

बांधकामाची निवड देखील सोयीची नाहीं. त्यांत एकतर विशेष ज्ञान लागतें. खर्चहि खुप येतो. कामहि कांहीं हलकें सलकें नाहीं. त्यामुळें स्त्रिया आणि वृद्ध त्यांत सामील होणें शक्य नाही. शिवाय विशेषज्ञहि थोडेच असणार. सहन करण्याची शक्ति सर्वांतच असते असेंहि नाहीं. एवंच बांधकामांत भाग घेणाऱ्या मंडळींची संख्या आणखीच कमी भरणार. बऱ्याच लोकांना आपलें घरदार व रोजचें काम सोडून बांधकामाच्या ठिकाणीं जाण्याचें जमणें व परवडणेंहि शक्य नाहीं. शिस्तीच्या उद्देशानें पाहूं जातां बांधकामांतील मातीगोट्याचें काम तितकें उपयोगीं नाहीं. म्हणजे तें काम एकसंध असें नसून त्यांत प्रकारभेद आहेतच. त्यांत खोदणें, विटा चढविणें, इ. हातांनीं करावयाचीं कामें अशीं आहेत कीं जीं आपल्या देशांत [ अमेरिकेंत ] थंडीच्या दिवसांत सहा महिने करतां येत

नाहींत. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर शेतकी व बांधकाम यांची निवड आपल्याला अहिंसेच्या शिस्तीचें साधन म्हणून करतां येत नाहीं. कारण सर्व जनतेला त्यांच्या द्वारें शिक्षण देतां येत नाहीं.

खाणें व राहणें सोडल्यास माणसाची तिसरी महत्वाची गरज म्हणजे कपडे. एकदां कच्चा माल मिळाला कीं कांतण्यासारख्या साध्या कृतीनें सूत व दोरा तयार करतां येऊन गुंफणी, जोडणी, विणाई, शिलाई, करून अनेक प्रकारचा कपडा तयार होऊं शकतो. *

कोणत्याहि तंतुयुक्त पदार्थांपासून सूत काढावयाचें झाल्यास, पिंजाई ( कापसाच्या बाबतींत ), रेचा इ. सर्व कामें हातानेंच होणें जरूर आहे, कारण जर मिलचें सुत विणाईसाठीं वापरलें तर खर्च बराच येतो व काम करणाऱ्याला कारखान्यावर अवलंबून रहावें लागतें. सत्याग्रहाचा लढा प्रत्यक्ष सुरू झाल्यावर सत्याग्रहीला मिलचें सूत मिळूं नये अशी कारवाई सहज करतां येते. मोठा लढा सुरू झाल्यास एकतर पुष्कळसे सत्याग्रहीच शेती करायला लागतील व कपड्यासाठीं कच्चा माल पुरवितील किंवा दुसरे शेतकरी ती गरज पुरी करण्याइतकी

---

* विणण्याचा एक घरगुती प्रकार असा आहे कीं चार चार इंचाचे लांब रुंद तुकडे विणून ते सांधायचे किंवा शिवायचे. हे छोटे छोटे तुकडे विणण्यासाठीं अमेरिकेंत चार प्रकारचे छोटेखानी माग तयार करण्यांत आले आहेत. वर जेथें जेथें हातविणाईचा उल्लेख केला जाईल तेथें तेथें या चार तऱ्हानीं केलेली विणाई समावेशित आहे असें समजलें जावें. या चार मार्गांचीं नांवें व तीं मिळण्याचीं ठिकाणें पुढें दिलीं आहेत.

1. Weave it ( विविट ) Donor Products Corporation, Medford Mass., U. S. A-

2- Easy Weave ( इझी वीव ) Fellowcrafters Inc. 64- Stanhope Street. Boston Mass;

3- Loomette (लूमिट) Cartercraft Studios, Los Angeles, California, U. S. A.

4. Jiffy Loom (जिफ-लूम) Sears, Roebuck & Co. U.S.A.

सहानुभूति दाखवितील व स्वतः कातण्याची आपल्याला सवय असल्यामुळें आपलें काम बंद पडणार नाहीं अशी अपेक्षा करायला कांहीं हरकत नाहीं.

हातानें विणून हा जो माल तयार होतो त्यायोगें माणसाची एक सर्व-सामान्य गरज भागते. तयार माल विक्रीसाठीं किंवा व्यापारासाठीं दुसरीकडे पाठवितां येतो. स्वतः आणि कुटुंबाकरितांहि वापरतां येतो, किंवा विकतां पण येतो. एका समूहानें कांतलेलें सूत एकत्र करून त्याची एक सांधिक वस्तु बनवितां येते. असा माल सर्व पेशाच्या आबालवृद्धांना उपयोगी पडतो. शिवाय काम सुरू व्हायला अवाढव्य संयोजनाचीहि गरज नसते.

हातविणाईला लागणारीं अवजारें कमी खर्चाचीं, हलकीं, सुटसुटीत, आणि नेआणीला सोयींचीं असतात. अगदीं लहान मुलें सोडून दिलीं तर हें काम सर्व स्त्रीपुरुषांना करितां येण्यासारखें आहे. तें शिकायलाहि फारशी मेहनत पडत नाहीं. या ना त्या रीतीनें उपयोगी पडूं शकेल असा माल चटकन् तयार होतो. आपलें पोटाचें काम संपविल्यानंतर घरीं परत येऊन सायंकाळीं देखील हें काम करतां येतें. वेळ किंवा ऋतु याचेंहि बंधन त्याला नाहीं. कामहि साधें व निर्मळ असें आहे. त्यांत एक प्रकारची लय आहे. आणि एकदा कामावर चांगला हात बसला कीं आपलें मन दुसऱ्या गोष्टींत गुंतलेलें असलें तरी हें काम चालू ठेवतां येतें.

हें काम शांततेनें करतां येण्यासारखें असल्यामुळें तेव्हांच वाचन, संभाषण चालू ठेवावयास प्रत्यवाय नाहीं. आजूबाजूच्या लोकांनाहि त्याचा उपसर्ग पोंचत नाहीं. घरीं किंवा बाहेर, व्यक्तीला किंवा समूहाला, गरिबाला किंवा सुखवस्तु माणसाला, शहरवासियांना तसेंच शेतकऱ्यांना, कुशलांना, अकुशलांना, सुशिक्षि-तांना, अशिक्षितांना, येवढेंच काय पण बिछान्याला खिळलेल्या कायम अशक्तालाहि हें काम करतां येतें. सुईची वीण, कताई, विणाई तर आंधळेहि करूं शकतात. प्रवासांत असो कीं घरीं असो, काम बंद करण्याची गरज नाहीं. रहावयाला एकच खोली ज्यांना मिळते अशांना, त्याचप्रमाणें बराकींत इतरांबरोबर रहाणाऱ्यांनाहि हें करतां येतें. कामाला श्रम पडत नाहींत. सबब दिवसभर दमल्या श्रमल्यावर हें कसें करावें याबद्दल वाद घालणें शक्य नाहीं. कामाचा बदल झाला कीं विश्रांति मिळते. आपल्या नित्याच्या कामाहून या कामाचें स्वरूप, त्या मागील मनोभूमिका निराळी असल्यानें बदल म्हणूनहि हें काम करतांना आनंदच वाटतो. कामचें काम, आरामचा आराम !

या सर्व कारणांमुळें अहिंसेच्या चळवळीसाठीं साधना म्हणून निवडलेल्या उपयुक्त परिश्रमापैकीं इतर सर्वांपेक्षां सुत आणि कपडा यांचें हें हातकाम जास्त फलदायक आणि प्रभावी ठरणारें आहे. या दृष्टीनें या कामाबद्दल आस्थापूर्वक विचार केला पाहिजे. वर जो निष्कर्ष काढला त्यांत जर चूक असेल आणि वाचकांच्या ध्यानीं दुसरें एकादें शिस्तीच्या दृष्टीनें याहिपेक्षां जास्त उपयुक्त असें काम असेल तर त्यांनीं तें अवश्य अंगीकृत करावें व त्या दिशेन पुढें जावें.

## पूर्वदूषित ग्रहांवर विजय.

असल्या कामांत भाग घेतांना प्रथम प्रथम पुरुषांना कदाचित् अवघड वाटेल; कारण त्यांच्या मनांत कांहीं पूर्वदूषित ग्रह फार दिवसाचे घर करून बसले आहेत. विणणें, कापडचोपड तयार करणें हें घरगुती धंद्याचें काम आज वर्षानुवर्षें स्त्रियाच संभाळीत आल्या आहेत. सबब पुरुषांना हें काम करतांना लाज वाटते. त्यांची अशी समजूत असते कीं हिंमत, प्रतिष्ठा, हें मुख्यत: पुरुषांचे गुण आहेत. आपण जर स्त्रियांचीं कामें उचललीं तर स्त्रैण आणि अप्रतिष्ठितपणाचा आळ आपल्यावर येईल. तथापि धैर्यगुण हा केवळ पुरुषांनाच वश आहे असें नाहीं. किंवा शरीराचा आकार मोठा असला म्हणजे तेथें धैर्यगुण असतोच असें पण नाहीं. मानवाची खरी प्रतिष्ठा धंद्यावर, किंवा त्याच्या अवजारांवर अवलंबुन नसून त्याच्या बुद्धीवर आणि हृदयगुणांवर अवलंबून आहे. सबब अविचारी लोकांनीं केलेला अशा प्रकारचा उपहास आपण आपल्या मनाला शिवूं देतां कामा नये.

दुसरें, मला असें वाटतें कीं एकाच प्रकारच्या कच्च्या मालापासुन हातानें बनविलेलें कापड मिलच्या कापडाइतकेंच आर्थिक दृष्टीनें परवडेल किंवा पडलें तर थोडें स्वस्तच पडेल. याचें कारण असें कीं कारखान्यांत माल तयार केल्यानें खर्चांत जो बचत होते ती आधुनिक व्यापारी पद्धतीनें लोकांपर्यंत माल नेऊन पोंचविण्यांत लागणाऱ्या अवाढव्य खर्चालाच पुरी पडत नाहीं. हातांनीं तयार केलेला माल यदाकदाचित तुलनेनें महाग पडलाच तरीं त्या हातकामाच्या-द्वारें अहिंसेची साधना घडत असल्यानें—शिस्तीचें शिक्षण मिळत असल्यानें—तें नुकसान भरून निघतें.

## शिस्तीसाठीं योजावयाच्या इतर गोष्टी.

हातकामाचा—विशेषत: कांतणें आणि विणणें याचा—व्यापक प्रमाणावर प्रसार झाल्यानंतर शिस्तीचें जें शिक्षण मिळेल त्याला जास्त गति व

पुष्टि देण्यासाठीं सत्याग्रहीला इतर दुसऱ्या गोष्टींचाहि अवलंब करतां येईल. केवळ हात कामासाठींच नव्हे तर अभ्यास, चर्चा, संगीत, लोकनृत्य, आदर्श सत्याग्रहींच्या स्फूर्तिकथांचें सामुदायिक वाचन, चिंतन, निरनिराळ्या प्रकारचीं लोकसेवेचीं कामें इ. च्या निमित्तानें सत्याग्रहींनीं छोटीं छोटीं मंडळें स्थापन करावीं * म्हणजे हातकाम, भावना व विचार यांचा समन्वय, ×विचार-विमर्श, चिंतन या चारी तऱ्हांनीं शिस्तीची साधना घडेल. यापैकीं प्रत्येकीनें नैतिक आणि आध्यात्मिक मूलधन वाढेल. एकेका गोष्टीचें जर हें कार्य तर चारींचा मेळ साधल्यावर शिस्तीचें शिक्षण कितीतरी प्रभावी ठरेल. + एकाद्या कामाची जास्त प्रभावी रीतीनें सिद्धि व्हावी अशी इच्छा असल्यास तें काम आपण मनापासून केलें पाहिजे; आपले उद्देश, आपल्या आकांक्षा सर्व तेथेंच केंद्रित झाल्या पाहिजेत; तिथून चित्त द्विधा होतां कामा नये. हें जसें आपण जाणतों तसेंच हेंहि आपल्याला कळायला हवें कीं त्या कामाच्या पूर्णतेसाठीं आपलें सर्वस्व–शरीर, मन, स्वत्व पणाला लावून झटलें पाहिजे, तसा प्रयत्न झाला पाहिजे. या दृष्टीनें वरील चारहि गोष्टींना महत्व आहे. आतांपर्यंत जें विवेचन करण्यांत आलें, त्यांत शिस्तीच्या बाह्यांगाच्या–शारीरिक वळणाच्या–दृष्टीनेंच जास्त विचार करण्यांत आला हें कबूल आहे. याचें मुख्य कारण असें कीं आजवर शिस्तीच्या त्या अंगाचा विचार व आचार फारच थोड्या प्रमाणावर झालेला आहे. त्याचें परिमार्जन व्हावें म्हणून येथें शारीरिक वळणाला जास्त महत्व दिलें आहे.

चर्चेसाठीं एकत्र जमण्याच्या मुद्यासंबंधीं थोडेंसें सांगितलें पाहिजे. अहिंसेचें तंत्र म्हणजे काय? त्यांत हातकामानें कशी व किती मदत होते इ. गोष्टींचा नीट

---

* "Training for Peace," Philadelphia, J. B. Lippincott Co, 1937 हें माझें पुस्तक पहावें.

× Sentiment—an organized arrangement of feelings and thoughts.

+ अहिंसेच्या अंगप्रत्यंगांचा कसोशीनें विचार करणारांना शिस्तीचें साधन म्हणून चिंतनाचा, ध्यानाचाहि अवलंब सुचेल. यासाठीं जास्त पुरावा बायबलांत I Corin Thians 13. मध्यें सांपडेल.

उमज पडावयास साहाय्य मिळतें म्हणूनच चर्चेचें येवढें महत्व. हातकामाचा अंगिकार करणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या मनावर जर ही गोष्ट नीट ठसली नाहीं तर ही साधना देखील निरुपयोगी अशा आणखी एका आंधळ्या कर्मकांडांत भर घालील व तिचा कदाचित् दुरुपयोगच होईल.

शिस्तीच्या या चतुरस्र योजनेंत इंद्रियांच्या तृप्तीला भरपूर अवकाश मिळेल. या चळवळीच्या कक्षेंत प्रत्येक इंद्रियाला काम मिळूं शकतें. सौंदर्यदृष्टीचीहि कुणाला हौस असल्यास तिला देखील अवसर मिळेल. परिश्रमांत, लोकनृत्यांत, संगीतांत, काव्यामोदांत, शेकोटीवरील चर्चेत आणि कधीं कधीं सहभोजनाच्या कार्यक्रमांत देखील ही सौंदर्यदृष्टि वाढायला अवसर आहे.

इंद्रिय-तृप्तीबरोबरच बुद्धीला, भावनांना, सामाजिक, सौंदर्यविषयक, नैतिक आणि धार्मिक वृत्तींना सुद्धां शिस्तीची ही व्यापक योजना वैचित्र्यपूर्ण अवसर देऊं शकेल. आज माणसाच्या अंतःकरणांतील आत्मशक्तीचीं, स्वत्वाचीं मानससरोवरें सुकून गेलीं आहेत. या चळवळीनें त्यांत जीवन भरलें जाईल. मनावर पडणाऱ्या ज्या नैतिक ताणाचा मागील छेदकांतून उल्लेख केलेला आहे तो ताण संगीतानें कमी होईल. या चळवळींचा उद्देश शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचा असतो. सबब सुरक्षिततेची भावना निर्माण होते. आपल्या अपेक्षा आगामी कालांत पूर्ण होतील असा विश्वास वाढतो आणि नव्या नव्या गोष्टींचा उपक्रम करण्याची बुद्धीची क्षमता अंगीं येते. समाजांतील मेळमेळावा वाढतो. सर्वांना मिळून सुंदर आणि उपयुक्त वस्तु करायला वाव मिळतो. भावी समाज-जीवन आदर्श रीतीनें जगण्याची आकांक्षा जागी होते व तिचा विकास होतो. सत्याग्रहीची शक्ति वाढावी येवढाच केवळ या शिस्तीच्या चतुरंग साधनांचा उपयोग नाहीं तर त्यांच्या द्वारें जनतेवर असे संस्कार घडवितां येतील की ज्या योगें आजच्यापेक्षां चांगली संस्कृति निर्माण होईल—जगांत जिकडे तिकडे अहिंसेची सांवली पसरेल !

## लष्करी शिस्तीपेक्षां या शिस्तींत जास्त गुण आहेत

शिस्तीच्या या सर्व चळवळी जर एकसमयावच्छेदेंकरून नीट चालविल्या गेल्या तर त्यांत लष्करी कवायद व सैनिक–शिस्तीपेक्षांहि अधिक वैविध्य आढळेल. माणसाच्या आंतरिक शक्तींनीं त्यांत जास्त क्षेत्र व्यापलेलें दिसेल. माणसाचें व्यक्तित्व अधिक उच्च, अधिक सखोल होऊं लागेल. सैनिक—शिस्त व लष्करी कवायदीपेक्षां या चळवळीच्या साधनांत परस्पर संगति अधिक आहे.

सैनिक–शिस्तींत परैक्यभाव आणि स्वामिनिष्ठा यांचें क्षेत्र फार संकुचित असतें. आजच्या युगांतील व्यापार, वाहतुकीचीं आधुनिक साधनें, आर्थिक हित-संबंध, विज्ञान, यंत्रकला, यांच्या योगानें जगभर जो सहयोग घडतो त्याच्यशीं सैनिक–शिस्तींतील संकुचितपणाचा मेळ बसत नाहीं. या दृष्टीनें सैनिकशिस्त आणि युद्धसाधनें हीं उत्तरोत्तर कालविसदृश होत आहेत. सैनिकशिस्तीनें माणसाची उप-क्रमशीलता व स्वतंत्रबुद्धि अगदी मर्यादित होते. तिच्यायोगें माणसाचें मन, बुद्धि, उत्साह सर्व खच्ची केले जातात. ती सत्य आणि सत्यनिष्ठा यांताहि दखल देते. तिच्या तपशीलांतच विसंगति असल्यामुळें ती सदोष आहे. त्या शिस्तीनें सैनिकांत धैर्य उत्पन्न होत असेल पण त्या सैनिकानें हिंमत करून बोकांडीं बसलेल्या युद्धाचा प्रतिकार करण्याचा जर प्रयत्न केला किंवा त्याचें शिस्तपालन येवढेंसें जरी ढळलें तर तीच शिस्त लागलीच शिस्तभंगाच्या नांवाखालीं जबर शिक्षेची किंवा प्रसंगीं मृत्यूची तरवार त्याच्या डोक्यावर लटकत ठेवून त्याच्या मनांत दहशत उत्पन्न करते. शत्रूची भीति वाटणें, शत्रूला भिणें हें स्वाभाविक आहे पण ज्याच्याशीं सैनिकांनीं निःसीम स्वामिनिष्ठेनें रहावें अशी अपेक्षा केली जाते त्याच्याविषयींच भीतीची भावना मनांत निर्माण करणें ही मानसशास्त्राच्या दृष्टीनें मोठीच विसंगति आहे. अहिंसक शिस्तीच्या साधनांत मूलतः असा कोणताच दोष नाहीं.

ज्यांच्यांत विवेक असतो, ज्यांच्या मनाला एकादी गोष्ट लवकर लागते, ज हळवे असतात, जे दूरदृष्टि व बुद्धिमान असतात, जबाबदार अधिकारी होण्याची किंवा समाजाचें नेतृत्व स्वीकारण्याची ज्यांच्यांत लायकी असते अशा लोकांच्या बाबतींत तर लष्करीं शिस्तींतील या विसंगती अधिकच अपायकारक ठरतात. त्यांच्यामुळें मनोधैर्यावरच घाव पडतो. या विसंगतीचा अहिंसेच्या शिस्तींत अभाव आहे. म्हणून ज्यांना केवळ सैनिक शिस्तीचाच सराव झाला आहे अशा लोकांत जें मनोधैर्य आढळेल त्यापेक्षां जास्त, उच्च प्रकारचें मनोधैर्य अहिंसक शिस्तींत लाभूं शकेल. अहिंसेवर विश्वास असणाऱ्या लोकांनीं कोणती तरी अव्यंग शिस्त स्वतःला लावून घेणें अगत्य आहे. त्या शिस्तीमुळें अहिंसेची संगति आणि आविष्कार साधला गेला पाहिजे हें मात्र विसरतां कामा नये.

लढाईच्या विजयाचा अंतिम उद्देश जास्त शांतता व सुबत्ता स्थापन कर-ण्याचा असतो, हें सर्व युद्धतंत्रविशारद एकमतानें कबूल करतात. पण आजच्या

युद्धांतील शस्त्रांचा अवाढव्य खर्च, सरसकट केलेले अविवेकी हल्ले, अत्यंत मोठ्या प्रमाणावर होणारी हानि, सत्याचा विपर्यास व गळचेपी, वाटेल तें करून विजय मिळविण्याच्या तऱ्हा, इ. गोष्टी लक्षांत घेतां शांततेचा व सुबत्तेचा अंतिम उद्देश साध्य होणें कसें अशक्य आहे याची खात्री पटते. जशीं साधनें तसें त्यापासूनचें फल! अहिंसेच्या शिस्तीचा अनुबंध अहिंसेशींच साधला असल्यानें लष्करी शिस्ती-पेक्षां या बाबतींत अहिंसक शिस्त जास्त उपयुक्त ठरते. आपल्या शत्रुबद्दलहि ऐक्यभाव ठेवावा हें शिक्षण सैनिक–शिस्तींत दिलें जात नाहीं, आणि दीर्घकाल टिकणाऱ्या शांततेसाठीं तर या वृत्तीची फार गरज आहे.

कॅप्टन हार्टसाहेबांचा असा एक आक्षेप होता कीं सत्याग्रहानें राष्ट्रव्यापी लढा चालविणें शक्य नाहीं. कारण त्यासाठीं लोकांची सामूहिक नीतिमत्ता सैनिका-पेक्षां फार उच्च दर्जाची असावी लागते. पण या पुस्तिकेंत सुचविलेल्या अहिंसक साधनेनें लोकांमध्यें आवश्यक तेवढी नीतिमत्ता यावयाला हरकत नाहीं. कारण एकतर अहिंसेची शिस्त रोजच्या नागरिक जीवनांत ढवळाढवळ करीत नाहीं. उलट तिच्यामुळें खरें खरें समाधान मिळतें. म्हणून सबंध राष्ट्राला ही साधना निःशंक-पणें अंगीकृत करायला मोठी अडचण वाटेल असें नाहीं.

## राष्ट्रव्यापी चळवळीसाठीं शिस्तीची आवश्यकता.

सत्याग्रहाची चळवळ राष्ट्रव्यापी व्हावी, सबंध राष्ट्रानें अहिंसेचा अंगिकार करावा व हिंसेच्या ऐवजीं अहिंसक प्रतिकार करून संघर्ष चालवावे अशी जर आपली इच्छा असेल तर एक गोष्ट विसरतां कामा नये व ती ही कीं या सर्व चळवळींना एका निश्चित सर्वमान्य शिस्तीचें पाठबळ असलेंच पाहिजे. जर तसें नसेल तर आपल्या चळवळीचे विरोधक 'फोडा आणि झोडा'च्या जुन्याच कारवाया करून तिला हाणून पाडतील. अशी ही शिस्त हातकामाच्या द्वारें उत्कृष्ट रीतीनें अंगीं बाणतां येते.

## अहिंसक खडी फौज

आपली योजना एकदा सुरळीत चालू झाली तर ती 'राष्ट्रसंघ' किंवा "यूनियन नौ" (आतांच एक व्हा) या संस्थापेक्षां जास्त परिणत व आशादायी स्वरूपांत विकसित करतां येईल. पॅरी सेरॉसालनी अत्यंत वक्तृत्वपूर्ण आणि ओजस्वी शब्दांत प्रतिपादन केलें आहे कीं नाश आणि हिंसा करण्यासाठीं उभारलेल्या

६६९३

नेहमींच्या सैन्याऐवजीं प्रत्येक राष्ट्रानें आपल्या संरक्षणासाठीं लोककल्याणाचा उद्देश असलेली एक खडी फौज उभारावी, जी आदेश मिळतांच राष्ट्रांतील किंवा परराष्ट्रांतील कोणत्याहि भागांत जाऊन संकटग्रस्तांची घडी नीट बसावयाला, रोग, दारिद्र्य, व्याधि, अज्ञान यांतून त्यांची मुक्तता करायला धांवून जाईल. लढाऊ सैन्य, आरमार, वगैरे ठेवायला आज राष्ट्राला जो अवाढव्य खर्च लागतो त्यापेक्षां कितीतरी पटीनें कमी खर्च या सैन्याला व कामाला लागेल, आणि फलस्वरूप म्हणून आपल्यावरील करांचें ओझें अपेक्षेबाहेर हलकें होईल. असल्या सेवेमुळें परस्परपरिचय वाढून आपसांतील गैरसमज, अज्ञान, अविश्वास, साशंकता, विद्वेष नाहींसे होतील. राष्ट्रांची स्वार्थवृत्ति व दुरभिमान कमी होतील, वर्गावर्गांत व राष्ट्राराष्ट्रांत सद्भाव आणि विश्वास वाढेल. या शांतिसैन्याच्या द्वारें जी सुव्यवस्था कायम केली जाईल ती खरीखरी सुव्यवस्था ठरेल. कारण तिच्यांत लोकांच्या बाह्य जीवनसाधनांचा आंतरिक हृदयगुणांशीं मेळ साधला जाईल. जो विजय मिळविला जाईल तो प्रेमानें, दयेनें, भलाईनें परिपूर्ण असेल; जो प्रतिकार होईल तो विनाशक नसून विधायक राहील व म्हणून टिकेलहि ! राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षितता-खरी शांतता कायम करण्याचा हाच मार्ग आहे ! हें स्वप्नरंजन नव्हे ! पेरी सेरॉसॉलच्या 'सर्विस इंटरनॅशनल' (आंतरराष्ट्रीय सेवासमिति) मध्यें किंवा अमेरिकन फ्रेण्ड्स सर्विस कमिटी (मित्र-सेवा-संघ) च्या संकटनिवारक सेवेमध्यें, जी मंडळी भाग घेत आहे त्यांच्या संयोजनांत या शांतिसैन्याचें बीजारोपण आज कित्येक वर्षांपासून झालें आहे.

## सत्याग्रहाच्या साधनेंत हातकाम हा बाह्य घटक होय !

संघर्षांचा अंतिम निर्णय नैतिक घटकांवरच अवलंबून असतो. हें जरी खरें तरी त्यांत कांहीं बाह्य घटकहि असतात. युद्धाच्या बाबतींत तर हें प्रत्ययाला येतेंच पण अहिंसक प्रतिकारालाहि हें लागू पडतें. सत्याग्रह झाला तरी तो कांहीं विदेही आत्म्यांमध्यें चालत नाहीं. तो जीवयात्रेसाठीं बाह्य वस्तूंचा उपयोग करून घेणाऱ्या देहधारी मानवांमध्येंच चालतो. हातकाम आणि त्यापासून बनलेल्या वस्तूंचा प्रत्यक्ष सामाजिक उपयोग हींच सत्याग्रहाला आवश्यक असणाऱ्या शिस्तीचीं बाह्य साधनें होत !

REFBK-0006613